◆ डिसेंबर २००६
◆ वर्ष सहावे
◆ अंक बारावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ७ |
| **विशेष वार्ता** | ४४ |
| **पुस्तक परिचय** | |
| **डेअर टू पब्लिश** : दीनानाथ मल्होत्रा | ४८ |
| **असे घडले सहस्त्रक** : निरंजन घाटे डॉ.प्रमोद जोगळेकर | ५४ |
| **अमेरिकेतील पापनगरी**:डॉ.अनंत लाभसेटवार | ६० |
| **कॅसिनो रॉयल** : अनु.सुभाष जोशी | ६७ |
| **मृत्यू माझ्या उंबरठ्याशी** : खुशवंतसिंग | ७६ |
| **दीपयोजना** | ८० |
| **साधंसुधं** : प्रमोदिनी वडके-कवळे | ८६ |
| **पुरस्कार** | ९० |
| **वाचकांचा प्रतिसाद** | १०२ |
| **श्रद्धांजली** | १०६ |
| **बालनगरी** | १०८ |

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## 'गझल'चे वेगळेपण

वाई येथे गेल्या महिन्यात पाचवे अखिल भारतीय गझल संमेलन संपन्न झाले. कृष्णा नदीच्या सान्निध्यात गणपती घाटावर दीडदोनशे गझलकारांनी दोन दिवस गझलचा जागर केला.

'गझल' हा विशिष्ट काव्यप्रकार मराठीत आपले स्वतंत्र स्थान निर्माण करण्यात यशस्वी होत आहे याची खूणगाठ त्यामुळे पटायला हरकत नसावी. गझल हा स्वतंत्र काव्यप्रकार आहे हे जनसामान्यांना ठाऊक असले तरी मराठी समीक्षेला अजून त्याची निश्चित खात्री वाटत नाही; त्यामुळे गझलचे अनेक प्रवक्ते 'गझल'च्या मान्यतेसाठी जणू आंदोलनाच्या पावित्र्यातच वावरत असतात. या संमेलनातही त्याची री ओढली गेली. चार संमेलने होऊनही 'गझल'च्या पृथगात्मकतेबाबत अनेक जाणकार मंडळी उदासीनता दाखवतात, आमची दखल घेण्याचे टाळतात असा सूर प्रकट झाला. या संमेलनातील एका परिसंवादातच एका वक्त्याने केवळ गझलचीच सवती चूल मांडण्याच्या प्रयत्नावर घणाघाती हल्ला चढवला. 'गझल'च्या तंत्रशुद्ध रचनाबंधाचा आग्रह धरणारे जाणकार माधव जूलियन आणि भाऊसाहेब पाटणकर यांची गझल ही खरी गझलच नव्हे; ती परिपूर्ण गझल नव्हे अशा प्रकारची आवेशयुक्त भूमिका घेताना दिसतात आणि प्रत्येक संमेलनात तोच तो युक्तिवाद दिसेल त्या व्यासपीठावरून श्रोत्यांना ऐकवतात.

एखाद्या वाङ्मयप्रकारात देशकालभाषा परिस्थितीनुसार वेगवेगळी वळणे दिसू शकतात असे थोडे उदार धोरण स्वीकारले तर 'गझल'च्या एकूणच प्रचारप्रसाराला अधिक व्यापक अवकाश मिळू शकेल हे या मंडळींनी ध्यानात घेण्याची गरज आहे. अर्थात इतर कवितांपेक्षा 'गझल'चे वेगळेपण हे जाणवल्याविना राहात नाही, राहू नये हे या संमेलनातही पुन: पुन्हा सांगितले गेले; केवळ नर्म शृंगार वा विरहार्तता यापुरतेच गझलचे आशयद्रव्य सीमित नाही; तिच्यात सामाजिक आशयालाही स्थान आहे आणि दलित अनुभूती किंवा स्त्रीवर्गाच्या व्यथावेदना यांचेही आजच्या गझलला वावडे असण्याचे कारण नाही हेही या संमेलनात गझलकारांनी स्वत:लाच पटवून घेण्याबाबत थोडीफार का होईना पुढची मजल नक्कीच गाठली. पारंपरिक गझलरचनेचा आणि गझलच्या आशयद्रव्याचा निष्ठापूर्वक आग्रह धरणाऱ्यांचा आवाज आता थोडा क्षीण होत चालला आहे; असाही या



संमेलनातील चर्चांचा एक निष्कर्ष निघू शकेल.

वाईच्या या संमेलनाला पुणे विद्यापीठाचे नवे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या उपस्थितीने एक वेगळीच शान आली. गझलला नाके मुरडणाऱ्या स्थानिक नागरिकांनाही त्यामुळे या संमेलनापासून दूर राहणे कठीण झाले. पुणे विद्यापीठामार्फत गझलच्या कार्यशाळा घेण्याचा इरादा डॉ. जाधव यांनी जाहीर केला तेव्हा गझलकारांना हर्ष होणे स्वाभाविकच होते. विद्यापीठाच्या मान्यतेची ही मोहर सर्वांना सुखावणारी होती; तिच्यावर राजमान्यतेची मोहर आ. उल्हासदादा पवार यांनी उमटविली. उर्वरित वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष उल्हासदादा हे खरे तर रसिक साहित्यप्रेमी म्हणून अधिक ओळखले जातात. त्यांनी या संमेलनाला उपस्थित राहून काही गझला म्हणून दाखवल्या आणि गझलवरील आपले प्रेम कसे 'जेन्युइन' आणि गहिरे आहे याची उपस्थित मंडळींना एकशे एक टक्के खात्री पटवून दिली. त्याच्याही पुढे जाऊन त्यांनी गझल सागर प्रतिष्ठानला चक्क दोन लाखांचा मुख्यमंत्र्यांच्या निधीतला धनादेश देऊन या संमेलनाला आणि गझल या काव्यप्रकाराला राजकीय पाठबळ असल्याचाही निर्वाळा दिला. विद्यापीठ आणि सरकार या दोहोंचा पाठिंबा मिळाल्याने वाईच्या या गझल संमेलनाच्या यशात 'चार चांद' लागले यात शंकाच नाही.

या संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. राम पंडित यांनी भूषविले होते. त्यांचे अध्यक्षीय भाषण 'गझल'च्या सर्वंकष वैभवाचे पडघम घुमवणारे होते. त्यांच्या प्रदीर्घ व्यासंगाची प्रचीती देणारी त्यांची निरीक्षणे पट्टीच्या गझलप्रेमींनाही अंतर्मुख करणारी होती.

कविता आणि गझल, कवी आणि गझलकार यांच्यातील स्पर्धेचे वा अंतरायाचे निराकरण करून त्यांनी समन्वयवादी भूमिका घेणे पसंत केले. ''गझलकाराने कविता किंवा अन्य काव्यप्रकार याबद्दल अकारण आकस बाळगू नये आणि आपण गझल लिहितो म्हणजे अद्वितीय आहोत असा भ्रम बाळगू नये. कविता व गीत लिहिणाऱ्यांना दुय्यम लेखू नये; उलट आपल्या गझलमध्ये काव्यसृजनाचा प्रयत्न करावा; कवी म्हणूनच आपली खरी ओळख असायला हवी.'' याकडे त्यांनी लक्ष वेधले.

कविता, गीत, लावणी, लोकगीते यांचेही विश्व मोठे आहे; त्यात रचना करणे गझलसारखेच कठीण आहे हे स्पष्ट करून त्यांनी एक विचारांना चालना देणारे मत मांडले. बालगीताची रचना ही सर्वात कठीण असते; मुलांच्या मनाशी तादात्म्य साधून, आपले बालपण संपल्यावर सुलभ रचना करणे ही फारच अवघड गोष्ट आहे; मराठीत बाल-गझल कोणी लिहिलेल्या नाहीत. तसा प्रयत्न करायला हवा. गझलची गेयता बालगीतांना पोषक ठरेल, लोकप्रिय होईल असे डॉ. पंडित यांनी म्हटले. हा मुद्दा खरोखरच बालगीतकारांनी तसेच गझलकारांनी लक्षात घ्यायला हवा.

गझलमध्ये प्रत्येक शेर हा वेगळ्या विषयावर असतो; त्यामुळे गझलमध्ये एकतानता राहत नाही, रसभंग होतो. विषयवैविध्यामुळे गझलमध्ये महाकाव्य संभवत नाही; गझलच्या रचनेवर रदीफ आणि काफिया म्हणजे यमकांमुळे मर्यादा पडतात; गझलमधील शेरांची संख्या ठराविक असल्यानेही गझलच्या विस्ताराला खीळ बसते... म्हणून गझलमध्ये महाकाव्य किंवा दीर्घकाव्य संभवत नाही असे डॉ. पंडित यांनी स्पष्ट केले.

हायकू, दोहा, सॉनेट, गीत, मुक्तक या काव्यप्रकाराचेही 'महाकाव्य' संभवत नाही; तेव्हा गझलच्या मूळ प्रकृतीकडे लक्ष द्यावे; तशाच स्वरूपाचे लेखन करावे; नको त्या अपेक्षा बाळगू नयेत हा त्यांचा सल्ला. रदीफ अंत्ययमकांच्या शक्यता अनंत आहेत; सोती काफिया म्हणजे स्वरांचा काफिया मराठीतही प्रभाव गाजवत आहे; तेव्हा त्यामुळे गझलवर मर्यादा पडतात हा आक्षेप पंडितांना ठिसूळ वाटतो. रदीफ आणि काफिया याकडे गझलचे सामर्थ्य म्हणूनच बघण्याचा सल्ला ते देतात. अर्थात उर्दूमध्ये गझलकार ही नवनवे प्रयोग करीत आहेत; गझल कवितेकडे झुकत आहे. आजाद गझल असाही एक प्रकार उर्दूमध्ये मजहर इमाम यांनी सुरू केला आहे.

मराठीतील गझलकार अक्षरगणवृत्तापेक्षा मात्रिक छंदांचा जास्त वापर करताना दिसते; गझलेचे छंदशास्त्र उच्चारानुगामी आहे. अक्षर गणवृत्त आणि मात्रिक यांच्या समन्वयाने ते साधते. म्हणून मराठी गझल उर्दू गझलहून छंददृष्ट्या अधिक शास्त्रशुद्ध आहे असाही विचार डॉ. पंडित मांडतात. गझलच्या शैलीत प्रयोगशीलता हवी; ती गझलकाराच्या सृजनक्षमतेची खरी ओळख ठरेल असे त्यांचे प्रतिपादन आहे.

या अध्यक्षीय भाषणातील बरेचसे मुद्दे गझलवर मूलगामी प्रकाश टाकतात.

या संमेलनात अनेक परिसंवाद झाले. त्यांचे विषयही विचारांना चालना देणारे, आत्मपरीक्षणाला प्रवृत्त करणारे होते. उदाहरणार्थ, सुरेश भट यांच्यानंतरची गझल, मराठी पद्यसाहित्याच्या ढासळत्या लयीला मराठी गझल आधार ठरू शकेल काय, मराठी गझलमध्ये इस्लाह, स्त्री गझलकारांचे योगदान, रसिकाभिमुख गझल गायकाची गरज...

सौ. संगीता भिसे, सुनंदा वैद्य पाटील, अर्चना माळवी, नीता भिसे वगैरे स्त्री गझलकारांनी प्रभावी सादरीकरणाने कृष्णेच्या घाटावर वृंदावन-मथुरेचा थरार उडवून दिला.

'गझल' या वाङ्मयप्रकाराच्या पृथगात्मतेची अशी प्रगल्भ जाणीव करून देण्याचे उपक्रम गावोगाव होणे आवश्यक आहे.





# साहित्यवार्ता

## * 'लोककथा' परिवर्तनाची प्रेरणा बनावी : डॉ. देवी

अमेरिका आणि भारतातील आदिवासींच्या वेदना सारख्याच आहेत. तेथील लोकांनी अस्वल लोककथांचा उपयोग सामाजिक परिवर्तनासाठी, पारतंत्र्यातून मुक्तीसाठी शस्त्रासारखा केला. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनासाठी अशा लोककथांमधून प्रेरणा घेऊन याचा उपयोग शस्त्र म्हणून केला जाऊ शकतो, असे प्रतिपादन बडोदा येथील आदिवासी जीवनशैलीचे अभ्यासक डॉ. गणेश देवी यांनी केले. मराठवाडा साहित्य परिषद आणि पद्मगंधा प्रकाशनतर्फे डॉ. अरुण प्रभुणे यांच्या नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या 'अस्वल लोककथा' या पुस्तकाचे विमोचन डॉ. देवी यांच्या हस्ते करण्यात आले.

मसापच्या डॉ. नांदापूरकर सभागृहात झालेल्या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोतापल्ले होते. व्यासपीठावर समीक्षक डॉ. हरिश्चंद्र थोरात, शंकर सारडा, लेखक अरुण प्रभुणे, मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, कार्यवाहक कुंडलिक अतकरे, रवींद्र किंबहुने, पद्मगंधा प्रकाशनचे अरुण जाखडे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. देवी म्हणाले, उत्तर-पूर्व अमेरिकेत सर्वप्रथम तिथल्या लोकांनी पारतंत्र्यातून मुक्तीसाठी लोककथांचा विशेषत: अस्वल लोककथांचा शस्त्रासारखा उपयोग केला.

अस्वलांचे खेळ करून आपली उपजीविका करणारे दरवेशी १९७५ नंतर रस्त्यावरून गायब झाले. आपल्या देशातील कायद्यांमुळे त्यांना परागंदा व्हावे लागले. दरवेशींसोबतच लोककथा लोप पावत असताना हे पुस्तक समोर आले आहे. निसर्गाशी नाते तुटत चालले असताना या 'अस्वल लोककथा' पुस्तकाचे महत्त्व निराळे आहे, असेही ते म्हणाले.

अमेरिकेतील रेड इंडियन्सच्या ५६२ जाती आहेत. त्यापैकी १९ जमातींच्या ३३ लोककथांचे अनुवाद या पुस्तकात देण्यात आले आहेत. त्या प्रत्येक जमातीची माहिती, त्या प्रदेशाची वैशिष्ट्ये आणि 'अस्वला'चे त्यांच्या जीवनातील स्थान यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. प्रत्येक लोककथेचा संदर्भ आणि अभ्यासकांशी संपर्क साधून मिळवलेले अनुवादाचे हक्क– यामुळे हे पुस्तक संपादन-संकलनाचा आदर्श नमुना ठरले आहे. लोककथांच्या अभ्यासाला त्यामुळे

नवी दिशा मिळेल, असे मत शंकर सारडा यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाला ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे, सुधीर रसाळ, फ. मुं. शिंदे, भास्कर चंदनशिव, श्याम देशपांडे, सुहास जेवळीकर, अनिल भालेराव, प्राचार्य छाया महाजन, गोपाळ साक्रीकर, धनंजय चिंचोलीकर आदी साहित्यिक, रसिक, वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### * 'सयसावल्या' हे मराठवाड्याच्या सांस्कृतिक विकासाचे प्रत्यंतर – डॉ. कोत्तापल्ले

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी लिखित 'सयसावल्या'चे प्रकाशन नांदेड येथे झाले.

अध्यक्षस्थानी कमलकिशोर कदम हे होते. तर प्रमुख पाहुणे समीक्षक प्रकाश मेदककर, विजया कोत्तापल्ले, प्रकाशक संतोष तांबोळी यांची उपस्थिती होती.

'सयसावल्या'सारखी पुस्तके त्या त्या कालखंडातील सांस्कृतिक जीवन कसे होते हे विशद करतात. तांबोळीसर हे आमचे चांगले शिक्षक होते. त्यांच्यासारखे शिक्षक लाभल्यामुळेच आमच्यासारखे विद्यार्थी घडू शकले. शिक्षकांना अडचणीत आणणारे प्रश्न विचारण्याचा स्वभाव काही विद्यार्थ्यांना असतो, तसाच आमचा होता. पण प्रा. तांबोळी यांनी प्रत्येक गोष्ट आम्हाला समजून सांगितली. विद्यार्थ्यांना समजून घेण्याची क्षमता शिक्षकात हवी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर विश्वास टाकला तर विद्यार्थ्यांचा विकास होतो, असे कोत्तापल्ले म्हणाले.

'सयसावल्या'मध्ये मराठवाड्यातील अनेक माणसांचा गौरव करण्यात आला आहे. गोपाळ काळे याच्यासारख्या उपेक्षित लेखकाचाही समावेश या पुस्तकात झालेला आहे. प्रा. तांबोळी यांनी त्याला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. आंतरिक तळमळीने आलेले शब्दच चिरस्मरणीय साहित्य निर्माण करतात, असे आमदार कमलकिशोर कदम यांनी सांगितले.

यावेळी प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी, भगवानराव भिलवंडे यांचीही भाषणे झाली. पत्रकार संजीव कुलकर्णी यांनी अभंग पुस्तकालयाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या वाचन चळवळीविषयी माहिती दिली. हल्ली पुस्तक प्रकाशन सोहळा आयोजित करण्याची स्पर्धा लागली आहे. मात्र प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी यांनी वयाच्या ७० व्या वर्षी पहिल्यांदाच जाहीर प्रकाशन समारंभ घेतल्याने या समारंभाला विशेष महत्त्व आहे, असे त्यांनी सांगितले.

### * 'मोक्ष'चे प्रकाशन

मोक्ष ही मृत्यूनंतर प्राप्त होणारी गोष्ट आहे. मोक्ष ही दीर्घकालीन तपश्चर्येनंतर, अनेक जन्मानंतर, पापपुण्याच्या चक्रातून बाहेर पडल्यावर प्राप्त होणारी गोष्ट



आहे ही समजूत चुकीची आहे; मोक्ष ही याचि देही याचि डोळा, याच क्षणी प्राप्त करून घ्यायची गोष्ट आहे असे प्रतिपादन तेजगुरू सरश्री तेजपारखीजी यांनी मोक्ष या पुस्तकात केले आहे. याकडे डॉ. यशवंत पाठक यांनी लक्ष वेधले. त्यांच्या हस्ते तेजग्यान फाउंडेशनने काढलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन दि. १८ नोव्हेंबर रोजी झाले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा हे होते.

या पुस्तकाच्या वितरणाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊसकडे आहेत.

### * दि. ५ ते ७ जानेवारी दरम्यान सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सव

सातारा येथील ग्रंथमहोत्सवाचे हे सातवे वर्ष असून, त्याला जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी, ग्रंथप्रेमी, संस्थाचालक, शिक्षक-प्राध्यापक, ग्रंथपाल भेट देऊन मोठ्या प्रमाणावर ग्रंथांची खरेदी करतात. तीन दिवस वेगवेगळे वाङ्मयीन कार्यक्रम, परिसंवाद, मुलाखती, कथाकथन, कविसंमेलन, नवोदितांचा मेळावा वगैरे होतात. स्मरणिकाही काढण्यात येते. एक किलोमीटरपेक्षाही लांब ग्रंथदिंडी हेही या महोत्सवाचे एक वैशिष्ट्य. अध्यक्ष शंकर सारडा असून उपाध्यक्ष प्रा. लांडगे, शिरीष चिटणीस, कार्यवाह यशवंत पाटणे, प्रदीप कांबळे, राजकुमार निकम प्रभृती महोत्सव समितीचे काम पाहतात. स्टॉलचे भाडे ३००० रुपये असून ते डीडीने पाठवण्याचा पत्ता– अध्यक्ष शंकर सारडा, ई-१० पाटील रिजन्सी, १५ एरंडवणे, पुणे ४११००४. डीडी 'सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सव समिती, सातारा' या नावाने सातारा येथील बँकेवर असावा.

### * उज्ज्वला केळकर यांच्या बालकथा पुस्तकाचे प्रकाशन

श्रीमती उज्ज्वला केळकर यांनी लिहिलेल्या व मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या 'बदकाचे बूट' आणि 'गर्विष्ठ सूर्यफूल' या दोन बालकथा पुस्तकांचे सांगली येथील राजाराम सारडा प्राथमिक कार्यशाळा येथे श्री भागवत यांच्या हस्ते प्रकाशन झाले. यावेळी त्यांनी मुलांना 'पुस्तकांशी मैत्री करा' असा संदेश दिला व अगदी साध्या सोप्या भाषेत पुस्तकांशी मैत्री केल्याने काय फायदे होतात, ते सांगितले.

पुस्तकाचा परिचय करून देताना मीनाक्षी सरदेसाई म्हणाल्या, मुलांना आवडणाऱ्या झाडा-फुलांच्या, पक्ष्या-प्राण्यांच्या, पऱ्यांच्या गोष्टी यात आहेत. सुंदर चित्रांनी त्या सजलेल्या आहेत. इंद्रधनुष्याची शिडी, रेशमाच्या आळीने काढलेल्या धाग्याचा दोर धरून खाली उतरणारी परी, अशा अनेक छानदार कल्पना यात आहेत. उज्ज्वला केळकर यांनी 'पिंगुचा जगप्रवास' ही पुस्तकातील रंगतदार गोष्ट सांगितली. दोन लयदार कविताही म्हणायला शिकवल्या.

याप्रसंगी शाळा समितीचे अध्यक्ष द्वारकाधीश सारडा, बालसाहित्याच्या लेखिका शुभदा साने, अनुराधा फाटक याही उपस्थित होत्या.

## * यशवंत देव– ८१ व्या वर्षात पदार्पण

''संगीतकार, गीतकार, गायक अशी त्रिविध प्रतिभा लाभलेले यशवंत देव म्हणजे शब्द-सुरांचा आनंदोत्सव आहे,'' अशा शब्दांत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी देव यांचा गौरव केला.

यशवंत देव यांनी ८१ व्या वर्षात पदार्पण केल्यानिमित्त 'स्वरानंद प्रतिष्ठान'तर्फे त्यांचा गौरवसोहळा आणि 'देवगाणी' हा कार्यक्रम आयोजिण्यात आला होता. देव यांच्या गीतांचे संकलन असणारे 'गाणारे शब्द' हे पुस्तक आणि 'सारेगामा'तर्फे प्रकाशित करण्यात आलेला देव यांच्या गीतांचा सीडी संच डॉ. जाधव यांच्या हस्ते प्रकाशित झाला. आचार्य रजनीश यांच्या विचारांचा मागोवा घेणाऱ्या देव यांच्या रचनांचा संग्रह कवी सुधीर मोघे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. या वेळी 'उत्कर्ष प्रकाशन'चे सु. वा. जोशी आणि प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त प्रकाश भोंडे उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, ''जीवनाची उंची वाढवण्याचे काम ज्या मोजक्या प्रतिभावंतांनी केले आहे त्यापैकी देव एक आहेत. गेली ६३ वर्षे सातत्याने ते कार्यरत आहेत. त्यांच्या प्रत्येक रचनेला त्यांचा असा खास स्पर्श आहे. ते केवळ गळ्याने गात नाहीत; तर सर्वांगाने गातात म्हणूनच त्यांचे गाणे रसिकांना भिडते. त्यांच्यात एक मिस्कील विडंबनकार आणि शीघ्रकवीही लपला आहे. ते उत्तम लेखक आहेत. प्रयोगशील कलाकार आहेत; त्यामुळे शब्द-स्वरांचे नाते उलगडणारे देव हे चालते-बोलते विद्यापीठ आहे. त्यांच्या केवळ नावात 'देव' आहे असे नव्हे; तर तीच त्यांची वृत्ती आहे.''

देव म्हणाले, ''आपल्याला सतत काहीतरी हवे असते. त्यापायी आपले मानसिक संतुलन बिघडते. मी आचार्य रजनीशांकडून स्पर्धारहित जीवन जगणे शिकलो; त्यामुळे मी कृतज्ञ आहे आणि आनंदात आहे. परमेश्वर आधी शोधावा आणि मग त्याला हात जोडावेत. आपण भक्त म्हणवून घेतो; पण सतत मागायलाच जातो. आपल्याजवळ श्रद्धाभाव नसतो.''

अलीकडच्या गाण्यांविषयी ते म्हणाले, ''सध्या गाणी कमी आणि चित्रीकरण जास्त असते. ती श्रवणीय नसून 'प्रेक्षणीय' असतात.'' पूर्वार्धात देव यांनी संगीतबद्ध केलेल्या, रचलेल्या गीतांचा कार्यक्रम सादर झाला. संकल्पना, संहिता आणि निवेदन शैली मुकुंद यांचे होते. उत्तरार्धात स्वत: देव यांच्या गाण्यांची आणि गप्पांची मैफल रंगली. प्रकाश धोंडे यांनी आभार मानले. प्रा. अजित सोमण यांनी सूत्रसंचालन केले.

## * मराठी दूरध्वनी सूचीचे प्रकाशन

बेळगावात दुकानांवरील मराठी पाट्या काढल्या म्हणून आपल्याला आंदोलन



करावे लागते; पण आज पुण्यातही मोठ्या प्रमाणावर अमराठी लोक राहतात. उद्या त्यांनी दूरध्वनी सूची केवळ मराठीतच का प्रकाशित करता असे विचारले, तर त्याचे उत्तर आपल्याकडे आहे का? असा सवाल ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी केला.

भारत संचार निगमच्या (बीएसएनएल) मराठी दूरध्वनी सूचीचे प्रकाशन डॉ. लागू यांच्या हस्ते झाले, त्या प्रसंगी ते बोलत होते. ''भाषेच्या संदर्भात असहिष्णुता बाळगणे योग्य ठरणार नाही,'' असे प्रतिपादन त्यांनी केले. 'ग्राहक पेठ'चे व्यवस्थापकीय संचालक सूर्यकांत पाठक, 'बीएसएनएल'चे विभागीय सरव्यवस्थापक जी. के. अगरवाल, 'इंडियाकॉम'चे व्यवस्थापकीय संचालक अशोक मंडोरे, कार्यकारी संचालक श्रीनिवास राव आदी या वेळी उपस्थित होते. डॉ. लागू म्हणाले, ''भाषेचा अभिमान ही एक गोष्ट आहे; मात्र ती इतरांवर लादणे चूक आहे. त्या हेतूने मराठी सूची काढली जात असेल, तर ते गैर आहे, असे करून आपण संकुचित वृत्तीला बळ देत नाही ना, याचा विचार झाला पाहिजे. आपला देश बहुभाषिक आहे. पुण्यात तर सध्या अनेक परप्रांतीय वास्तव्य करतात. त्यामुळे अधिकाधिक ग्राहकांपर्यंत त्यांच्या-त्यांच्या भाषेत पोहोचण्यासाठी काय करावे लागेल, याचा विचार झाला पाहिजे. भाषा वेगळी असली, तरी लिपी एकच ठेवता येईल का, असाही विचार करून बघावा.''

निवासी नव्हे; व्यावसायिकांची सूची

प्रकाशित झालेली मराठी दूरध्वनी सूची ही निवासी क्रमांकांची सूची नसून, हा व्यावसायिक खंड आहे. ''यामध्ये ७३३ विविध व्यवसायांशी निगडित ५६ हजार क्रमांकांचा समावेश आहे. पुण्यातील ७५ टक्के व्यावसायिकांचे लँडलाइन दूरध्वनी 'बीएसएनएल'चेच आहेत,'' अशी माहिती श्री. मंडोरे यांनी दिली.

## * धर्मांधतेहूनही मॉलसंस्कृती, चंगळवाद भयानक

''धर्मांधतेच्या आव्हानापेक्षा सध्या उभे राहिलेले मॉलसंस्कृतीचे आणि चंगळवादाचे आव्हान भयानक आहे,'' असे मत आमदार शरद पाटील यांनी व्यक्त केले.

असंघटित कामगार, कारागीर, कष्टकरी परिषदेच्या वतीने समता भूमीपासून दीक्षाभूमीपर्यंत सामाजिक सुरक्षा रॅली काढण्यात आली आहे. महात्मा फुले स्मारकापासून तिचा प्रारंभ झाला. एकीकडे असंघटित वर्गासाठी नवे कायदे होत आहेत, तर दुसरीकडे सध्याचे कामगार कायदे शिथिल करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. मध्यमवर्ग चंगळवादात बुडाला असून तळागाळातील कष्टकऱ्यांचा विचार करण्यास कोणी तयार नाही,'' अशी टीका त्यांनी केली.

ही रॅली ११ डिसेंबर रोजी नागपूरमध्ये पोहोचणार आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी कायद्याची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी करण्यात येणार आहे.

## * आपत्कालीन व्यवस्थापनावरील पुस्तकाचे प्रकाशन

''आपत्कालीन व्यवस्थापन व पर्यावरणाची भारतीय समाजात सध्या मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. कृतीच्या पातळीवर मात्र खूप काही होण्याची गरज आहे. कृतिशील होण्यासाठी प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पना मनातून काढून टाकाव्या लागतील,'' असे प्रतिपादन 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर यांनी केले.

डायमंड पब्लिकेशन्सने प्रसिद्ध केलेल्या कर्नल (निवृत्त) पी. पी. मराठे यांच्या 'प्रॅक्टिकल डिझास्टर मॅनेजमेंट' आणि डॉ. श्रीकांत कार्लेकर यांच्या 'पर्यावरण समस्या : निराकरण व क्षेत्र अभ्यास' या पुस्तकांचे प्रकाशन श्री. मालकर व पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व समाजशास्त्र विभागातील प्रा. डॉ. श्रीकांत परांजपे यांच्या हस्ते झाले.

श्री. परांजपे म्हणाले, ''आपत्ती व्यवस्थापन व पर्यावरण रक्षणासाठी सरकारनेच काही तरी केले पाहिजे, अशी भूमिका घेत बसण्यापेक्षा प्रत्येक नागरिकाने वैयक्तिकरीत्या याची सुरुवात केली पाहिजे. अशा प्रकारच्या पुस्तकांतून ही जबाबदारीची जाणीव करून दिली जात आहे, हे स्तुत्य आहे.''

डॉ. कार्लेकर यांच्या पुस्तकात पर्यावरण रक्षणाबाबतचे जागतिक स्तरावरील प्रयत्न, नैसर्गिक समस्यांचा अभ्यास, क्षेत्र अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन आदी बाबींचा समावेश आहे. अगदी घरापासून रस्त्यावरील मोठ्या अपघातात आपत्ती व्यवस्थापन कसे करावे, याचे विवेचन कर्नल मराठे यांनी त्यांच्या पुस्तकात केले आहे.

## * सत्तर हजारांची मदत

ज्येष्ठ पत्रकार गोपाळराव पटवर्धन यांनी 'सकाळ आपत्कालीन सेवे'साठी वैयक्तिक मदत जाहीर केली. या रकमेतून आपत्कालीन सेवेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांना पुरस्कार देण्यात येणार आहेत.

## * 'अनुवाद उद्योग'

ज्ञानक्षेत्राची आगामी वीस वर्षांतील आवश्यकता लक्षात घेता, जगातील विविध भाषांतील ज्ञानग्रंथांचा अनुवाद करण्याचा उद्योग भारतात प्रचंड प्रमाणात बहरणार असून त्यातून पाच लाख लोकांना रोजगार मिळेल. या अनुवाद उद्योगासाठी सरकारने किमान ३०० ते ५०० कोटी रुपये खर्च केले पाहिजेत, असे प्रतिपादन भारतीय ज्ञान आयोगाचे प्रमुख सॅम पित्रोदा यांनी केले.

'सीआयआयएल'च्या दिल्ली येथे आयोजित एका परिसंवादात ते बोलत होते.

जग झपाट्याने पुढे चालले आहे, अशा वेळी ज्ञानाची कवाडे बंद करून चालणार नाही. जगाच्या कानाकोपऱ्यातून येणारा ज्ञानसुगंध त्यात दरवळलाच पाहिजे. लवकरात लवकर त्यासाठी शिक्षण क्षेत्रातले 'लायसन्स राज' त्यासाठी



लवकरात लवकर संपले पाहिजे. देशात फक्त ३५० विद्यापीठेच का असावीत? १५०० विद्यापीठे का नकोत, असे प्रश्न पित्रोदांनी उपस्थित केले. तसेच शिक्षणक्षेत्राची सर्वांगीण गुणवत्ता वाढवायची असेल तर सर्वप्रथम शिक्षक-प्राध्यापकांना आधुनिक ज्ञानाचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. दोन प्रमुख मुद्द्यांवर ज्ञान आयोगाने यापूर्वीच सरकारला आपले मत कळवले आहे. येत्या तीन महिन्यांत आणखी १० शिफारशी आयोग केंद्राकडे सोपवणार आहे. त्याची देशव्यापी चर्चा व्हावी, अशी अपेक्षाही पित्रोदांनी बोलून दाखवली.

ज्ञान आयोगाच्या १० शिफारशी सरकारकडे सोपवल्या जात नाहीत. तोवर जाहीरपणे बोलणे योग्य नाही. योग्यवेळी जरूर त्या देशासमोर येतील, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. ज्ञान आयोगाच्या विचाराधीन असलेल्या विषयांवर, एक खास पोर्टल विकसित करण्यात येणार आहे.

## * ग्रंथनिवड समितीच्या अध्यक्षपदी महानोर

राज्य सरकारने ग्रंथनिवड समितीची पुनर्रचना केली असून, ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांची समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. या समितीची मुदत तीन वर्षे आहे. समितीत अशोक बोऱ्हाडे, डॉ. भास्कर भोळे, द. ता. भोसले, पत्रकार पद्मभूषण देशपांडे, प्रा. किसनराव विठ्ठल कुराडे हे शासननियुक्त सदस्य आहेत.

## * इंटरनेटवरून शिकवणी

अमेरिकेतील विद्यार्थ्यांचे गणित तसे भारतीयांच्या तुलनेत कच्चे असते. अमेरिकी वळणाची इंग्रजी ही तेथील अनेकांची मातृभाषा असली, तरी तिच्या व्याकरणातला सफाईदारपणाही त्यांच्याकडे नाही. त्यामुळे शिक्षकांनी दिलेल्या गृहपाठात अडचण आली, तर काय करायचे?

यावर सोपे उत्तर आहे; ते म्हणजे भारतातील शिक्षक. बंगळूरमधील 'ट्यूटर-व्हिस्टा' कंपनीने गेल्या नोव्हेंबरपासून यासंदर्भात अमेरिकेत 'ऑनलाइन ट्यूशन' सुरू केल्या आहेत. त्यासाठी महिन्याला फक्त शंभर डॉलर शुल्क असून, भौतिकशास्त्रापासून इतिहासापर्यंत विविध विषयांचे मार्गदर्शन अमेरिकी विद्यार्थ्यांना करण्यात येते. सुमारे एकोणीसशे अमेरिकी विद्यार्थ्यांनी त्यासाठी नोंदणी केली असून, त्यांना प्रामुख्याने गणित, इंग्रजी व विज्ञान विषयांचे मार्गदर्शन हवे आहे. कंपनीने संचालक कृष्णन गणेशन यांनी यासंबंधी म्हटले आहे, 'सर्वाधिक नोबेल पुरस्कार अमेरिकेतील संशोधक मिळवतात; परंतु तेथील शालेय पातळीवरील शिक्षणव्यवस्था तेवढी सक्षम नाही, हा दैवदुर्विलास आहे.'

## * स्टीफन हॉकिंग्स चित्रपटात

स्टीफन हॉकिंग्स हे नाव घेतलं की लगेच आठवतं त्यांचं 'अ ब्रीफ हिस्ट्री

ऑफ टाइम' हे पुस्तक. पण यापुढे हॉकिंग्स यांची एक नवी आणि काहीशी वेगळी ओळख तयार होणार आहे. 'बियाँड द होरॉयझन्स' या चित्रपटातून हॉकिंग्स आपल्या भेटाला येणार आहेत.

हॉकिंग्स आणि इतर कॉस्मॉलॉजिस्टनी मांडलेल्या संकल्पनांवर हा चित्रपट आधारित आहे. यात कॉस्मॉलॉजिकल संकल्पना समजावून सांगणारा हॉकिंग्स यांचा आवाज प्रेक्षकांना प्रथम ऐकू येईल. आणि त्यानंतर एकदम फिल्मी स्टाइलमध्ये व्हीलचेअरवर बसलेले हॉकिंग्स समोर येतील. या प्रसंगाला योग्य परिमाण देण्यासाठी आयमॅक्स थ्रीडी फिल्मचा वापर करण्यात आला आहे.

हॉकिंग्स यांनी सांगितलेल्या विश्वाच्या निर्मितीची माहिती या चित्रपटात मांडण्यात आली आहे. यासंदर्भात 'द टाइम्स' या वृत्तपत्रातील एक पत्रकार हॉकिंग्स यांची मुलाखत घेण्यासाठी जातो आणि त्यातून चित्रपटाची पटकथा पुढे सरकते. स्टार ट्रेकचे पटकथालेखक आणि शास्त्रज्ञ लिओनार्दो माल्दोनिओ या चित्रपटावर सध्या काम करीत आहेत.

### * पाठ्यपुस्तकातूनही भेटणार भारतीय 'सेलिब्रिटीज'

हेलन केलर, नेल्सन मंडेला यांसारख्या पाश्चात्य नामवंतांच्या बरोबरीनेच अस्सल भारतीय 'सेलिब्रिटीज'वरील धड्यांचा समावेश करण्यावर 'बालभारती'ने भर देणार असून, लवकरच नारायण मूर्ती, सचिन तेंडुलकर व नव्यानेच 'बुकर'वर नाव कोरलेल्या किरण देसाई आदींची यशोगाथाही वाचायला मिळेल.

आतापर्यंत महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आदी राष्ट्रीय नेत्यांची यशोगाथा व त्यांच्याशी संबंधित एखादी कथा वा प्रकरण समाविष्ट केले जाई. मात्र, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, आर्थिक आदी क्षेत्रांतील भारताचे कार्यक्षेत्र जसजसे विस्तारत चालले आहे, तसतशी या 'सेलिब्रिटीज'वरील धड्यांतील व्यक्तिमत्त्वे आणि स्वरूपही बदलू लागले आहे. जॉर्ज वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन यांच्या बरोबरीने नववी इंग्रजी भाषेत गानसम्राज्ञी लता मंगेशकर, शास्त्रीय गायक भीमसेन जोशी यांनी आणि सातवी इंग्रजीला गिर्यारोहक सुरेंद्र चव्हाण या भारतीयांनी जागा मिळवली आहे.

यंदापासून पहिली, पाचवी आणि नववीच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात आला. नव्या अभ्यासक्रमात पर्यावरण, विज्ञान आदी विषयांवरील धड्यांचा समावेश आहे. पाठ्यपुस्तकांचे भारतीयीकरण करण्याच्या दृष्टीनेही अभ्यासक्रमात बदल केल्याचे मंडळाचे अध्यक्ष डॉ. वसंत काळपांडे यांनी सांगितले. सेलिब्रिटीजबरोबरच भारतीय कवींच्या कविता, येथील सणांवर आधारित धडे, पर्यावरणाचे प्रश्न यांच्यावरही भर देण्यात आले आहे. तसेच, पाश्चात्य लेखकांबरोबरच चिनी, जपानी कथांनाही स्थान देण्यात आले आहे.



### * विज्ञान आणि साहित्य यांचे एकमेकांशी नाते

कला आणि विज्ञान यांचे एकमेकांशी एक अतूट नाते निर्माण झाले आहे. इंग्रजी साहित्याशीही विज्ञानाने आपली नाळ जोडली आहे. परंतु मराठी साहित्याबाबत हे का घडत नाही, याची खंत आपल्या मनात कायम राहिली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक डॉ. बाळ फोंडके यांनी मुंबई मराठी साहित्य संघाच्या ७१ व्या वर्धापनदिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळ्यात केले.

जैवतंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे सध्या बऱ्याचशा सामाजिक, नैतिक तसेच कायदेशीर समस्या उभ्या राहिल्या आहेत. त्या सोडविण्यासाठी समाजजागृती होणे आवश्यक आहे. त्यासाठी साहित्याचा उपयोग होणे गरजेचे असल्याचे डॉ. फोंडके यावेळी म्हणाले.

कवी विंदा करंदीकर यांचा ज्येष्ठ साहित्यिक पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांनी आपली 'बरगड्यांच्या तुरुंगातून मी हृदयाला मुक्त केले' ही कविता सादर केली. लेखिका विजया राजाध्यक्ष यांनाही साहित्य सेवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मराठी साहित्यातील सर्व ज्येष्ठ साहित्यिकांना या पुरस्काराचे श्रेय देऊन त्या म्हणाल्या की, त्यांच्या साहित्याची ही पुण्याई आहे. त्यांच्या लेखनाचा आणि गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास केल्याचेच हे संचित असल्याचे त्या म्हणाल्या. यावेळी डॉ. अलका मांडके, भालचंद्र पेंढारकर, मोनिका गजेंद्रगडकर यांनाही पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याशिवाय यशवंत कर्णिक यांच्या 'ब्रह्मकमळ' या पुस्तकालाही पुरस्कार देण्यात आला.

### * विष्णुदास भावे यांचे चरित्र

केवळ मराठीतच नव्हे तर देशभरातील रंगभूमीचा पाया रचणाऱ्या आणि कळसूत्री बाहुल्यांचा वापर करून रामायण-महाभारतातील नाटकेही तेवढ्याच ताकदीने सादर करणाऱ्या विष्णुदास भावे यांचे चरित्र ५ नोव्हेंबर २००६ रोजी प्रसिद्ध झाले. याच दिवशी १८४३ मध्ये अठराव्या वर्षी सांगलीमध्ये 'सीता स्वयंवर' सादर केले होते. तब्बल १६३ वर्षांनी त्यांना ही अनोखी श्रद्धांजली मिळणार आहे.

'नाट्यप्रतिभ आद्य नाटककार विष्णुदास भावे' असे या ग्रंथाचे नाव असून त्याचे संपादन भावे यांचे पणतू श्रीराम वासुदेव भावे तसेच रंगभूमीच्या अभ्यासक डॉ. माधवी वैद्य यांनी केले आहे. विष्णुदास भावे यांच्या चरित्रासह नवी माहिती आणि दुर्मिळ रंगीत चित्रे त्यात आढळतील.

आचार्य अत्रे यांच्या आग्रहावरून विष्णुदास भावे यांचे सुपुत्र गणेश यांनी १९४२ मध्ये वडिलांचे चरित्र लिहिले होते. हे चरित्र आउट ऑफ प्रिंट असल्यामुळे त्याच्या मूळ लेखनासह सुधारित आवृत्ती श्रीराम भावे यांनी काढली आहे. शब्दभ्रमकार

रामदास पाध्ये आणि मुखवटे बनवणाऱ्या प्रभाकर भावे यांचे लेखही या पुस्तकात आहेत. नाट्य परिषदेचे अध्यक्ष अभिनेते मोहन जोशी यांनी या पुस्तकासाठी २५ हजार रुपयांची देणगीही दिली आहे.

तंजावरच्या भोसले यांनी सर्वप्रथम मराठी नाटक लिहिले तरीही नाटक हा स्वतंत्र कलाप्रकार त्याच्या व्यावसायिक स्वरूपासह सादर करण्याचे श्रेय हे विष्णुदास भावे यांनाच जाते, असे या ग्रंथाच्या संपादक डॉ. वैद्य यांनी स्पष्ट केले. हिंदुस्थानी नाटकाचे अभ्यासक चंदुलाल दुबे यांनीही भावे केवळ मराठीतीलच नव्हे तर देशातले आद्य नाटककार आहेत, असा निष्कर्ष काढला आहे.

सांगलीच्या चिंतामणराव पटवर्धनांच्या राजाश्रयातून लोकाश्रय मिळवणारे पहिले नाटककार म्हणून भाव्यांचे वेगळेपण आहे. नाटकाचा प्रेक्षकांसाठी खास प्रयोग सादर करण्यासाठी भावे यांनी रंगमंच, अभिनेते, संहिता, तालमी, दौरे, याशिवाय नाटकाचे तिकिट आणि जाहिराती या गोष्टी मराठी रंगभूमीला बहाल केल्या. वडील वासुदेव गणेश भावे यांनी विष्णुदासांच्या मूळ मोडी भाषेतल्या कागदपत्रांचा अभ्यास करून मगच त्यांचे चरित्र लिहिले, असे श्रीराम भावे यांनी सांगितले. रंगमंचावर अभिनय करायला ज्या काळात अभिनेते मिळेनासे झाले तेव्हा 'शो मस्ट गो ऑन' या न्यायानुसार त्यांनी लाकडी कळसूत्री बाहुल्या तयार करून एक नवा इतिहास घडवला. द्रौपदी स्वयंवर नाटकातील द्रौपदीच्या बाहुलीच्या डोळ्यांच्या पापण्यांची उघडझाप करण्याचे त्यांचे कसब भल्याभल्यांना थक्क करून सोडत असे!

## * अमेरिकन ग्रंथपुरस्कारासाठी राजीव चंद्रशेखर यांचे नाव

अमेरिकेच्या 'राष्ट्रीय ग्रंथ पुरस्कारा'च्या संभाव्य विजेत्यांत भारतीय देशाच्या लेखकाचे नाव झळकले आहे.

राजीव चंद्रशेखर हे अमेरिकेत वाढलेले भारतीय पत्रकार आणि सध्या 'वॉशिंग्टन पोस्ट'चे सहायक व्यवस्थापकीय संपादक, इराकमध्ये याच वृत्तपत्राचे 'ब्यूरो चीफ' असताना त्यांनी पाहिलेली अमेरिकनांची तेथील अवस्था सांगणारे, 'इंपीरियल लाइफ इन द एमराल्ड सिटी' या पुस्तकाने अमेरिकी ग्रंथपुरस्कारांच्या 'ललितेतर गद्य' विभागातील पाच संभाव्य विजेत्यांच्या यादीत स्थान मिळवले.

अमेरिकेचा हा सरकारी ग्रंथपुरस्कार दहा हजार डॉलर आणि ब्राँझची ट्रॉफी अशा स्वरूपाचा असतो. संभाव्य यादीत नाव आलेल्या प्रत्येक लेखकाला एक हजार डॉलर्स आणि मेडल मिळते. ललित गद्य, ललितेतर गद्य, कविता आणि बालवाङ्मय अशा चार विभागांतले प्रत्येकी पाच (एकंदर २०) संभाव्य विजेते दरवर्षी ११ ऑक्टोबरला घोषित होतात आणि पुरस्काराची घोषणा १५ नोव्हेंबरला होते. यंदा एकंदर १२५९ पुस्तकांतून या २० पुस्तकांची निवड केली गेली.



## * मराठी भाषेच्या शुद्धतेपेक्षा समृद्धीचा आग्रह हवा

''मराठी ही प्रवाही आणि विकसनशील भाषा आहे. तीत नवनवीन शब्द आले तर काही बिघडत नाही. भाषेच्या शुद्धतेपेक्षा समृद्धीचा आग्रह धरला पाहिजे,'' अशी अपेक्षा ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

'अक्षरधारा' संस्थेच्या तपपूर्तीनिमित्त आयोजित 'मायमराठी' शब्दोत्सवात आयोजित करण्यात आलेल्या 'भाषा, शिक्षण आणि जीवनव्यवहार' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. त्यात मुकुंद संगोराम, समीक्षक प्रा. रा. ग. जाधव, शिक्षणतज्ज्ञ प्रा. रमेश पानसे आणि डॉ. नीलिमा गुंडी यांचा सहभाग होता.

मराठीच्या सध्याच्या दुर्दशेचे विवेचन करताना श्री. संगोराम म्हणाले, ''मराठी वृत्तपत्रे आणि प्रसारमाध्यमांत मराठी टिकून असली, तरी मराठीविषयीचे सार्वत्रिक औदासीन्य वाढते आहे. मराठी नीट आली पाहिजे, ही गोष्ट महत्त्वाची वाटेनाशी झाली आहे. शिक्षणाचा संबंध माणसाच्या जगण्याशी आणि संस्कृतीशी असतो, हे लक्षात घेतले पाहिजे. भाषिक व्यवहारात किमान दर्जाचे पालन झाले पाहिजे.''

प्रा. जाधव म्हणाले, ''मुक्त अर्थव्यवस्था अस्तित्वात आल्यानंतर भाषाशिक्षणाविषयीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सांस्कृतिक जीवनात असलेल्या विरोधाभासामुळे भाषेचे प्रश्न गुंतागुंतीचे बनले. मराठीची दिवसेंदिवस पीछेहाट होताना दिसते आहे. भाषा, शिक्षण आणि जीवनव्यवहार हे घटक एकमेकांवर परिणाम करीत असतात. राष्ट्रीय आणि प्रादेशिक अशा दुहेरी पातळीवर त्यांच्यातील ताण जाणवतात.''

प्रा. पानसे म्हणाले, ''जोपर्यंत शिक्षणाचे प्रश्न सुटत नाहीत, तोपर्यंत भाषेचे प्रश्न सुटणार नाहीत, आपली शिक्षणव्यवस्था मानसशास्त्रावरच उभी आहे, याचे भान ठेवले पाहिजे.''

डॉ. गुंडी म्हणाल्या, ''भाषा ही संज्ञापनव्यवहारात जितकी महत्त्वाची बाब आहे, तितकीच शिक्षणव्यवहारात आहे. प्रमाणभाषेला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. ज्ञानभाषा म्हणून मराठी समर्थ व्हायची असेल, तर पर्यायी अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. वेगवेगळ्या ज्ञानशाखांचे प्रवाह मराठीत आले पाहिजेत.''

## * इंग्रजी ललित लेखक ही मान्यता नाही

'आमचा बाप अन् आम्ही' या पहिल्याच पुस्तकाने प्रचंड यश दिले. जगभरातील १३ भाषांत हे पुस्तक गेले. आता कोरियन भाषेतही येणार आहे. 'आमचा बाप...'चे इंग्रजी पुस्तक ही स्वतंत्र कलाकृती आहे. मात्र, अजूनही आपल्याला इंग्रजी ललित लेखक ही मान्यता मिळालेली नाही, अशी व्यथा या पुस्तकाचे लेखक आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते डॉ. रेखा इनामदार-साने यांच्या 'अस्तित्ववाद आणि मराठी कादंबरी' या पुस्तकास प्रा. रा.

श्री. जोग समीक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आला. वसंत जोशी संपादित 'भाषा आणि साहित्य : संशोधन खंड १'च्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन जाधव यांच्या हस्ते झाले.

'आमचा बाप'चे मराठीमध्ये लेखन करताना आंबेडकरी चळवळीचा सामाजिक आशय गृहीत धरलेला होता. मात्र, इंग्रजीमध्ये हे स्वतंत्रपणे लेखन केलेले आहे. वाचकवर्ग वेगळा असल्यामुळे या पुस्तकाचा दोन पातळ्यांवर विचार करावा लागला. एका पातळीवर ही कुटुंबाची कहाणी आहे, तर दुसऱ्या पातळीवर या कथनाला सामाजिक चळवळीचा धागा असल्याचे जाधव यांनी सांगितले. या पुस्तकाशी निगडीत असलेल्या विजय तेंडुलकर, कुसुमाग्रज आणि पु. ल. देशपांडे यांच्या आठवणींनाप त्यांनी उजाळा दिला.

'आमचा बाप' वाचून आतापर्यंत दहा हजारहून अधिक पत्रे आली आहेत. त्यांचे वर्गीकरण करून एक स्वतंत्र पुस्तक प्रकाशित करण्यात येणार असल्याची माहिती जाधव यांनी दिली. एकाच गोष्टीकडे वेगवेगळ्या रीतीने कसे पहावे हे मला शिकविले. अर्थशास्त्र हा माझा प्रांत आहे. त्यामुळे हा किचकट विषय सोपा व्हावा यासाठी मराठीमध्ये लेखन करणार आहे. कुलगुरुपद आणि अन्य जबाबदाऱ्यांचा व्याप सांभाळून ललित लेखन करण्याची इच्छा त्यांनी यावेळी प्रदर्शित केली.

### * 'डॉ. आंबेडकर' चित्रपट आता नऊ भाषांत

डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित व प्रख्यात अभिनेते मामुटी यांची मुख्य भूमिका असलेला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा चित्रपट मराठीसह नऊ प्रादेशिक भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. त्यासाठी राज्य सरकारतर्फे आणखी एक कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

दरम्यान, हा चित्रपट जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने एअर इंडिया, इंडियन एअरलाइन्स; तसेच भारतीय आयुर्विमा महामंडळातर्फेही आर्थिक मदत करण्यात आली आहे. या चित्रपटाच्या विविध भाषांमधील आवृत्त्या आता देश-विदेशांत प्रदर्शित होणार आहेत.

केंद्र सरकार, राज्य सरकार; तसेच राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या (एनएफडीसी) सहकार्याने या चित्रपटाची सुमारे सहा वर्षांपूर्वी निर्मिती करण्यात आली होती; मात्र त्या वेळी या चित्रपटाची फक्त हिंदी आवृत्ती प्रदर्शित झाली होती; तेव्हा या चित्रपटाला काही राज्यांमध्ये करमुक्तीचे प्रमाणपत्र मिळू न शकल्यामुळे हा चित्रपट देशभर प्रदर्शित होऊ शकला नव्हता. आता हा चित्रपट हिंदीसह मराठी, इंग्रजी, तमीळ, तेलगू, उडिया, गुजराती, पंजाबी आणि बंगाली अशा नऊ भाषांमध्ये 'डब' करण्यात आला आहे. सर्व राज्यांमध्ये आता या चित्रपटाला करमुक्तीचे प्रमाणपत्रही मिळाले आहे.

देशभरातील सुमारे पाचशेहून अधिक चित्रपटगृहांत सध्या डिजिटल तंत्राने



चित्रपट दाखविण्यात येत आहे. या सर्व चित्रपटगृहांमध्ये हा चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहे.

### * आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सव

शाहीर अमरशेख लोकनाट्य कला प्रबोधिनी आणि इंटरनॅशनल लिटरेचर फेस्टिवल बर्लिन यांनी संयुक्तपणे २० ते २५ फेब्रुवारी २००७ या काळात प्रभादेवीच्या पु. ल. महाराष्ट्र कला अकादमीत 'इंटरनॅशनल लिटरेचर फेस्टिव्हल मुंबई २००७' आयोजित केला आहे. प्रसिद्ध कवी नामदेव ढसाळ आणि बर्लिन लिटरेचर फेस्टिव्हलचे संचालक उलरिच श्रायबर यांच्या पुढाकाराने होणाऱ्या या फेस्टिव्हलचे उद्‌घाटन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम करतील.

नुकत्याच झालेल्या बर्लिन येथील साहित्य जत्रेत या महोत्सवाची आखणी केल्याचे ढसाळ यांनी सांगितले. फेस्टिव्हलसाठी चीन, अमेरिका, मेक्सिको, स्पेन, स्वित्झर्लंड, नॉर्वे, जर्मनी, रशिया, लेबनॉन, इस्रायल, पाकिस्तान, चिली आदी देशांतून २५ मान्यवर साहित्यिक येणार आहेत. विंदा करंदीकर, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, मंगेश पाडगावकर, बाबुराव बागुल, दिलीप चित्रे, वसंत आबाजी डहाके, राजा ढाले, रावसाहेब कसबे, प्रज्ञा लोखंडे, अरुण काळे, मल्लिका अमरशेख, अंबरिश मिश्र, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, मेघना पेठे, हेमंत दिवटे आदी सुमारे ४४ मराठी साहित्यिक आणि उर्वरित भारतीय भाषांतील २५ समकालीन साहित्यिकही यात सहभागी होतील. या निमित्ताने काव्यमैफली, साहित्यिक चर्चा, नाट्यप्रयोग असा भरगच्च कार्यक्रम असेल.

देशादेशांतील समविचारी साहित्यिकांनी जगभर स्वातंत्र्य, समता, न्याय, शांतता आणि बंधुता प्रस्थापित करण्यासाठी एका मांडवाखाली एकत्र यावे, हा या फेस्टिव्हलचा हेतू आहे. ''गेली दोन वर्षे मुंबईत उच्चभ्रू वर्ग आणि इंग्रजीतून लेखन करणारे भारतीय लेखक काळा घोडा फेस्टिव्हल भरवतात. पण त्यात गेल्या दोन-तीन पिढ्यांतील तळागाळातून आलेल्या कसदार साहित्यिकांना सामावून घेतले जात नाही. ही नवी अस्पृश्यता या फेस्टिव्हलने जन्माला घातली. सर्वांना सामावून घेणारा व्यापक उद्दिष्टांचा फेस्टिव्हल कसा असतो, हे आम्ही त्यांना दाखवून देऊ.'' असे ढसाळ यांनी म्हटले आहे.

### * प्रेक्षक दिसत नाही... म्हणून खूप अस्वस्थ वाटते.

'पूर्वी लेखकांचा एक विशिष्ट प्रेक्षकवर्ग होता. आज हा प्रेक्षकच दिसत नाही. आजचे जग हे घसरणीचे आहे. सर्वच क्षेत्रांत तिसऱ्या-चौथ्या दर्जाची माणसे आली आहेत. त्यांचे आणि समाजाचे देणेघेणे नाही, इतकी निरर्थक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे कलाकाराचे संपूर्ण जीवनच असुरक्षित वाटतेय. खूप अस्वस्थ होतेय,' असे मनोगत ज्येष्ठ चित्रपट-नाट्यअभिनेते निळू फुले यांनी व्यक्त केले.

'परवाच गिरीश कर्नाड भेटले. त्या वेळी ते म्हणाले, 'आज जे काही नवनवीन सुरू आहे ते फक्त मराठी रंगभूमीवरच.' मराठी नाटकांच्या परंपरेच्या दृष्टीने ही अभिमानाची बाब आहे.

कलाकार म्हणून करिअर करायचे, असे ठरवून मी त्या क्षेत्रात आलो नाही. सेवादलात काम करताकरता नट झालो. अनेक चांगली मंडळी भेटली. अभिनयातील बारकावे सांगितले. अशा काही मंडळींमुळेच प्रगल्भ झालो,' असे त्यांनी सांगितले. 'विनायकराव कुलकर्णी, ग. प्र. प्रधान यांसारखी काही मंडळी भेटली, हे आमचे नशीब. त्यांच्यामुळेच चित्रपट आणि रंगभूमीवर काही तरी करू शकलो. आजही काही चांगले चित्रपट येत असले तरी त्यात फारसे सातत्य नाही,' 'जग बदलत आहे. मात्र, विषयांमध्ये विविधता नाही. आम्ही जगण्यासाठी किती संघर्ष केला, याची तरुण पिढीला कल्पनाच नाही. त्यामुळे सामाजिक विषयावरील चित्रपटांची अपेक्षा करणे गैर आहे. त्यातूनही 'श्वास', 'डोंबिवली फास्ट' अशा चित्रपटांतून समाजातील समस्यांचे चित्रण होत आहे.

पूर्वी नायक-नायिका, दुय्यम कलाकार २५ ते ३० वर्षे जगत होते. आता मात्र नवे हीरो-हिरॉइन आले आले म्हणता, एक-दोन वर्षांत गायब होतात. त्यामुळे आज संपूर्ण जीवनच असुरक्षित वाटतेय. प्रचंड अस्वस्थ होतेय. भविष्यात काय टिकून राहणार आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. आज कशासाठी लढायचे, हेच सांगता येत नाही!'

## * नाट्य अनुदान पद्धतीचा फेरविचार

डबघाईला आलेला मराठी नाट्यव्यवसाय सावरण्यासाठी राज्य सरकारने मंजूर केलेल्या नाट्य अनुदान योजनेत 'काही विशिष्ट निर्मात्यांची धन' होणार असल्याचा आरोप करत योजनेच्या आराखड्यास काही प्रमुख नाट्यनिर्मात्यांनी आक्षेप घेत पर्यायी आराखडा सादर केला आहे. त्यामुळे सांस्कृतिक कार्यमंत्री अशोक चव्हाण यांनी आधीच्या योजनेचा फेरविचार करण्याचे संकेत दिले आहेत.

नांदेडच्या नाट्यसंमेलनात मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी नाट्य व्यवसायासाठी अनुदानाचे पॅकेज घोषित केले होते. विधानसभेच्या गेल्या अधिवेशनात त्याचा वटहुकूमही निघाला होता. ए. बी. सी. डी. अशा चार श्रेण्यांमध्ये निर्मिती संस्थांची वर्गवारी करत त्यानुसार मदत देणाऱ्या या योजनेला विरोध करत मच्छिंद्र कांबळी, राजाराम शिंदे, उदय धुरत या ज्येष्ठ निर्मात्यांनी अशोक चव्हाण यांची भेट घेतली. या योजनेतील पहिल्या श्रेणीचा फायदा दोन-तीन निर्मात्यांनाच होणार असून गेली अनेक वर्षे सातत्याने नाट्यनिर्मिती करणारे निर्माते त्यातून हकनाक वगळले जाणार आहेत, असा त्यांचा प्रमुख आक्षेप आहे.

सरकारने मंजूर केलेल्या योजनेनुसार मागील वीस वर्षांत चाळीस नाटके करणारी निर्माते 'ए' श्रेणीत मांडतील आणि त्यांना प्रयोगामागे पंधरा हजार



रुपयांचे अनुदान शंभर प्रयोगांसाठी मिळेल. पण राजाराम शिंदे, मच्छिंद्र कांबळी, उदय धुरत, लता नार्वेकर हे निर्माते वीस वर्षांहून अधिक काळ निर्मिती करत असले तरी त्यांच्या नाटकांची संख्या चाळीस नाही. त्यामुळे ही मंडळी 'बी' श्रेणीत जाणार आहेत. हा वीस वर्षे आणि चाळीस नाटकांचा नियम सरकारने कोणत्या निकषावर बनवला असा सवाल कांबळी, धुरत, शिंदे यांनी केला आहे.

मागील तीन वर्षांत निर्मात्याचे एकतरी नाटक रंगभूमीवर आले असले पाहिजे, या पात्रता अटीला राजाराम शिंदे यांचा विरोध असल्याचे कळते. अनुदानित नाटकाचे निम्मे प्रयोग मुंबईबाहेर राज्यातील महसुली विभागात समप्रमाणात करण्यात यावेत, ही अटही या निर्मात्यांना जाचक वाटते.

या निर्मात्यांनी अशोक चव्हाण यांना पर्यायी अनुदान योजना दिली आहे. त्यात ए. बी. सी. डी. अशा चार श्रेण्या असून त्यात निर्मिती संस्थांची दहा वर्षांत दहा नाटके व एक हजार प्रयोग, सहा वर्षांत सात नाटके व सातशे प्रयोग, पाच वर्षांत पाच नाटके व पाचशे प्रयोग आणि तीन वर्षांत तीन नाटके आणि तीनशे प्रयोग यानुसार वर्गवारी करण्यात आली आहे. चव्हाण यांनी योजनेचा फेरविचार करण्यासाठी बैठक बोलावण्याचे आश्वासन दिले.

## * अस्सल विनोदी लेखक नाहीत

मराठी रंगभूमीची दुर्दशा झालीय. आज चांगले नाटककार उरलेले नाहीत. विनोदाच्या नावाखाली धिंगाणा चाललाय, असेपरखड मत मांडत समाजात घडणाऱ्या घटनांमधून जगण्याचे भान देणाऱ्या विनोद हडप यांच्यासारख्या नाटककाराची रंगभूमीला उणीव भासत आहे, अशी खंत प्रभाकर पणशीकर यांनी व्यक्त केली.

प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरात आदर्श कला प्रकाशित विनोद हडप यांच्यावरील 'विनोदायन' या पुस्तकाचे प्रकाशन पणशीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी आजच्या तथाकथित विनोदी लेखकांवर हल्ला चढवला. ते म्हणाले की, कोल्हटकर, गडकरी यांच्यासारखा अस्सल विनोद करणारे लेखक आज उरलेले नाहीत. या ज्येष्ठ विनोदी लेखकांनी कोणाचाही उपमर्द न करता विनोदी लेखन केले. आज अशा लेखकांची उणीव भासते. दत्ताजी नलावडे यांनी हडप यांच्याविषयीच्या अनेक आठवणींना उजाळा दिला, तर मोने आणि नाडकर्णी यांनी हडप यांच्या ललित लेखांचे अभिवाचन केले.

## * 'कालिदास' हा विषय चिरतरुण

'कालिदास' हा विषय असा आहे की, त्यावर कुणीही कितीही प्रमाणात बोलू शकतो. त्यामुळे तो कधीच संपणार नाही. 'कालिदास' हा कधीच जुना होणार नाही. कारण हा विषय चिरतरुण आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या विभागप्रमुख डॉ. गौरी माहुलीकर यांनी केले.

'कालिदास आणि स्वभावोक्ती' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. दीपक ज. टिळक होते. यावेळी संस्कृत विभागप्रमुख डॉ. श्रीपाद भट, डॉ. मेहेंदळे उपस्थित होते.

टिमवीमध्ये १९८९ पासून दरवर्षी 'कालिदास' महोत्सव साजरा करण्यात येतो. याअंतर्गत वेगवेगळे कार्यक्रम, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेतल्या जातात. तसेच अनेक तज्ज्ञांची व्याख्याने घेतली जातात. निसर्ग व मानव यांचे अतूट नाते कालिदासाच्या साहित्यामध्ये दिसून येते. शब्दामधून केलेले चित्रण आणि पुरातन काळातील सर्व प्रसंग व घटना डोळ्यासमोर उभे रहावे असे वर्णन त्यांनी साहित्याद्वारे केले आहे. कालिदासाच्या साहित्यामध्ये अनेक भावभावनांच्या छटा दिसून येतात, असे डॉ. माहुलीकर यांनी सांगितले.

### * 'योगिनी जोगळेकरांचे लेखन चांगुलपणाचा शोध घेणारे'

''सद्‌भावनेचा आणि चांगुलपणाचा शोध घेणारे लेखन हे योगिनी जोगळेकर यांच्या शैलीचे वेगळेपण होते,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांनी केले. योगिनी जोगळेकर यांच्या प्रथम स्मृतिदिनी 'कथायोगिनी' पुस्तकाच्या दोन भागांचे प्रकाशन प्रा. मिरासदार यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ अभिनेते-गायक भालचंद्र पेंढारकर अध्यक्षस्थानी होते.

श्री. पेंढारकर यांनी जोगळेकर यांच्या नाट्यलेखनाशी निगडित आठवणींना उजाळा दिला. 'अभिज्ञान मंडळा'च्या सुनीता खाडिलकर, प्रकाशक संजय निलंगे, कथासंपादक सुनेत्रा ओक व रवी पांडे यांचीही भाषणे झाली. श्री. पांडे यांनी 'अक्षरयोगिनी' या मराठी फाँटचे प्रकाशन केले.

श्री. पेंढारकर यांच्यातर्फे 'ललितकलादर्श' तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद या संस्थांना प्रत्येकी ५१ हजार रुपये देण्यात आले. पुणे मराठी ग्रंथालयाला २५ हजार रुपये व जोगळेकर यांचे ११६ ग्रंथ भेट देण्यात आले. याशिवाय फौंडेशन अँड रिसर्च सेंटर (लातूर), भारत गायन समाज आणि विद्यार्थी सहायक समिती या संस्थांनाही देणग्या देण्यात आल्या. स्वाती शहाणे यांनी आभार मानले, तर उर्मिला भांबुरकर यांनी सूत्रसंचालन केले. पूर्वार्धात योगिनीबाईंच्या कथा, कविता, नाट्यपदे, बालगीत यांवर आधारित कार्यक्रम सादर करण्यात आला.

### * द. मा. मिरासदार यांची मुलाखत

'विनोद हा पुराणकथेतील नारदाच्या कळीसारखा असावा, असे मत प्रसिद्ध विनोदी लेखक द. मा. मिरासदार यांनी व्यक्त केले.

पुणे बुक फेअरमध्ये प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मिरासदार यांची मुलाखत नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे आणि प्रा. मिलिंद जोशी यांनी घेतली.



मिरासदार म्हणाले की, ज्याप्रमाणे नारदाने पुराणात विनोद केले व वितुष्ट निर्माण केले, परंतु त्यातून अंतिमतः चांगल्याच गोष्टींची फलनिष्पत्ती झाली, त्याप्रमाणे विनोद असावा.

समाजामध्ये असणाऱ्या विसंगती दिसणे, हे विनोदी लेखकाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते, तसेच विनोदी लेखकाकडे स्वतःची शैली असणे आवश्यक असते, असे लेखन अलीकडे आढळत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. आपण विनोदी लेखक कसे झालात? या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, लहानपणी वाचनाची आवड होतीच. त्याचबरोबर लहानपण पंढरपुरात गेले. वडिलांचा वकिलीचा व्यवसाय होता. निरनिराळ्या खटल्यातील प्रसंगामुळे विनोदी लेखन करण्याची स्फूर्ती मिळाली.

### * बालगंधर्वांवर भा. द. खेर यांची कादंबरी

मराठी संगीत रंगभूमीला पडलेले 'पहाटस्वप्न' असणाऱ्या नटश्रेष्ठ बालगंधर्व यांची जीवनकहाणी 'मी एक राजहंस' या नावाने 'विहंग प्रकाशना'तर्फे लवकरच प्रकाशित होणार आहे.

लेखक भा. द. खेर म्हणाले, ''बालगंधर्वांच्या जीवनावर लेखन करण्याचे संकल्प १९७० मध्ये मी केला होता. आयुष्याचे चिंतन, संशोधन, घटना, गंधर्वांच्या जवळच्या व्यक्ती आणि मला स्वतःला घडलेला त्यांचा सहवास, यांची जुळवाजुळव सुरू होती. गंधर्वांनी स्वतःच्या रूपाने, गायनाने, अभिनयाने आणि सौजन्यपूर्ण आचरणाने अनेक आदर्श निर्माण केले. मराठी संगीत रंगभूमीचे ऐश्वर्य त्यांनी निर्माण केले, ते कळसाला पोहोचवले. नाटकासह चित्रपट आणि खुल्या मैफलीची माध्यमेही त्यांनी हाताळली. हे सारे पैलू सामावणारा गंधर्वांचा हा जीवनपट मी शब्दबद्ध केला आहे.''

### * शाहीर हिंगे प्रबोधिनीस अनुदान

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे नुकतेच शाहीर हिंगे लोकला प्रबोधिनीस पंचवीस हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले. सांस्कृतिक आणि शाहिरी क्षेत्रात केलेल्या विशेष कार्याबद्दल हे अनुदान देण्यात आले. सांस्कृतिक मंत्री अशोक चव्हाण यांनी प्रबोधिनीचे अध्यक्ष शाहीर हेमंत मावळे यांच्याकडे अनुदानाचा धनादेश नुकताच सुपूर्त केला.

### * 'दर्जाहीन भाषांतरामुळे मराठी साहित्य दुर्लक्षित'

चांगल्या दर्जाचे भाषांतर करणाऱ्या व्यक्तींच्या कमतरतेमुळेच जगामध्ये मराठी साहित्य दुर्लक्षित झाले असून, इतर भाषांचे 'जागतिकीकरण' होत असताना मराठीची मात्र पीछेहाट होत आहे, अशी खंत ज्येष्ठ साहित्यिक दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी व्यक्त केली.

पुणे विद्यापीठाचा परदेशी भाषा विभाग आणि गोईथे (गटे) सोसायटी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'भाषांतर आणि संस्कृती' या विषयावर आयोजित चर्चासत्रात त्यांचे बीजभाषण झाले. या चर्चासत्रात भारत व जर्मनीमधील साहित्यिक, भाषातज्ज्ञ सहभागी झाले होते. जर्मनीमधील फ्रँकफर्ट येथे नुकत्याच झालेल्या जागतिक पुस्तक मेळाव्यामध्ये चित्रे सहभागी झाले होते. त्या संदर्भातील अनुभव सांगताना ते म्हणाले की, यंदाच्या मेळाव्यामध्ये मात्र भारतीय पुस्तके, साहित्य आणि संस्कृतीसंदर्भात कमालीची उत्सुकता जाणवली, परंतु भारतीय प्रादेशिक भाषांपेक्षा भारतामधील इंग्रजी साहित्यिकांसंदर्भातच आंतरराष्ट्रीय साहित्यप्रेमींमध्ये उत्सुकता जाणवली. भारतीय भाषांमधील साहित्याचे मोठ्या प्रमाणात व चांगल्या दर्जाचे भाषांतर करण्याची गरज आहे. या मेळाव्यामध्ये मराठी पुस्तके व लेखकांच्या साहित्यकृतींना देखील फारसे स्थान नव्हते. पुरेशा प्रमाणात भाषांतर होत नसल्यानेच ही वेळ आली आहे. अन्यथा आपल्याकडील साहित्य कोणत्याही आंतरराष्ट्रीय भाषेच्या तोडीस तोड आहे, असेही चित्रे यांनी स्पष्ट केले.

या पुढील काळात इंग्रजी ही एकमेव जागतिक भाषा ठरणार आहे. त्यामुळेच भारतीय भाषांप्रमाणेच युरोपमधील भाषिक साहित्यालाही भाषांतराची समस्या भेडसावत आहे.मराठीप्रमाणेच जर्मन भाषेतही दर्जेदार साहित्यनिर्मिती करण्यात आली असली, तरी केवळ भाषांतर न झाल्याने ती युरोपपुरतीच मर्यादित राहिली आहे, असेही चित्रे यांनी सांगितले.

वाङ्मयीन कलाकृती एका भाषेतून दुसऱ्या भाषेत नेताना दोन्ही भाषांवरील प्रभुत्व तर लागतेच; पण त्या भाषक समाजाच्या संस्कृतीचीही सखोल जाण असावी लागते, असे विचार प्रा. नितीन गुप्ते यांनी व्यक्त केले.

## * नरेंद्र दाभोलकर 'दशकोत्तम' कार्यकर्ते!

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची महाराष्ट्र फौंडेशनने गेल्या दशकातील सर्वोत्तम कार्यकर्ता म्हणून निवड केली आहे. त्यांना यासाठी दहा लाख रुपये रकमेचा एक खास पुरस्कार न्यू जर्सी येथे ४ नोव्हेंबरला प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र फौंडेशन दरवर्षी महाराष्ट्रातील प्रमुख सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव करते. या उपक्रमाचे हे दहावे वर्ष त्यानिमित्ताने हा विशेष पुरस्कार देण्याचे ठरले आणि त्यासाठी डॉ. दाभोलकर यांची निवड झाली. न्यू जर्सीत फौंडेशनचे अध्यक्ष सुनील देशमुख, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या उपस्थितीत पुरस्कार दिला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्यात १८० शाखा असून सध्या विधिमंडळासमोर असलेले जादुटोणाविरोधी विधेयक तयार करण्यात समितीने पुढाकार घेतला होता. डॉ. दाभोलकर साने गुरुजी यांनी स्थापलेल्या 'साधना' या साप्ताहिकाचे संपादकही आहेत.



## * 'पारमार्थिक व आध्यात्मिक संकल्पनेपुरताच धर्म मर्यादित'

"धर्म म्हणजे जीवनपद्धती, ही रूढ अर्थाने धर्माची कल्पना राज्यघटनेला मान्य नाही. पारमार्थिक व आध्यात्मिक संकल्पनेपुरताच धर्म मर्यादित असून, इहलोकीच्या धर्माबद्दल घटनेने घालून दिलेले कायदेकानून श्रेष्ठ ठरतात व ते मान्य करणे म्हणजेच सेक्युलरिझमचा पुरस्कार करणे होय," असे प्रतिपादन श्री. शेषराव मोरे यांनी केले.

इतिहासकार व पत्रकार स. मा. गर्गे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त 'भारतीय राज्यघटनेने धर्मस्वातंत्र्य दिले आहे तरी किती?' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी भाषा संचालक यशवंतराव कानिटकर होते. प्रारंभी डॉ. सुरेश खुरसोळे यांनी प्रास्ताविक केले. सेक्युलरिझमची संकल्पना पाश्चात्य असून घटनेत ती मुळात नसल्याचा समज चुकीचा असल्याचे सांगून प्रा. मोरे म्हणाले, "डॉ. आंबेडकरांनी घटनेच्या पंचविसाव्या कलमात धर्म व सेक्युलरिझमचा उल्लेख केला आहे. घटनेच्या प्रियंबलमध्ये तो १९७० नंतर आला, हे खरे. घटनेतील तरतुदीनुसार धर्माचे पालन करता येत असले, तरी कायदा व सुव्यवस्था, आरोग्य, नीतिमत्ता व दुसऱ्यांचे मूलभूत हक्क यांच्या अधीन राहून धर्माचे पालन करावे, असे बंधन घटनेने घातले आहे. इहलौकिक व पारलौकिक धर्माची वेगवेगळी विभाग्रणी घटनेने केली असून, तीच सेक्युलरिझमला अभिप्रेत आहे. तशीच मांडणी सर्वांनी केली पाहिजे म्हणजे धर्म-धर्मात होणारी भांडणे दूर होतील."

## * 'आभासी नेटसृष्टी'साठी आता 'रॉयटर्स'ची वृत्तसेवा!

इंटरनेटवर तासन् तास घालवणाऱ्यांसाठी 'सेकंड लाइफ' हा परवलीचा शब्द आहे. ही एक 'आभासी नेटसृष्टी' असून, या जगात संगणक वापरणारे स्वत:चे नाव तयार करतात, तिला रूप देतात, या 'नेटसृष्टी'तील इतर आभासी व्यक्तिरेखांशी संपर्क साधतात आणि चक्क 'मालमत्ता'ही तयार करतात.

या 'आभासी नेटसृष्टी'मध्ये आता अनेक कंपन्या शिरकाव करत असताना तेथील आभासी बातम्या देण्यासाठी आता 'रॉयटर्स'ने चक्क वृत्तसंस्था सुरू केली आहे. 'सेकंड लाइफ'साठी 'रॉयटर्स'ने खास तयार केलेल्या या वृत्तसेवेचा ई-पत्ता http://secondlife.reters.com असा आहे. त्यात या 'आभासी नेटसृष्टी'तील व्यक्तिरेखांबाबत बातम्या, मुलाखती, छायाचित्रे, ध्वनिचित्रफिती इत्यादी गोष्टी असतील. ॲडम पॅसिक हे लंडनमधील वार्ताहर या आभासी वृत्तसंस्थेचे प्रमुख असतील. त्यासाठी त्यांनी ॲडम रॉयटर्स असे नाव घेतले आहे. "ही बाब थोडी विचित्र वाटली, तरी प्रत्यक्ष जगातील वार्तांकनाप्रमाणेच हे काम असेल," असे ते म्हणाले.

तरुण पिढीच्या गरजा ओळखून, 'रॉयटर्स'ने ही सेवा सुरू केली आहे, असे कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी टॉम ग्लोसर यांनी सांगितले. या वेबसाइटवर

गेले, की 'सेकंड लाइफ'चे नागरिक 'रॉयटर्स ॲट्रिअम' या कम्युनिटीत जाऊ शकतात आणि आभासी; तसेच प्रत्यक्ष जगातील बातम्यांवर चर्चाही करू शकतात.

*** 'सेकंड लाइफ'**

सॅन फ्रान्सिस्कोमधील लिंडन लॅबने तयार केलेला हा एक प्रकारचा संगणकीय खेळ आहे; मात्र गेल्या काही दिवसांत त्याने इतका प्रचंड प्रतिसाद मिळवला आहे, की त्याची उलाढाल लाखो डॉलरपर्यंत जाऊन पोहोचली आहे. या 'नेटसृष्टी'त सिमसिटी नावाच्या आभासी शहरात या सर्व व्यक्ती 'राहतात'. या शहराचे तब्बल नऊ लाख नागरिक आहेत. हे नागरिक तिथे घरे 'बांधतात', स्वत:चा समाज 'तयार करतात' आणि वेगळे आयुष्य 'जगतात'. सर्वसामान्य माणसाला चक्रावून टाकणाऱ्या या जगातील आभासी नागरिक रोज सरासरी साडेतीन लाख डॉलर खर्च करतात. या 'नेटसृष्टी'तील 'नागरिक' जमिनी, वस्तू आणि इतर सेवा 'खरेदी करतात आणि विकतात'. त्यासाठी ते 'लिंडेन' नावाचे चलन वापरतात. हे चलन खऱ्या अमेरिकी डॉलरमध्ये रूपांतरित करणारी ऑनलाइन बाजारपेठ असल्याने या आभासी व्यवहारांद्वारे प्रत्यक्ष रक्कम कमावता येते.

*** 'एक्सप्रेस वृत्तसमूह' आणि 'इकॉनॉमिस्ट'यांच्यात सहकार्य करार**

नि:पक्षपाती आणि धडाडीच्या वार्तांकनासाठी देशात आघाडीवर असलेला 'एक्सप्रेस' वृत्तसमूह आणि 'द इकॉनॉमिस्ट' यांच्यात सामंजस्य करार झाला असून त्यामुळे भारतातील वाचकांना जागतिक महत्त्वाच्या आर्थिक आणि राजकीय घडामोडी अल्पावधीत उपलब्ध होतील.

या करारानुसार 'द इंडियन एक्सप्रेस' आणि 'द फिनान्शिअल एक्सप्रेस' ही वृत्तपत्रे 'इकॉनॉमिस्ट'ने दिलेल्या जागतिक स्तरावरील बातम्यांना प्राधान्याने स्थान देणार असून त्यासाठी काही पाने राखीव ठेवणार आहे. जागतिकीकरणाच्या वातावरणात भारतीय वाचकांना बहुमोल माहितीचा खजिना हाती लागणार आहे. 'द इकॉनॉमिस्ट'ने प्रसिद्ध केलेली विशेष वार्तापत्रेही उपलब्ध होतील.

या कराराबाबत बोलताना 'एक्सप्रेस' वृत्तसमूहाचे सीईओ शेखर गुप्ता म्हणाले की, सध्याच्या जागतिकीकरणाच्या माहौलमध्ये देशात काय घडत आहे याचीच वार्तापत्रे प्रसिद्ध करून आपल्या वृत्तपत्रांना समाधान मानता येणार नाही. जागतिक आर्थिक घडामोडींचा तौलनिक मागोवा घेण्याची सवयही लावली पाहिजे. या करारान्वये भारतीय वाचकांना जागतिक स्तरावरील बातम्या आणि विचार तत्परतेने १९३२ साली 'इंडियन एक्सप्रेस वृत्तसमूहा'ची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि स्वातंत्र्यपूर्व काळापासून हा समूह भारतीय आशा-आकांक्षा आणि अस्मितेचे प्रतीक मानला जातो. गेल्या ७४ वर्षांमध्ये या समूहाच्या आता ३५ राष्ट्रीय आवृत्त्या झाल्या असून १४ ठिकाणांहून या वृत्तसमूहाची दैनिके प्रसिद्ध होतात.



सात भारतीय भाषांमधील दैनिकांद्वारे हा समूह देशातील दोन कोटी जनतेशी संवाद साधतो. 'द फिनान्शिअल एक्सप्रेस'ची सुरुवात १९६१ साली झाली आणि आजपर्यंत या वृत्तपत्राने विश्वासार्ह आणि स्वतंत्र पत्रकारितेचा ठसा उमटविला आहे. जगभरातील राजकीय नेते आणि उद्योगपती आपली मते बनविण्यासाठी 'द इकॉनॉमिस्ट' आवर्जून वाचतात. त्यामुळेच 'एक्सप्रेस वृत्तसमूह' आणि 'द इकॉनॉमिस्ट' यांच्यातील सहकार्य करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

*** मुंबईतही 'ऑक्सफर्ड'**

परदेशी शिकायला जाताना प्रत्येक विद्यार्थ्याची इच्छा असते ती ऑक्सफर्डमध्ये शिकायची. जागतिक स्तरावर 'ऑक्सफर्ड' या नावाला वेगळेच वलय आहे. या ऑक्सफर्डचे बिझनेस स्कूल नवीन 'बिझनेस रिसर्च सेंटर' सुरू करण्यासाठी मुंबईचा विचार करत आहे. ऑक्सफर्डचे इंग्लंडबाहेरचे हे पहिलेच केंद्र असेल.

हे सेंटर पुढच्या वर्षीपर्यंत कार्यान्वित होणार असून त्यात सुमारे ७० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. भारतातील पायाभूत सुविधा, शिक्षणक्षेत्र, व्यावसायिक कररचना अशा विविध बाबींचा अभ्यास हे केंद्र करेल, असे बिझनेस स्कूलचे डीन प्रो. कोलीन यांनी सांगितले.

भारताची वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था हा परदेशी लोकांसाठी अभ्यासाचा विषय आहे. भारतीयांसाठी इथे अजूनही अनेक आव्हाने आहेत. त्यामुळे भारताच्या या प्रगतीकडे जगाचे लक्ष वेधणे, इथल्या पायाभूत सोयी व शिक्षणक्षेत्रातल्या आवश्यक सुधारणांविषयी धोरणकर्ते व उद्योगजगताला मार्गदर्शन करणे असे दुहेरी कार्य हे केंद्र करू शकेल, असा विश्वास मेयर यांनी व्यक्त केला.

केंद्राशी संलग्न स्टडी सेंटर ऑक्सफर्डमध्येही असेल. या केंद्राच्या सल्लागार बोर्डाच्या रचनेविषयी विचार सुरू आहे. भारतातले धोरणकर्ते आणि प्रमुख व्यावसायिक यांना या बोर्डात स्थान असेल. भारतात उद्योजकीय कौशल्याची वानवा नसून ऑक्सफर्डला फक्त या क्षमतेला पैलू पाडावे लागतील, असे ते म्हणाले.

*** ग्रंथालयांसाठी नवी नियमावली**

नवीन ग्रंथालय सुरू करण्यासाठी चाळीस हजार रुपये किमतीची किमान तीनशे पुस्तके विकत घेण्याची अट नव्या शासननिर्णयाने लागू करण्यात आली आहे. त्यामुळे गल्लीबोळातील ग्रंथालय स्थापनेच्या प्रयत्नांना खीळ बसणार आहे.

या निर्णयानुसार ग्रंथालय सुरू करणे व ग्रंथालयांना वर्गवाढ देणे याबाबतचे नियम बदलले आहेत. नवी नियमावली व गुणांकन जाहीर करण्यात आले आहे. राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि. १४ सप्टेंबर २००६ रोजी शासननिर्णय क्र. मराग्र २००६/१२२.०६ साशि ५ या निर्णयान्वये नवे नियम आहेत. त्यामुळे दरवर्षी जाहीर केलेल्या तारखांना अशा प्रकारची मान्यता व वर्गवाढ मिळणार

आहे. अशासकीय अनुदानित ग्रंथालयांना दर्जावाढ देण्याच्या ग्रंथालय संचालनालयाच्या कार्यपद्धतीबाबत अनेक तक्रारी शासनदरबारी करण्यात आल्या होत्या. त्यामुळे ही नवीन नियमावली लागू करण्यात आली आहे.

'ड' वर्गातील ग्रंथालयांच्या नोंदणीसाठी यापुढे किमान ३०० ग्रंथ व त्यांची छापील किंमत किमान ४० हजार रुपये असावी, सलग तीन वर्षे लेखापरीक्षण केले असावे व दर्जावाढीसाठी प्रत्येकवेळी ५०० रुपये शुल्क आकारणी बंधनकारक करण्यात आली आहे.

मान्यता व दर्जावाढीचे गुणांकन करण्यासाठी जिल्हापातळीवर जिल्हा शासकीय ग्रंथालयाचा ग्रंथपाल किंवा त्यांचा 'ब' दर्जाचा प्रतिनिधी, जिल्हा नियोजन अधिकारी किंवा त्यांचा 'ब' दर्जाचा प्रतिनिधी, विभागीय सहाय्यक ग्रंथालय संचालनालयाचा निरीक्षक अशी समिती स्थापन करण्यात आली आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे विभागीय उपसंचालक, महसुली विभागातील शासकीय महाविद्यालयाचा ग्रंथपाल, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा ग्रंथपाल व विभागीय सहाय्यक ग्रंथपाल, संचालक यांच्या समितीने तपासणी केल्यानंतर राज्यस्तरीय छाननी समितीपुढे हा प्रस्ताव जाणार आहे. या समितीत ग्रंथालय संचालकांसह सहा जणांचा समावेश असेल.

दर्जावाढ व मान्यतेसाठी दरवर्षी १० मे रोजी जाहिरात प्रसिद्ध केली जाईल. ग्रंथालयांनी प्रस्ताव पाठविण्याची मुदत ३० जूनपर्यंत असून विभागीय कार्यालयांनी १५ जुलैपर्यंत जिल्हा समितीला प्रस्ताव उपलब्ध करून द्यायचा आहे. त्यानंतर ३० ऑगस्टपर्यंत जिल्हा समिती गुणांकन करून १५ ऑक्टोबरपर्यंत विभागीय समिती छाननी व गुणांकन देणार आहे. दि. १५ डिसेंबरपर्यंत राज्यस्तरीय समितीने प्रस्तावांची छाननी करायची असून ३१ जानेवारीपर्यंत राज्य शासनाने गुणवत्ता व उपलब्ध निधी पाहून निर्णय घेणे, असे वेळापत्रक ठरविण्यात आले आहे.

दर्जावाढ व मान्यतेसाठी प्रत्येकी १०० गुणांचे गुणांकन असून वाचकसंख्या, ग्रंथसंख्या, इमारत, उपलब्ध मासिके व वर्तमानपत्रे यावर गुणांकन आधारित आहे. शासनाच्या या निर्णयामुळे ग्रंथालयांच्या संख्येवर मर्यादा येणार असून खऱ्या अर्थाने उच्च दर्जाच्या ग्रंथालयांना न्याय मिळणार आहे.

### * समाजाचीच लाइफस्टाइल निरोगी हवी

मधुमेह, ब्लडप्रेशर आणि हृदयरोग यांची देशात महासाथ आली असून 'आरोग्यदायी लाइफस्टाईल' बरोबरच निरोगी सामाजिक वातावरणाची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी केले.

महाराष्ट्र ज्ञान विज्ञान महामंडळातर्फे डॉ. अभय आणि राणी बंग यांच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला गणेश कला क्रीडा मंचदेखील अपुरा पडला. डॉ. आनंद नाडकर्णी यांनी घेतलेल्या या मुलाखतीत 'सर्च'च्या कामाच्या आढाव्यापासून ते बालमृत्यू कमी करण्याच्या विख्यात 'गडचिरोली पॅटर्न'पर्यंत आरोग्याच्या अनेक प्रश्नांबद्दल बंग दांपत्य भरभरून बोलले. उपस्थितांनीदेखील त्यांना मनापासून दाद दिली. ज्येष्ठ लेखक डॉ. अनिल अवचट व्यासपीठावर उपस्थित होते.

हृदयरोग हा जगभरात वाढत असून फ्लेमिंगहॅममध्ये गेल्या ५८ वर्षांत केवह हृदयरोगावर संशोधन सुरू आहे. तरुणवयात त्याची लागण होण्याचे प्रमाण चिंताजनक असल्याचे सांगून अभय बंग म्हणाले की भारतात हृदयरोगाबरोबरच ब्लडप्रेखर आणि मधुमेह यांची केवळ साथच नव्हे तर महासाथ आली आहे. हे रोग झाल्यानंतर उपचार करणे महाग पडते. त्यासाठी ते होणारच नाहीत याची काळजी महत्त्वाचे आहे. त्यासाठीची लढाई एकट्याला लढणे अवघड जाते. निरोगी जगण्यासाठी सामाजिक वातावरण अनुकूल बनवण्याची गरज असून त्यासाठी संपूर्ण भारताने निरोगी जगण्याची लढाई लढली पाहिजे. घातक आहार, सवयी बंद करायलाच हव्यात. वाढत असणाऱ्या पोटाच्या घेराकडे विशेष लक्ष हवे. त्यासाठी चालणे, योगासने याचा नियमित व्यायाम हवा. एकूणच व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर 'निरोगी लाइफस्टाईल' स्वीकारण्याची गरज आहे. याबाबत मध्यमवर्गात बऱ्यापैकी जागरुकता होत असल्याचे निरीक्षणही त्यांनी नोंदवले.

'माझा साक्षात्कारी हृदयरोग' या बंग यांच्या पुस्तकाचा विषय निघाला असता निरोगी जीवनपद्धती स्वीकारूनदेखील दहा वर्षांनी परत हृदयरोग झाल्याचे त्यांनी सांगितले. अँजिओप्लॅस्टी करून घेतल्यानंतर आता हृदय ठणठणीत असले तरी मला पुन्हा हृदयरोग का झाला, असा सवाल स्वत:लाच विचारत आपणच कुठेतरी कमी पडल्याची प्रांजळ कबुली त्यांनी दिली. ख्यातनाम डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मी विशिष्ट जीवनपद्धती अंगिकारली नसती तर मला दुसऱ्याच वर्षी पुन्हा हृदयरोग झाला असता. हे दहा वर्षांवर गेले... त्यामुळे सांगितलेल्या लाईनवर टिकून रहा, असा सल्लाही दिला.

अर्भकमृत्यूदर कमी करण्यासाठी 'गडचिरोली पॅटर्न' संपूर्ण देशभरात लागू करण्याचे आदेश पंतप्रधानांनी दिल्याची माहिती देऊन याबाबत महाराष्ट्राने चांगले काम केले असले तरी बालमृत्यू कुठे, किती आणि कसे झाले हे सरकारने सांगितले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. देशातील अर्भकमृत्यू ३० वर आणण्याचे केंद्राचे उद्दिष्ट असून पाच राज्यांमध्ये तीन लाख आरोग्यदूत नेमण्याचे निश्चित झाले आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

### * नोकरी व लेखन यातूनही समाजकार्य साधता येते

बँकेतील नोकरी आणि साहित्य क्षेत्राच्या माध्यमातूनच आपल्याला समाजकार्य करता आले, असे मनोगत श्याम भुर्के यांनी व्यक्त केले.

षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त आयोजित सत्कार समारंभात भुर्के बोलत होते. यावेळी ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार, व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक डी. एस. कुलकर्णी आदी उपस्थित होते. याच कार्यक्रमात शरद तळवलकरांवर आधारित 'गुदगुल्या' या सीडीचे आणि 'पुणं एक साठवण' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना भटकर यांनी सांगितले की, भुर्के यांनी कामातून निवृत्त न होता अनुभवाचा उपयोग ग्रामीण बँकिंग क्षेत्रात करण्यासाठी यापुढे प्रयत्न करावा. जीवनात विनोदबुद्धी आवश्यक आहे असे मिरासदार यांनी सांगितले. बँकेत आलेल्या प्रत्येक माणसाला काहीतरी भावना असतात हे लक्षात ठेवून आपणच कार्य केले.

### * क्रांतिकारक वासुदेव बळवंत यांच्या हस्ताक्षरातील गुरुचरित्र

स्वराज्याची शपथ घेताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या लेखी भवानी तलवारीचे जेवढे महत्त्व आहे, तेवढेच आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या दृष्टीने स्वहस्ते लिहिलेल्या गुरुचरित्राचे होते. ही पोथी लिहिल्यानंतर मगच वासुदेव बळवंतांनी ब्रिटिशांविरुद्ध उठाव केला, असे प्रतिपादन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी केले. फडके यांची सून उमाबाई यांनी १९८३ मध्ये पुरंदरेंकडे सुपूर्त केलेली ही पोथी त्यांनी राज्य गुन्हे अन्वेषण विभागातील (सीआयडी) वासुदेव बळवंतांच्या स्मारकात ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलिस महासंचालक जयंत उमराणीकर यांच्याकडे नुकतीच सोपवली. निमित्त होते ते वासुदेव बळवंतांच्या १२३ व्या जयंतीचे.

संगम पुलाजवळील सीआयडीच्या आवारात पूर्वी सेशन कोर्ट भरत असे. तिथेच वासुदेव बळवंतांना सहा महिने तुरुंगात ठेवले होते. याच कोर्टाने राजद्रोहाबद्दल त्यांना काळ्या पाण्यासाठी एडनला पाठवण्याची शिक्षा सुनावली होती. त्यामुळेच वासुदेव बळवंतांच्या १६१ व्या जन्मदिनी या सीआयडीमध्ये एक भव्य स्मारक उभारण्यात आले आहे.

भारतीय स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासात वासुदेव बळवंतांच्या मूळ हस्ताक्षरातील ही पोथी हे एक दुर्मिळ ऐतिहासिक दस्तऐवज आहे, असे सांगून पुरंदरे म्हणाले की, देशधर्मरक्षणाची पुनर्स्थापना करण्यासाठी ही पोथी त्यांनी स्वत: लिहून काढली. आनंदमठ कादंबरीत 'वंदे मातरम्' हे राष्ट्रीय गीत लिहिणाऱ्या बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांना वासुदेव बळवंतांमुळेच प्रेरणा मिळाली होती.

वाचन संस्कृतीपासून लांब चाललेल्या आजच्या पिढ्यांसाठी वासुदेव बळवंतांच्या चरित्रापासून प्रेरणा मिळावी, यासाठी एक स्वतंत्र वेबसाईट काढण्याची सूचना उमराणीकर यांनी केली. यानिमित्त वासुदेव बळवंतांच्या वापरातील इतर वस्तूही या स्मारकात ठेवण्यात येणार आहेत. तसेच 'साऊंड अँण्ड लाईट' शोचे आयोजनही करण्यात येईल, असे फडके स्नेहसंवर्धिनीच्या दिगंबर फडके यांनी सांगितले. ते म्हणाले की, पालिकेच्या पुणे दर्शन बससाठी वासुदेव बळवंतांचे स्मारकाचाही समावेश करण्यात यावा, अशी मागणी केली असल्याचे ते म्हणाले. वासुदेव बळवंतांवरील सिनेमा प्रसिद्ध अभिनेते रमेश देव काढणार असून त्याची जुळवाजुळव करण्याचे काम सध्या चालू आहे. त्यातील क्रांतिकारकाची मध्यवर्ती भूमिका अजिंक्य देव करणार आहेत, असेही फडके यांनी सांगितले.

### * 'संवेदनशीलता वाढवण्यासाठी वाचनसंस्कृती उपयुक्त'

''मनुष्यातील संवेदनशीलता वाढवण्यासाठी वाचनसंस्कृतीची जोपासना गरजेची आहे. माणूस म्हणून अधिक चांगले जगता येण्यासाठी वाचन हवेच,'' असा सूर 'वाचनविचार- काल, आज आणि उद्या' विषयावरील परिसंवादात प्रकट झाला. प्रसिद्ध अभिनेते विक्रम गोखले, वात्रटिकाकार रामदास फुटाणे आणि प्रसिद्ध लेखिका मेघना पेठे यांचा त्यात सहभाग होता.

'अक्षरधारा'च्या 'मायमराठी शब्दोत्सवा'त या तिघांना निवेदक सुधीर गाडगीळ यांनी बोलते केले.

''लहानपणच्या 'चंदामामा'पासून नाटकाची संहिता इथपर्यंत वाचनाला प्रवास झाला,'' असे नमूद करून गोखले म्हणाले, ''मी अक्षरश: दगड होतो आणि वाचनामुळेच इथवर आलो. डॉ. लागू यांच्या 'लमाण'प्रमाणे आत्मपर पुस्तक लिहिण्यास नुकतीच सुरुवात केली आहे. बबन प्रभू, द. मा. मिरासदार, वि. आ. बुवा आदी लेखकांचा विनोद मला आवडत असे. पण पुढेपुढे पुनरुक्तीमुळे या लेखकांचे साहित्य आवडेनासे झाले. अगदी पुलंसुद्धा याला अपवाद नव्हते. जे आवडले किंवा खटकले, ते लेखकाला कळवण्याचा अधिकार प्रत्येक वाचकाला असला पाहिजे.

पेठे म्हणाल्या, ''वाचनाचे पहिले संस्कार 'मृत्युंजय'ने केले. साहित्याबरोबरच माणसे आणि परिस्थिती वाचत गेले. सुरुवातीपासून आजतागायत आवडलेले लेखक म्हणजे तेंडुलकर. मी स्वत:ला त्यांच्याशी जोडून घेऊ शकते. काही पुस्तके सतत आवडत राहतात. त्यामागे कृतज्ञता आणि स्मरणरंजनासारखी कारणे असतात. वाचक म्हणून मला काहीच संपूर्णपणे आवडते असे नाही किंवा नावडते असेही नाही. वाचनाला मी एक सहनिर्मितीची प्रक्रिया मानली. वाचनाचा उपयोग जगण्याला पूरक म्हणून झाला पाहिजे.

फुटाणे म्हणाले, ''द. मा. मिरासदार, दत्तू बांदेकर असे लेखक आणि 'नवयुग', 'मराठा'तील लेखन हाच लहानपणीचा वाचनाचा संस्कार होता. आचार्य अत्रे यांच्या 'मी कसा झालो' पुस्तकातून लेखनाची प्रेरणा मिळाली. राजकीय व्यंगकवितांची प्रेरणा आचार्य अत्रेच आहेत. सत्ताधाऱ्यांच्या वर्तनातील विसंगती

वात्रटिकांमधून टिपण्याचा प्रयत्न केला. इंग्रजी न शिकल्यामुळे सामान्यांच्या भाषेत लिहू शकलो.

### * मणिपूर विद्यापीठ सिनेटवर डॉ. गोवारीकर

मणिपूर विद्यापीठाच्या सिनेट (कोर्ट)वर राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर यांची तीन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

खुद्द राष्ट्रपतींनी ही नियुक्ती केली आहे. मणिपूर विद्यापीठास केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा देण्यात आल्याने राष्ट्रपतींना विद्यापीठाच्या सिनेटवर आपला प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्याचा अधिकार असतो.

ईशान्य भारतातील सध्याची परिस्थिती अस्थिर आहे. त्यामुळे तेथील परिस्थितीनुसार समाजाचा विश्वास संपादन करता यावा यासाठी प्रयत्न केला जात आहे.

शिक्षण आणि इतर माध्यमातून समाजातील अस्थिरता कमी करता यावी यासाठी शिक्षणाचे सखोल ज्ञान असलेली व्यक्ती हा राष्ट्रपतीचा प्रतिनिधी असावा अशी संकल्पना व्यक्त करण्यात येते. तसेच शिक्षणाच्या क्षेत्रातही आणखी कार्य व्हावे या उद्देशाने ही निवड झाल्याचे मानले जात आहे.

### * अखिल भारतीय मराठी गझल संमेलन

''गझलचे तंत्र जरी 'उर्दू' असले तरी तिचा मंत्र 'मराठी' आहे. तिला काही तरी सामाजिक वेदना प्रभावीपणे मांडते. सकारात्मक भावना ती सांगून जाते. हरवून बसलेले संतत्व, तथाकथितांचा ढोंगीपणा, अपप्रवृत्तीचे मुखवटे हे जळजळीत वास्तव गझलमधून बाहेर पडते, त्यामुळे सामान्यांच्या वेदना मांडणारी गझल पुढे न्या,'' असे आवाहन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ज्ञ व पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी वाई येथे पाचव्या अखिल भारतीय मराठी गझल संमेलनात केले.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध अभिनेते व समाजसेवक निळू फुले होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक, शाहीर साबळे, चित्रपटदिग्दर्शक राजदत्त यांची उपस्थिती होती. सन्माननीय पाहुणे म्हणून प्रसिद्ध शायर 'नसीम' रिकअत ग्वालियरी होते.

निळू फुले, गजल नवाझ भीमराव पाचाळे, मधू मंगेश कर्णिक, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आमदार उल्हास पवार, स्वागताध्यक्ष आमदार मदन भोसले यांचीही भाषणे झाली.

### * ऋग्वेदाचा शास्त्रीय मराठी अनुवाद

पुणे येथील सातवळेकर ट्रस्टचे कार्यवाह एस. व्ही. उर्फ आप्पासाहेब कुलकर्णी



यांनी डॉ. भीमराव सदाशिव कुलकर्णी (वय ८४) लिखित 'ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद' ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ऋग्वेदामध्ये दडलेले विज्ञान जगासमोर मांडण्याचा प्रयत्न त्यात केला गेला आहे.

संस्कृत ऋचा, संहिता असलेला ऋग्वेद डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी 'शास्त्रीय' मराठी भाषेत अनुवादित करताना पारंपारिक भाषा कटाक्षाने टाळली आहे. आठ वर्षे ते अनुवादाचे काम करीत होते. अनुवादासाठी महामहोपाध्याय डॉ. श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्या ऋग्वेदावरील हिंदी अनुवादित ग्रंथाचा संहितेसाठी आधार घेतला आहे. ऋग्वेदात १० हजार ५५२ संस्कृत ऋचा आहेत.

हा ग्रंथ चार खंडांमध्ये प्रसिद्ध होणार आहे. प्रत्येक खंड दीड हजार पानांचा असणार आहे. या ग्रंथाची छपाई ट्रस्टकडून पुणे येथे सुरू आहे.

एम.एस्सी., पीएच.डी. असलेले डॉ. कुलकर्णी मुंबईच्या गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालयात (मेडिकल कॉलेज) प्राध्यापक होते. 'ऋग्वेदा'मध्ये दडलेल्या विज्ञानाविषयी डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''जगात विसाव्या शतकात लागलेले शोध, होणारी वैज्ञानिक, औद्योगिक, वैद्यकीय प्रगती, भौगोलिक-सामाजिक बदलांची मांडणी, कृत्रिम पाऊस, आकाशसंचार आदी विषय यात आले आहेत.

### * जागतिक आयुर्वेद परिषद

आयुर्वेदाच्या जागतिकीकरणासाठी आयुर्वेदाचा जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी दुसऱ्या जागतिक आयुर्वेद काँग्रेसच्या उद्घाटनप्रसंगी केले. यावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री दिलीप वळसे-पाटील संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, मोहन धारिया, ऑक्सफर्ड वैद्यकीय विश्वविद्यालयाचे प्रा. गेरार्ड, एनसीएसीएमचे संचालक डॉ. जॅक किलर, आयुर्वेदाचार्य डॉ. बालाजी तांबे आदी उपस्थित होते.

अणूरेणूच्या जीवशास्त्रांचा ज्याप्रमाणे आपण अभ्यास करतो त्याप्रमाणे आयुर्वेदाकडेही जीवशास्त्रीय दृष्टीने पाहण्याची गरज आहे. आयुर्वेदाचे शिक्षण, गुणवत्ता आणि दर्जा या तीन गोष्टींच्या विकासासाठी वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या देशातील सहा प्रयोगशाळेत संशोधनाचे काम सुरू आहे. गुणवत्ता, दर्जा आणि विकासासह आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये आयुर्वेद संशोधन मांडता यावे, त्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. जगात हर्बल उत्पादनांची सुमारे तीस हजार कोटी रुपयांची उलाढाल होत आहे. त्यात चीनचा सुमारे सत्तावीस तर भारताचा केवळ पाचच टक्के वाटा आहे. हर्बल उत्पादनात आपण मागे पडत असल्याचे सांगून जागतिक पातळीवर आयुर्वेदीय संशोधन सिद्ध करण्याची गरज असल्याचे डॉ. माशेलकर यांनी सांगितले. जागतिक उपचार पद्धती म्हणून आयुर्वेदाला मान्यता मिळावी हे आपले स्वप्न आहे. युरोपातही

पर्यायी उपचारपद्धती म्हणून याचा वाढता वापर आहे.

आयुर्वेदाचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन व्हावे असे विधेयक नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात आणले जाणार आहे.

## * धर्म आणि सर्वसामान्य नागरिक : निबंधस्पर्धा

धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली आमची खिचडी करू नका, एखाद्या सॅलेडमधील विविध घटकांप्रमाणे आमचे अस्तित्व वेगळे राहू द्या, असा सूर 'सिटिझन्स फॉर पीस' आणि 'दि इंडियन एक्सप्रेस ग्रुप'तर्फे घेण्यात आलेल्या निबंधस्पर्धेत आढळला. 'नॉट पीपल लाईक अस : अ सिटिझन्स डायलेमा' या विषयावर देशभरातून निबंध मागवण्यात आले होते. त्यात हिंदी आणि इंग्रजी असे दोन विभाग करून उत्कृष्ट निबंधांना पुरस्कार देण्यात आले. निवडक निबंधांचे पुस्तकही यावेळी इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे गौतम मुखर्जी यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले.

या निबंधांमध्ये खोट्या धर्मनिरपेक्षतेवर हल्ला करणारे विचार बहुतेक स्पर्धकांनी मांडले आहेत. तसेच स्वत:च्या धर्माचे पालन करूनही धर्मनिरपेक्ष राहता येऊ शकते, अशी संकल्पना या निबंधांतून मांडण्यात आल्याची माहिती ज्येष्ठ पत्रकार आणि स्पर्धेचे परीक्षक विनोद दुवा यांनी दिली.

'इंडियन एक्सप्रेस'तर्फे प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरलेल्या एन. कुंज यांना ५० हजार रुपयांचा पुरस्कार 'बँकिंग कोड्स आणि स्टँडर्ड्स बोर्ड ऑफ इंडिया'च्या अध्यक्षा के. जे. कुरेशी यांच्या हस्ते देण्यात आला. कुंज यांनी आपल्या तरुणवयात राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता असे शब्द प्रचलित नसले तरी, सर्वसामान्य हिंदू आणि मुस्लिम समंजसपणे राहात असे म्हटले. कुंज यांनी १९४७ साली लष्करात भरती होतानाचा त्यांचा व मुस्लिम मित्राचा अनुभव निबंधात सांगितला आहे.

नवी दिल्लीच्याच परेश कुमार यांना देण्यात 'सिटिझन्स फॉर पीस'तर्फे २० हजार रुपयांचे दुसरे आणि अहमदाबादचे झाकिया जोहर यांना दहा हजारांचे तिसरे पारितोषिक देण्यात आले.

हिंदी निबंधासाठीचे प्रथम पारितोषिक मुंबईच्या अजय ब्रह्मात्मज यांना मिळाले.

ब्रह्मात्मज यांनी आपले वडील, आपण स्वत: आणि आपली मुलगी अशा तीन पिढ्यांची कथा निबंधातून मांडली आहे. या तीनही पिढ्यांच्या विचारसरणीत मोठे अंतर असूनही दुसऱ्या धर्माकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन मात्र एकच असल्याचे ते म्हणाले. श्यामसुंदर (मुंबई) आणि शशीकुमार झा (दिल्ली) यांना हिंदीतील द्वितीय व तृतीय पारितोषिक मिळाले.

## * 'टाइम'च्या दृष्टिकोनातून भारतातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती

अमेरिकी साप्ताहिक 'टाइम'च्या षष्ट्यब्दीपूर्ती विशेषांकात राष्ट्रपिता महात्मा गांधी, आधुनिक भारताचे निर्माते पंडित जवाहरलाल नेहरू, मास्टर ब्लास्टर



सचिन तेंडुलकर, पोलादसम्राट लक्ष्मी मित्तल, माहिती तंत्रज्ञानातील गुरू नारायण मूर्ती आदींचा आशियातील नायक म्हणून समावेश करण्यात आला आहे.

'टाइम'ने आशियातील गेल्या सहा दशकांतील मोलाचे योगदान करणाऱ्या स्त्री-पुरुषांचा निर्देश केला आहे.

आशियातील अन्य नायकांमध्ये नोबेल पुरस्कारविजेते अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन, म्यानमारच्या लोकशाहीचे दैवत आँग सान सू क्यी आणि त्यांचे वडील आँग सॅन, थायलंडचे राजे भूमिबोल अदयुलदेज, चीनचे डेंग झिओपिंग, तिबेटियन धर्मगुरू दलाई लामा, सुफी गायक नुसरत फतेहअली खान, पाकिस्तानचे संस्थापक मोहम्मदअली जीना, मार्शल आर्टचा उद्गाता ब्रूस ली, गिर्यारोहक तेनसिंग नॉर्गे आणि एडमंड हिलरी, मदर तेरेसा, यंदाचे नोबेलस शांतता पुरस्कारविजेते मुहम्मद युनूस; तसेच प्रख्यात लेखक सलमान रश्दी यांचा समावेश आहे.

## * मराठीच्या भवितव्याविषयी बोलण्याचे व्यासपीठ हवे : साधू

''एवढ्या वर्षांपासून लेखन करत आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्या भवितव्याविषयी बोलण्याचा अधिकार मिळावा, यासाठी संमेलनाध्यक्षपदाच्या शर्यतीत आहे. साहित्य संमेलनाचे व्यासपीठ महत्त्वाचे आहे,'' अशी भूमिका अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचे उमेदवार अरुण साधू यांनी पुणे येथे मांडली.

मारुती चित्तमपल्ली यांच्या अमृतमहोत्सवी सत्कार समारंभानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, ''एवढ्या वर्षांच्या लेखनानंतर राज्यातील जनतेला काहीतरी सांगावेसे वाटत आहे. संमेलनाध्यक्षांच्या भाषणातून राज्यातील सर्वदूर जनतेपर्यंत एकाच वेळी पोहोचता येते. मराठीच्या भवितव्याविषयीचा जागर याद्वारे होऊ शकेल, अशी माझी धारणा आहे.''

''केवळ मित्रांनी आग्रह धरला म्हणून संमेलनाध्यक्षांच्या निवडणुकीला उभा आहे, असे सोंग मला करायचे नाही. त्याचा प्रचार मतदारांना पत्र पाठवून साधेपणाने सुरू आहे. मित्रही प्रचार करत आहेत. मात्र, अंतिम निर्णय मतदारच घेतील. ''साहित्य संमेलनातील परिसंवादामधून होणाऱ्या विविध चर्चा प्रत्येक वेळी फलदायी ठरतातच असे नाही. मात्र, संमेलनाच्या दरम्यान तीन दिवस उत्सवी वातावरण असते. अनेक साहित्यिक आणि वाचक यांच्यात संवाद साधला जातो. मराठी पुस्तकांची मोठ्या प्रमाणात विक्री होते. हीदेखील चांगलीच लक्षणे आहेत.''

## * प्रा. शशिकांत चौधरी यांना पुणे विद्यापीठाची डॉक्टरेट

'चित्रपटगीतांना वाङ्मयीन मूल्य असते का?' या अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या यक्षप्रश्नाचा धांडोळा कविवर्य ग. दि. माडगूळकर, पी. सावळाराम,

कवी संजीव, शांता शेळके व जगदीश खेबुडकर यांच्या संदर्भात घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या शोधप्रबंधाबद्दल पुणे विद्यापीठाने कोल्हापुरातील न्यू कॉलेजचे मराठीविभाग प्रमुख प्रा. शशिकांत बंडोपंत चौधरी यांना पीएच.डी. ही सन्मानाची पदवी प्रदान करण्यात येत असल्याचे नुकतेच जाहीर केले.

'मराठी चित्रपटगीतांचे वाङ्मयीनदृष्ट्या मूल्यमापन १९३० ते १९९५' या शीर्षकाच्या शोधप्रबंधात प्रा. चौधरी यांनी प्रामुख्याने पाच कवींच्या चित्रपटगीतांचा सखोल अभ्यास समाविष्ट केला आहे. 'मराठी चित्रपटगीतांवर अशा पद्धतीने झालेला शोधप्रबंध भविष्यात संशोधकांसाठी पायाभूत दस्तऐवज ठरू शकेल!' अशा शब्दांत प्रबंध व प्रबंधविषयाबाबत तज्ज्ञ समितीने गौरवोद्गार काढले आहेत. मराठी चित्रपटगीतांचा हृद्य इतिहास मांडण्यात आणि वाङ्मयीनदृष्ट्या या काव्याचे मूल्यमापन करण्यात प्रा. चौधरी यशस्वी झाले आहेत, असेही तज्ज्ञ समितीने आपल्या अहवालात नमूद केले आहे. नाशिक येथील एच.पी.टी. कॉलेजचे प्राचार्य डॉ. भास्कर गिरधारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. चौधरी यांनी शोधप्रबंधाचे काम पूर्णत्वास नेले.

### * नकार पुरुषी व्यवस्थेला हवा, पुरुषाला नाही

''कित्येक स्त्रीवादी कथालेखिका पुरुषांच्या आरशात पाहून लेखन करतात. माझ्या मते, स्त्रीवादी लेखन म्हणजे पुरुष होण्याचा प्रयत्न नसावा. त्या अर्थाने माझी गणना स्त्रीवादी लेखिकांमध्ये केली जाऊ नये,'' असे मत प्रसिद्ध कवयित्री-कथाकार नीरजा यांनी व्यक्त केले.

'पॉप्युलर प्रकाशना'तर्फे आयोजित कार्यक्रमात संजय जोशी यांनी नीरजा यांची प्रकट मुलाखत घेतली, त्या वेळी त्या बोलत होत्या. कवयित्री म्हणून प्रसिद्ध असलेल्या नीरजा यांचा 'ओल हरवलेली माती' हा कथासंग्रह अलीकडेच प्रकाशित झाला आहे. कथालेखिका अशी नवी ओळख मिळवलेल्या नीरजा यांची 'मासा आणि आक्रमकता' ही कथा या वेळी वाचण्यात आली.

''व्यापक अर्थाने स्त्रीवाद हा मला मार्क्सवादाचा एक हिस्सा वाटतो,'' असे नमूद करून नीरजा म्हणाल्या, ''नकार पुरुषी व्यवस्थेला हवा; पुरुषाला नाही. स्त्रीला निर्णयाचे स्वातंत्र्य असले पाहिजे. माझ्यातील कवयित्री कथेमध्ये डोकावत नाही. कविता लिहिल्यावर हलके वाटते, तर कथा लिहिल्यावर मी दमून जाते. टवाळकी माझ्यात दडलेली असली, तरी विनोद हा मला अद्याप अस्त्र म्हणून सापडलेला नाही. दीर्घलेखन करण्याचा सध्या तरी विचार नाही,'' असे त्यांनी नमूद केले.

### * कल्पनाशक्तीमुळे अद्याप नाटके टिकून

शब्दांमध्ये मांडलेले भाव प्रेक्षकांसमोर चित्ररूपात उभे करण्याची कल्पनाशक्ती



नाटकामध्ये आहे. म्हणूनच ते अद्याप टिकून राहिले असल्याची भावना ज्येष्ठ अभिनेते प्रभाकर पणशीकर यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाट्य कार्यशाळेचे उद्घाटन करताना म्हटले.

''योग्य भाव व्यक्त करण्यासाठी शब्द अनेकदा असमर्थ ठरतात. अशा वेळी तोकड्या पडणाऱ्या शब्दांमधला भावार्थ प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याचे काम नटाला करावे लागते. नाटकातील भूमिका प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर करायला हवा, याचे भान रंगभूमीवरील प्रत्येकाला असले पाहिजे. आसपास वावरणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमधील बारकावे भूमिकेतून सादर करणे हे नटाचे खरे कौशल्य असते.''

आपली भूमिका प्रेक्षकांसमोर नीट सादर करणे, हेच नटाचे कसब आहे. त्यात कसली शैली, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

दिल्लीवर स्वारी करणारा बाजीराव, चाणक्य अशा भूमिका आणि 'भावबंधन', 'एकच प्याला'; तसेच शिरवाडकर, खाडिलकर यांची नाटके करायची राहिली, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

नट होण्यापेक्षा नाटक कंपनी चालविण्याची इच्छा होती, याची कारणमीमांसा करताना ते म्हणाले, ''नाटकासाठी विंग उभी करण्यापासून तिकीट खिडकीवरच्या कामापर्यंतचा सर्व अनुभव घेतला असल्याने नाट्य व्यवस्थापक म्हणून काम करण्याची इच्छा होती.''

### * मराठी नाटके सर्वदूर पोहोचत नाही : माधव वझे यांची खंत

जगण्याच्या कक्षा रुंदावण्यासाठी कालांतराने बदल आवश्यक आहे हे स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या नाटकांमध्ये दिसून आले. मात्र ही नाटके सर्वदूर पोहोचत नसल्याची खंत प्रसिद्ध नाट्यसमीक्षक माधव वझे यांनी सातारा येथे व्यक्त केली.

आप्पासाहेब आपटे स्मृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित व्याख्यानात १९६० नंतरची मराठी नाटकांची वाटचाल या विषयावर ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात नाटके महाराष्ट्रात सर्वदूर पोहोचली होती. त्याकाळी नाटके पाहण्याकडे प्रेक्षकांचा कलही कमी झाला आहे. आज स्पर्धा वाढली असल्यामुळे मराठी नाटकांना चांगले दिवस नाहीत. असे सांगून वझे पुढे म्हणाले, शिक्षण आणि मनोरंजनासाठी नाटक हे असलेच पाहिजे अशी भूमिका होती. स्वातंत्र्यानंतर नाटकांमध्ये पहिला बदल होऊन दलितांच्या जाणिवा नाटकांमधून प्रथमच रंगमंचावर आल्या. दलित रंगभूमी निर्माण झाली. काही काळच दलित रंगभूमीवरील नाटके निर्माण झाली. या नाटकांचे हळूहळू प्रमाण कमी झाले आहे. स्वातंत्र्यानंतर नाटकामधून स्त्री जाहीरनामा प्रसिद्ध झाला. जे सत्य कोणी बोलत नव्हते ते नाटकांमधून समोर येऊ लागले.

स्वातंत्र्यानंतरच्या नाटकात महत्त्वाचा झालेला बदल म्हणजे आदर्शांना प्रश्न विचारण्यास सुरुवात झाली. पूर्वी गप्प बसायची संस्कृती होती. बोलायचे नाही. जे सांगताहेत ते ऐकत रहायचे ही पद्धत होती. स्वातंत्र्यानंतर मात्र आदर्शांनाही प्रश्न विचारण्यास सुरुवात झाली. लैंगिकता, हिंसा यांचा नाटकांमध्ये समावेश होऊ लागला. जगण्याच्या कक्षा बदलण्यासाठी परिवर्तन अटळ असून त्यानुसार बदलही आवश्यक आहेत हे कालांतराने दाखवून दिले.

एकंदर स्वातंत्र्यानंतर मराठी नाटकांच्या कक्षा रुंदावल्याचे वझे यांनी स्पष्ट केले.

### * आयुर्वेदाच्या प्रसारात बहुराष्ट्रीय कंपन्यांसह नोकरशाहीचा अडसर - के. सुदर्शन

जागतिक पातळीवर आयुर्वेदाच्या प्रसाराच्या कार्यात बहुराष्ट्रीय औषध कंपन्या आणि देशातील नोकरशाही यांचा प्रमुख अडसर असल्याचा आरोप करून त्यांच्या विरोधात लढा उभारावा लागेल, असा इशारा सरसंघचालक के. एस. सुदर्शन यांनी दिला.

दुसऱ्या जागतिक आयुर्वेद काँग्रेसमध्ये ते बोलत होते. मोघलांनी देशावर पाचशे वर्ष केलेले साम्राज्य आणि त्यानंतर इंग्रजांची आलेल्या राजवटीमुळे देशातील विकेंद्रित पद्धती कशा लुप्त झाल्या त्याचा खुलासा सुदर्शन यांनी यावेळी केला. विकेंद्रित असलेली देशातील यंत्रणा संपुष्टात आणून त्याऐवजी केंद्रीय पद्धत राबवून देशाची सूत्रे आपल्या हाती आणण्याचा इंग्रजांनी प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.

देशातील विविध वनस्पतींचे संरक्षण करायला हवे. आयुर्वेदावर आता ॲलोपॅथीने आक्रमण केल्याने आयुर्वेदाचे संशोधन होत नाही. आयुर्वेदाचा इतिहास हा प्राचीन असूनही त्याच्या संशोधनाकडे दुर्लक्ष झाल्याची टीका करीत आजही स्वातंत्र्यानंतर आयुर्वेदाच्या बाबतीत भेदाभेद केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

आयुर्वेदी औषधाकडे पाश्चिमात्य देश वळू लागले असून औषधांच्या विक्रीसाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल. जगातील विविध क्षेत्रांचा, तेथील जमीन, हवामानासह विविध बाबींचा अभ्यास करून देशाला आयुर्वेद ही उपचार पद्धती म्हणून त्याचा वापर करू शकतो. मात्र बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मदतीने देशातील नोकरशाही आयुर्वेदाच्या जागतिक पातळीवरील प्रसाराच्या कामात मुख्य अडसर ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आयुर्वेदाच्या माध्यमातून जगाला औषधे देताना आपण औषधांसह आयुर्वेदाच्या जीवनपद्धतीही समजावून सांगू. तसे झाल्यास देशाचे भवितव्य उज्ज्वल असल्याचे त्यांनी सांगितले.

देशातील विविध वनस्पतींचे संरक्षण करायला हवे. आयुर्वेदावर आता ॲलोपॅथीने आक्रमण केल्याने आयुर्वेदाचे संशोधन होत नाही. आयुर्वेदाचा इतिहास हा प्राचीन असूनही त्याच्या संशोधनाकडे दुर्लक्ष झाल्याची टीका करीत आजही स्वातंत्र्यानंतर



आयुर्वेदाच्या बाबतीत भेदाभेद केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

### * 'साहेबा'च्या भाषेतील ज्ञानखजिना

'साहेबा'च्या भाषेत अडकून पडलेला ज्ञानखजिना मुक्त करण्यासाठी राष्ट्रीय ज्ञान आयोगाने महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. त्या अंतर्गत सुमारे ५०० कोटी रुपयांची 'गुंतवणूक' करून विज्ञान-तंत्रज्ञानाधारित ज्ञान प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

विज्ञान-तंत्रज्ञानाधारित अभ्यासक्रम, तसेच अभियांत्रिकी-वैद्यकीयसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारे ज्ञान इंग्रजीमध्येच उपलब्ध आहे. देशातील केवळ तीन टक्के नागरिकांना इंग्रजी अवगत आहे. उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजीत अध्ययन करणे अपेक्षित असले, तरी ती वस्तुस्थिती नाही. अशा परिस्थितीत केवळ इंग्रजी चांगले नाही म्हणून ज्ञानसंपदेपासून विद्यार्थी वंचित राहतात आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होतात. त्यामुळेच गुणवत्ता असूनही मूलभूत विज्ञानाच्या क्षेत्रात भारतीय विद्यार्थी मागे पडतात.

राष्ट्रीय ज्ञान आयोग स्थापन झाल्यानंतर अशा विद्यार्थ्यांच्या प्रश्नेला न्याय देण्यासाठी पावले उचलण्यात आली. त्यासाठी इंग्रजीत अडकलेला ज्ञानसाठा भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी प्रकल्प हाती घेण्यात आला, विज्ञान-तंत्रज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके व संदर्भसूचक लेखनसामग्री प्रादेशिक भाषांमधून उपलब्ध करून देण्याची गरज प्राधान्याने भागवण्यात येणार आहे. प्रगत संगणन केंद्र (सी-डॅक), बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस आदी संस्थांनी गेल्या अनेक वर्षांपासून भाषांतरासंदर्भातील लोकप्रिय प्रकल्प, संगणकप्रणाली विकसित केली आहे. त्याचीही याकामी मदत घेतली जाईल, अशी माहिती आयोगाचे सदस्य व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी दिली.

ते म्हणाले की, 'प्रारंभी मराठीसह १६ भारतीय भाषांमध्ये हा ज्ञानसाठा भाषांतरित करण्यात येणार आहे. त्यासाठी देशातील विविध भागांमधील भाषातज्ज्ञांशी संपर्क साधण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात ५०० कोटी रुपयांची 'गुंतवणूक' करण्यात येणार आहे. ज्ञानाधारित भाषांतराची ही समस्या सोडविण्यासाठी व्यावसायिक स्वरूपाची कंत्राटेही देण्यात येणार आहेत. ही मोहीम माहिती-तंत्रज्ञान, मनुष्यबळ विकास अशा कोणत्याही एका खात्यामार्फत राबविण्यात येणार नसून ज्ञान आयोग तिचे संचालन करणार आहे.

### * 'लहानपणापासूनच मुलांनी सकारात्मक विचार करणे गरजेचे'

'मुले ही राष्ट्राची संपत्ती असून, राष्ट्राची उन्नती होण्यासाठी लहानपणापासून मुलांनी सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे. मुलांच्या भावनिक समृद्धीसाठी

पुस्तक वाचन आवश्यक असून, त्यांना घडविणारी जीवनसत्त्वे विचारातून प्राप्त होतात,' असे मत प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले.

अक्षरधाराच्या वतीने 'माय मराठी' शब्दोत्सवानिमित्त 'मुलांनी काय वाचावं?' या खास विषयावर चर्चा झाली. चाणक्य मंडळाचे अविनाश धर्माधिकारी, रेणू गावकर व सुधा गोवारीकर यांनीही विचार मांडले. रेल्वे स्थानकावर काम करणाऱ्या अनाथ व निराधार मुलांना नगरसेवक विलास वाडेकर यांच्या हस्ते पुस्तके भेट देण्यात आली.

*** हिंदी नाट्य रंगभूमीचे जनकही भावेच**

आद्य नाटककार विष्णुदास भावे हे मराठी रंगभूमीचे जनक म्हणून ओळखले जातात. मात्र कै. भावे यांनी १८५३ साली 'राजा गोपीचंद' हे हिंदी नाटक रंगमंचावर आणले होते. त्याबाबतचा उल्लेख हिंदीतील प्रसिद्ध नाट्य साहित्यिक चंदूलाल दुबे यांच्या संदर्भग्रंथात मिळून आला आहे. त्यांनीही विष्णुदास भावे यांना केवळ मराठीच नव्हे, तर हिंदी रंगभूमीचे जनक म्हणून संबोधले आहे, अशी माहिती डॉ. माधवी वैद्य यांनी दिली.

प्रारंभी नटराज पूजन करण्यात आले. अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी स्वागत केले. कार्यवाह श्री. करमरकर यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगीस अभिनेत्री शांता तांबे व शाहीर आनंदराव सूर्यवंशी यांचाही सत्कार करण्यात आला. प्रा. दत्ता भगत, श्रीराम रानडे, डॉ. मधू आपटे यांचीही भाषणे झाली.

*** पुणेकरांनी एका महिन्यात घेतली दोन लाख पुस्तके**

'अक्षरधारा'च्या तपपूर्तीनिमित्त पुण्यातील आचार्य अत्रे सभागृहात २० ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर दरम्यान भरलेल्या 'माय मराठी' ग्रंथ प्रदर्शनात दोन लाख पुस्तकांची विक्री झाली. 'अक्षरधारा'चा आतापर्यंतचा हा उच्चांक आहे.

'अक्षरधारा'चे संचालक रमेश राठिवडेकर यांनी 'माय मराठी' ग्रंथप्रदर्शनाच्या निमित्ताने आत्तापर्यंत झालेल्या अडीचशे प्रदर्शनांचा ताळेबंदही काढला आहे. 'मटा'शी बोलताना ते म्हणाले की, केवळ आमच्या प्रदर्शनांमधून गेल्या १२ वर्षांमध्ये सुमारे अडीच कोटी पुस्तके विकली गेली! मराठी भाषकांची संख्या आणि हा कालखंड पाहिला तर ही आकडेवारी फार जास्त नाही. पण तरीही त्यामुळे मराठी माणूस वाचनाकडे पुन्हा वळू लागल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. विशेषत: आवडती पुस्तके विकत घेऊन वाचण्याची सवय लागते आहे. यंदाच्या 'माय मराठी'मध्ये सुमारे ५० हजारपेक्षा जास्त टायटल्स होती.

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू आणि लेखक डॉ. नरेंद्र जाधव यांचे 'आमचा बाप आन् आम्ही' या पुस्तकाच्या ३० दिवसांमध्ये तीन हजार प्रती खपल्या! त्याखालोखाल महात्मा गांधींच्या 'माझे सत्याचे प्रयोग' याच्याही सुमारे एक हजार प्रती विकल्या गेल्याचे राठिवडेकरांनी सांगितले. साने गुरुजींचे 'श्यामची आई' आजही टॉपलाच आहे. १९३५ मध्ये पहिली आवृत्ती निघालेले हे पुस्तक ७० वर्षांनंतरही तेवढेच चिरतरुण आहे. पुणे विद्यार्थी गृह प्रकाशनाचे हे ४४ वे पुनर्मुद्रण आहे. या प्रदर्शनात 'श्यामची आई'च्या बाराशे प्रती विकल्या गेल्या.

ललित साहित्यापेक्षा इतर साहित्य वाचणाऱ्या मराठी वाचकांना शरद उपाध्ये यांचे 'राशीचक्र' (४५० प्रती), तसेच मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित सुधा मूर्ती यांची 'पुण्यभूमी भारत', 'वाइज ॲण्ड अदरवाइज', 'गोष्टी माणसाच्या', 'डॉलर बहू' ही अनुवादित पुस्तकेही तेवढीच आवडली आहेत. शिवाजी सावंतांच्या 'मृत्यूंजय' (३०० प्रती), यांच्याबरोबर चि. वि. जोशींच्या २१ विनोदी पुस्तकांचे अख्खे संच विकत घेणाऱ्यांची संख्याही मोठी होती.

राठिवडेकर म्हणाले की, राष्ट्रपती डॉ. एम. पी. जे. अब्दुल कलाम यांचे 'अग्निपंख', व्यंकटेश माडगूळकर यांचे 'बनगरवाडी', डॉ. ह. वि. सरदेसाई यांचे 'प्रकृतीस्वास्थ्य व दिनचर्या', स्वामी विवेकानंदांचे 'व्यक्तिमत्त्व विकास' (अनुवाद), मीरा गावाणकरांचे 'एक होता कार्व्हर' याशिवाय आचार्य अत्र्यांच्या 'मी कसा झालो' यांच्यासह १२ पुस्तके मोठ्या प्रमाणात विकली गेली. ग्राहकांमध्ये कोथरुडकर आघाडीवर होते. तर एकूण ग्राहकांमध्ये ५० टक्के महिला होत्या! ❐


अल्पावधीतच दुसरी आवृत्ती..........




'आरोग्य निकोप, निरोगी राहण्यासाठी, आहारनियमन आणि नियमित व्यायाम याचा साक्षेपी अवलंब हेच श्रेयस्कर आहे.' हा विचार प्रभावीपणे मनावर बिंबवणारे पुस्तक.

**औषधाविना आरोग्य**

**डॉ. रमा मराठे । डॉ. रवि मराठे**

**२००रुपये पोस्टेज २५ रु.**

## आगामी

# साम्राज्य बुरख्यामागचे

### द व्हेल्ड किंगडम

**कारमेन बिन लादेन**

**अनु. अविनाश दर्प**

■

**१५०रु.**

पोस्टेज २५ रु.




''११ सप्टेंबर... अमेरिकेसह अवघ्या जगावर दहशतवादाचे भीषण सावट पसरवणारा दिवस.....''

महासत्तेच्या जिव्हारीच घाव लागल्यानं त्वरित मुख्य सूत्रधार असलेल्या ओसामा बिन लादेन विरुद्ध सूत्र हलवली गेली. याचा फटका लादेनच्या इतरही निर्दोष कुटुंबियांना बसला. यातच होती ओसामाची थोरली भावजय कारमेन बिन लादेन आणि तिच्या दोन मुली. पती येस्लामशी रीतसर घटस्फोट घेवून कट्टर धार्मिक जोखडातून मुक्त झालेल्या, जिनिव्हात राहणाऱ्या स्वातंत्र्यप्रिय कारमेनला या घटनांनी व्यथित केले. तिने प्रसारमाध्यमांकडे आपला, आपल्या मुलींच्या निर्दोषत्वाचा खुलासा केला.

या काळातच सौदी अरेबियातील कडू-गोड आठवणी तिच्या अंतरंगात उफाळून आल्या. या साऱ्या आठवणी आणि आपल्या मुलींच्या निर्दोषत्वासाठी तिने दिलेल्या झगड्याची कहाणी या पुस्तकात आहे.



## नुकतेच...

# एव्हरिथिंग हॅपन्स फॉर अ रीझन

**कविता दासवानी**

**अनु. चित्रा वाळिंबे**

**१५०रु.**
पोस्टेज **२५रु.**




*अमेरिकेत राहणाऱ्या एका देखण्या भारतीय तरुणाशी प्रिया लग्न करते. ती दिल्लीतून लॉस एंजेलिसला जाते.तेथील 'पेज थ्री' कल्चरमध्ये वावरते .तरीही एकीकडे आज्ञाधारक हिंदू सुनेची भूमिका वठवते; स्वयंपाक, घरकाम, सासू-सासऱ्यांच्या अपेक्षा या साऱ्या गोष्टी पार पाडते.*

*प्रियाची सासू तिला नोकरी कर असं सुचवते, त्यानुसार प्रिया मनोरंजन वार्ताहर बनते. नोकरीचं हे स्वरूप तिच्या पतीला, सासू-सासऱ्यांना कधीच मान्य होणारं नसतं....*

*मजेशीर तरीही योग्य तिथे धारदार, अशी ही कादंबरी तुम्हाला नक्कीच आवडेल.*

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## विशेष वार्ता

### जागतिक प्रकाशनविश्वात भारताला मोठा पल्ला गाठणे बाकी –‘फ्रँकफर्ट बुक फेअर’ वरील चर्चेचा सूर

मुद्रणाचे आधुनिक तंत्र भारतात येऊनसुद्धा त्याचा प्रकाशनव्यवसायात म्हणावा तितका वापर सुरू झालेला नाही. जागतिक प्रकाशनक्षेत्रात भारताचा तिसरा क्रमांक असला तरी प्रकाशनप्रक्रियेच्या तांत्रिक आणि व्यावहारिक बाबतीत भारताला अजूनही मोठा पल्ला गाठणे बाकी आहे,’ असा सूर पुणे विद्यापीठाच्या संज्ञापनविभागाने आयोजित केलेल्या ‘फ्रँकफर्ट बुक फेअर २००६’ या चर्चेत व्यक्त झाला.

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ आणि पुणे विद्यापीठ संज्ञापनविभाग यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या या परिसंवादात ‘फ्रँकफर्ट बुक फेअर’ला हजेरी लावलेले, मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता, कॉन्टिनेंटल प्रकाशनच्या देवयानी अभ्यंकर, ज्योत्स्ना प्रकाशनचे मिलिंद परांजपे, नाशिकच्या करियर पब्लिकेशनचे निषाद देशमुख, चंद्रकला प्रकाशनच्या शशिकला उपाध्ये या प्रकाशकांनी सहभाग घेतला.

परिसंवादात मत व्यक्त करताना सुनील मेहता म्हणाले, ‘‘बुक फेअरमध्ये सहभागी झालेल्या पाश्चात्त्य प्रकाशकांसारखी तांत्रिक आणि व्यावसायिक व्यवस्था भारतात आणण्यास बराच वाव आहे. विषयावर प्रकाशनप्रक्रिया निर्माण होण्याची आवश्यकता आहे. युरोप-अमेरिकेतील प्रकाशनसंस्थांचे व्यवस्थापन पाहिल्यावर आपण नगण्य आहोत याची प्रकर्षाने जाणीव होते. दिल्लीकर प्रकाशक सध्या या दिशेने वाटचाल करत आहेत. त्यामुळे मराठी प्रकाशकांनीही याबाबतीत मागे राहू नये.

मिलिंद परांजपे म्हणाले, ‘‘मराठीतील प्रकाशनव्यवस्था ही कुटुंबसंस्थेच्या ताब्यात आहे. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून प्रकाशनसंस्थेकडे पाहिले जाते. याला उद्योग म्हणण्यासाठी जीभ कचरते. साहजिकच आधुनिक, पर्यायाने महाग अशा तंत्रांचा वापर शक्यतो केला जात नाही. विषयवार स्वतंत्र मनुष्यविभाग, प्रिंटिंग, प्रोसेसिंग, फोटोग्राफी या विषयाशी निगडित असा अद्ययावत प्रकाशनव्यवसाय आपल्याकडे सुरू होणे आवश्यक आहे.’’

‘‘‘फ्रँकफर्ट बुक फेअर’मध्ये पाश्चात्त्य प्रकाशकांचा व्यावसायिक दृष्टीकोण पाहून न्यूनगंड निर्माण व्हावा, अशी परिस्थिती होती. मात्र परदेशी प्रकाशकांशी तुलना करण्यापूर्वी युरोपइतकी; पुस्तके विकत घेऊन वाचण्याची संस्कृती आपल्याकडे अजून निर्माण झालेली नाही, हेही आपण लक्षात घेतले पाहिजे.’’ असे मत देवयांनी अभ्यंकर यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी व्यासपीठावर विभागप्रमुख ‘किरण ठाकूर’, प्रकाशक संघाचे अध्यक्ष विश्वास दास्ताने, प्रकाशनव्यवसाय अभ्यासक्रमाचे संयोजक शरद गोगटे तसेच समन्वयक अविनाश पंडित आदी मान्यवर हजर होते.


## मेहता पब्लिशिंग हाऊसची दर्जेदार ग्रंथसंपदा ‘ऐका’ आता थेट नभोवाणीवर...

**वाचकमित्रहो...**

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राच्या बाहेर जगभरातील कोट्यावधी मराठी वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ विविध माध्यमांद्वारे सतत प्रयत्नशील असते. www. mehtapublishinghouse.com या आमच्या वेबसाईटची जगभरातील मराठी वाचकांनी आवर्जून दखल घेतली आहे. ‘मेहता मराठी ग्रंथजगत’ सोबतच विविध वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांद्वारे आमच्या साहित्यसंपदेची ओळख मराठी वाचकाला आहेच...

आता पुणे नभोवाणीच्या सहकार्याने सकाळच्या प्रहरी, दर गुरुवारी, ठीक सात वाजून पंचेचाळीस मिनीटांनी (बातम्यांनंतर) आपण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची ओळख ‘ऐकू’ शकाल.

या कार्यक्रमामध्ये वाचक-श्रोत्यांना एक प्रश्न विचारला जाईल. प्रश्नाचे उत्तर ‘पोस्टकार्ड’द्वारे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ‘पुणे’ येथील पत्त्यावर पाठवावे. सहभागी स्पर्धकांमधून भाग्यवान विजेत्याची निवड केली जाईल व त्याला मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे दर्जेदार पुस्तक भेट मिळेल.

**चला तर मग... भेटूया दर गुरुवारी सकाळी ठीक ७:४५ वाजता ‘पुणे नभोवाणीवर’.**

**विशेष वार्ता**

## ‘अमेरिकेतील पापनगरी’ या पुस्तकाचे दिमाखदार प्रकाशन

अनिवासी भारतीय (मराठी) उद्योगपती डॉ. अनंत लाभसेटवार यांनी ‘लासवेगास’ येथील जीवनशैलीवर रुचकर भाष्य केलेले ‘अमेरिकेतील पापनगरी’ हे पुस्तक नुकतेच ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’तर्फे प्रकाशित झाले. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा २३ नोव्हेंबर रोजी पुण्यातील पद्‌मजी हॉल येथे नुकताच पार पडला.

या कार्यक्रमप्रसंगी डॉ. लाभसेटवार, डॉ. सुनीलकुमार लवटे, ‘अमृत’मासिकाचे संपादक मनोहर शहाणे, डॉ. विजय ढवळे प्रकाशक अनिल मेहता व सुनील मेहता उपस्थित होते.

पुस्तकाविषयी मत व्यक्त करताना लेखक डॉ. लाभसेटवार म्हणाले, ‘मनुष्य हा मुळातच पापप्रवृत्त असतो. पाप सहजगत्या घडते मात्र पुण्य करावे लागते. अमेरिकेतील ‘लासवेगास’ या जुगाराच्या राजधानीकडे म्हणूनच दरवर्षी ४० दशलक्ष पर्यटक येत असतात. पृथ्वीवरील या मायानगरीचा झगमगाट अंतराळातूनही दिसतो. मद्य, मदिराक्षी, द्युत, मुक्त लैंगिक वातावरण अशा सर्वार्थाने पापसमृद्ध नगरीचे अनिवार आकर्षण प्रत्येकाला खुणावत राहते. या नगरीचा घडलेला प्रवास, तेथे केलेले निरीक्षण शब्दबद्ध करावे वाटले म्हणूनच हे पुस्तक आकाराला आले, असे नमूद करून डॉ. लाभसेटवार यांनी आकर्षक व सुबक पुस्तकनिर्मितीबद्दल सुनील मेहता यांचे आभार मानले.

अध्यक्षीय समारोप करताना मनोहर शहाणे म्हणाले, ‘मराठी साहित्य व भाषेबाबत आपल्याकडे राजकीय पातळीवरही अनास्था आहे. आपले खासदार मराठी भाषेचा झेंडा घेऊन दिल्लीत वावरत नाहीत. मराठी लॉबी दिल्लीत कमकुवत ठरते. मराठी साहित्यिकांना ज्ञानपीठ मिळू नये’ यासाठी मराठी मनुष्यच राजकारण करतो. कविवर्य कुसुमाग्रजांच्या बाबतीतही असा प्रयत्न झाला होता हे दिल्लीतील उच्चपदस्थाकडून ऐकल्यावर मला वैषम्य वाटले; मराठी भाषेविषयी आपल्या मनात किती स्वाभिमान आहे हा प्रश्नच आहे.

या प्रकाशनाप्रसंगी ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा, संपादक विद्या बाळ, लेखक उत्तम बंडु तुपे आदी मान्यवर उपस्थित होते.



# दखल

## एक संवाद... ज्येष्ठ प्रकाशकाशी!

*नुकताच सुरू झालेला प्रकाशन-व्यवसाय अभ्यासक्रम... मोजकेच पण जिज्ञासू विद्यार्थी... विद्यार्थ्यांनी विचारलेले असंख्य अभ्यासू प्रश्न... आणि त्या प्रश्नांना समाधानकारक आणि तितकीच अनुभवसमृद्ध उत्तरे देणारा एक ज्येष्ठ प्रकाशक!*

*हा प्रसंग होता पुणे विद्यापीठाच्या संज्ञापनविभागातील एका तासिकेचा... आणि अतिथी अध्यापक होते ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे श्री. अनिल मेहता...!*

*नव्यानेच सुरू झालेल्या प्रकाशनव्यवसाय अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसमोर प्रकाशनव्यवसायातील बारकावे, व्यावहारिक कौशल्य तसेच एकूणच वाचनसंस्कृतीत प्रकाशकाची भूमिका अनिल मेहता स्पष्ट करत होते.*

*‘प्रकाशक हा लेखक आणि वाचक’ यातील दुवा असून वाचनसंस्कृतीतील महत्त्वाचा घटक आहे. केवळ पुस्तक प्रकाशनाची, वितरणाची जबाबदारी न घेता प्रकाशकाने समाजात वाचनसंस्कृती वृद्धिंगत होण्यासाठीही प्रयत्न करावेत. प्रकाशनव्यवसायात लेखक-प्रकाशक हे संबंध केवळ व्यावहारिक पातळीवर न राहता ते आत्मीय झाले पाहिजेत असे नमूद करून अनिल मेहतांनी लेखकासोबतचे करारपत्र, मानधन तसेच त्याच्या अडीअडचणी याबाबत प्रकाशकाने कायम दक्ष राहावे असा कानमंत्रही भावी प्रकाशकांना दिला.*

*अरुण शौरी, सुधा मूर्ती, किरण बेदी, तसलिमा नासरिन आदी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरचे लेखक व्यवहारापलीकडे आपल्याशी कायम ऋणानुबंधाने जोडले गेले आहेत. श्री. अरुण शौरी तर लिखाण पूर्ण झाल्यावर ‘अनिल, स्क्रिप्ट कोणत्या प्रकाशकाकडे देऊ?’ असा मित्रत्वाच्या नात्याने सल्ला मागतात, अशी खासगी बाबही त्यांनी सांगितली.*

*नामवंत लेखकांचे व्याख्यान, त्यांचे स्वाक्षरी कार्यक्रम असे उपक्रम राबवून प्रकाशकाने लेखकाची वाचकाशी प्रत्यक्ष भेटही घालून द्यावी, लेखक-वाचक नाळ जोडावी. अशा प्रसंगी होणारा खर्च हा ‘खर्च’ नसून ती ‘गुंतवणूक’ असते असा दूरदर्शी ‘सल्ला’ही अनिल मेहतांनी विद्यार्थ्यांना दिला.*

*बुक पायरसी, कॉपीराईट ॲक्ट यासंदर्भात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना माहितीपूर्ण उत्तरे देऊन अनिल मेहतांनी भावी प्रकाशकांना मार्गदर्शनासाठी आपण सदैव उपलब्ध असू असे आश्वस्त केले.*

*प्रकाशन-व्यवसाय अभ्यासक्रमाचे समन्वयक अविनाश पंडित यांनी आयोजित केलेला हा तास भावी प्रकाशकांना एका ज्येष्ठ प्रकाशकाच्या समृद्ध कारकीर्दीचा, दूरदर्शीत्वाचा आणि व्यावसायिक कौशल्याची चुणूक दाखवणारा ठरला.*

*- अनिरुद्ध पाटील*




# डेअर टू पब्लिश

**भारतीय पेपरबॅकची संकल्पना रुजवणारे अग्रगण्य प्रकाशक**

**दीनानाथ मल्होत्रा**
**अनु. सुप्रिया वकील**

फेडरेशन ऑफ इंडिया पब्लिशर्सचे प्रेसिडेंट एमिरिटस आणि भारतात पेपरबॅक्सच्या प्रकाशनाचा शुभारंभ करणाऱ्या हिंद पॉकेट बुक्सचे प्रवर्तक दीनानाथ मल्होत्रा यांच्या ग्रंथप्रकाशन क्षेत्रातील कर्तृत्वाला अनेकविध पैलू आहेत.

युनेस्कोचे ग्रंथसल्लागार म्हणून देशोदेशी जाऊन प्रकाशक संघटनांच्या बांधणीचे काम त्यांनी केले; १९८८ साली युनेस्कोने आंतरराष्ट्रीय ग्रंथपुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

कॉपीराइट विषयक आंतरराष्ट्रीय समितीचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. भारत सरकारने त्यांना ग्रंथप्रसार क्षेत्रातील कार्याबद्दल 'पद्मश्री' किताब दिला. भारतीय प्रकाशन व्यवसायाची आंतरराष्ट्रीय प्रकाशन व्यवसायाशी नाळ बांधण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

१९७२ साली 'झीलके उस पार' या गुलशन नंदा यांच्या पुस्तकाच्या पेपरबॅकची आवृत्ती पाच लाख प्रतींची काढून ती अल्पावधीत विकण्याची किमया त्यांनी साधली. त्या पुस्तकाच्या आणखी पाच लाख प्रती काढून त्याही भारताच्या सर्व भागांत पोहोचतील असे व्यापक विक्रीचे नेटवर्क त्यांनी निर्माण केले; आणि भारतीय भाषांमध्ये पेपरबॅक काढण्याची एक नवी लाटच आली.

'ओरिएंट पेपरबॅक्स'द्वारे इंग्लिश पॉकेटबुक्स त्यांनी काढली; हिंदी, उर्दू, पंजाबी या भाषांतही पेपरबॅक्सचे प्रकाशन त्यांनी केले; आणि त्यासाठी त्या-त्या भाषांतील अग्रगण्य लेखकांनाही त्यांनी लिहिते केले.

राष्ट्रवादी लेखक गुरुदत्त यांचे एक पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल पाच वर्षांनी आणीबाणीच्या पर्वात दीनानाथजींच्या प्रकाशनसंस्थेविरुद्ध खटला भरला गेला; तेव्हा हरिवंशराय बच्चन वगैरे लेखकांचे एक शिष्टमंडळ गृहराज्यमंत्र्यांकडे नेऊन गुरुदत्त यांना मुक्त करण्यात यश मिळवले; परंतु त्यांना स्वत:लाच



मदरलँड या दैनिकाचा एक संचालक म्हणून त्यांना लक्ष्य बनवले; तथापि आंतरराष्ट्रीय प्रकाशनक्षेत्रातील त्यांच्या दबदब्यामुळे सरकारने त्यांना अटक करण्याचा धोका पत्करण्याचे टाळले.

जनसंघाशी असणारी निष्ठा झुगारून दिल्याचे जाहीर करावे म्हणून त्यांच्यावर दबाव आणण्यात आला; आयकरखात्याने त्यांच्यावर छापे टाकले. परंतु त्यांनी त्याला भीक न घालता, कुठेही वजन न ठेवता आपल्या तत्त्वावर दृढ राहण्याचे धारिष्ट्य दाखवले.

'ए प्रिझनर्स स्क्रॅपबुक' हे लालकृष्ण अडवानी यांचे पुस्तक आणि अटलबिहारी वाजपेयी यांचा काव्यसंग्रह आणीबाणीनंतर दीनानाथजींनीच प्रसिद्ध केला. एक प्रकाशक म्हणून दीनानाथ मल्होत्रा यांच्या कारकीर्दीत अशा अनेक माननीय घटनांची नोंद करता येईल.

**जनसंघाशी असणारी निष्ठा झुगारून दिल्याचे जाहीर करावे म्हणून त्यांच्यावर दबाव आणण्यात आला; आयकरखात्याने त्यांच्यावर छापे टाकले. परंतु त्यांनी त्याला भीक न घालता, कुठेही वजन न ठेवता आपल्या तत्त्वावर दृढ राहण्याचे धारिष्ट्य दाखवले.**

'सॅटॅनिक व्हर्सेस'च्या साठ वर्षे आधीची घटना

१९२३ साली लाहोर येथे जन्म. वडील हे प्रकाशनव्यवसाय चालवत; उर्दू, हिंदी, पंजाबी आणि इंग्रजी या चार भाषांत ते पुस्तके काढत. १९२३ साली 'रंगीला रसूल' हे एका आर्यसमाजी विद्वानाने लिहिलेले महमद पैगंबर यांच्या जीवनकार्यावर अभ्यासपूर्ण व वस्तुस्थितीनिदर्शक प्रकाश टाकणारे पुस्तक त्यांनी प्रसिद्ध केले. लेखक पंडित चामुपती या विद्वानाने आपले नाव उघड करू नये अशी प्रकाशक राजपाल यांना गळ घातली. या पुस्तकावर बंदी घालून त्यावर खटला भरावा असा आग्रह मुस्लिम संघटनांनी धरला. राजपाल यांना सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली. पण अपीलात त्यांची निर्दोष मुक्तता झाली. या पुस्तकातील मजकूर वस्तुस्थितीनिदर्शक असल्याने त्याला आव्हान देता येणार नाही असा लाहोर उच्च न्यायालयाच्या फुलबेंचने निकाल दिला... त्यामुळे चिडून मुस्लिमांनी राजपाल यांच्या प्राणघातक हल्ला केला... त्यातून ते वाचले. पुन्हा एका धर्मवेड्याने त्यांच्यावर हल्ला केला. त्यावेळी त्यांच्याशेजारी बसलेले स्वामी सत्यानंद जखमी झाले... महात्मा गांधी यांनी 'यंग इंडिया'मध्ये याबद्दल लिहिताना गैरसमजाने ''नफा उकळण्यासाठी राजपाल यांनी या पुस्तकाचे प्रकाशन केले... हे कृत्य धिक्कार करण्याजोगे आहे'' असे मत व्यक्त केले... मौलाना महमद अली यांनी दिल्लीच्या जामा मशिदीतून मुसलमानांना आवाहन केले. ''काफिर राजपाल यांची अशी विनाशिक्षा सुटका होता कामा नये. त्यांच्याविरुद्ध जिहाद करायला हवे.''

आरंभी आरंभीच एका कॉपीराइट खटल्याला तोंड द्यावे लागले. त्यावरून कॉपीराइटचे महत्त्व आणि दुसऱ्या पुस्तकातील मजकूर परवानगीविना न वापरणे या गोष्टींबाबत ते जागरूक झाले.

लेखक-प्रकाशकाविरुद्ध जिहाद घोषित करण्याची ही पहिलीच घटना मानली जाते. 'दि सॅटनिक व्हर्सेस'च्या साठ वर्षे आधीची... १९२९ मध्ये राजपाल यांच्यावर ते आपल्या कार्यालयात असताना इलाम दिन या मुस्लिम माथेफिरूने हल्ला केला आणि त्यात त्यांचे निधन झाले. संपूर्ण लाहोर शहरात तणाव निर्माण झाला. तीन दिवस अंत्यविधीला परवानगी देण्यात आली नाही... अखेर मोठ्या बंदोबस्तात अंत्यसंस्कार झाला... **'प्रकाशन स्वातंत्र्यासाठी राजपाल यांनी हे हौतात्म्य पत्करले. शेवटपर्यंत लेखकाचे नाव त्यांनी गुप्त ठेवले...** आपल्या वयाच्या सहाव्या वर्षी पाहिलेली ही वडिलांची हत्या दीनानाथ मल्होत्रा यांच्यावर अमीट ठसा उमटवून गेली असली तर नवल नाही... १९९८ साली राजपाल मल्होत्रा यांना मरणोत्तर 'फ्रीडम टू पब्लिश' पुरस्कार गृहमंत्री अडवानी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला...

वडिलांच्या मृत्यूनंतर दीनानाथजींच्या आईने प्रकाशनव्यवसायाची धुरा स्वीकारली. चौदा वर्षे व्यवसाय बघून नंतर मोठ्या झालेल्या मुलांच्या हाती त्याची सूत्रे देऊन निवृत्ती स्वीकारली.

१९३८ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊन दीनानाथनी डीएव्ही संस्थेच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळचे एकूणच वातावरण स्वातंत्र्य आंदोलनाने भारलेले होते. १९३९ साली दुसऱ्या महायुद्धाचा आरंभ झाला. दीनानाथनी राज्यशास्त्र व अर्थशास्त्र हे विषय घेतले. १९४४ मध्ये प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांक मिळवून एम.ए. झाल्यावर लेक्चररशिप चालून आली. श्रीनगर येथे अध्यापन सुरू झाले... त्याचवेळी प्रकाशनव्यवसायात मदतीसाठी येण्याचा तगादा भावाने लावला... तेव्हा लेक्चररशिप सोडण्याचा निर्णय दीनानाथ मल्होत्रा यांनी घेतला... लाहोरला परत येऊन प्रकाशनाकडे लक्ष देणे सुरू केले. आरंभी आरंभीच एका कॉपीराइट खटल्याला तोंड द्यावे लागले. त्यावरून कॉपीराइटसचे महत्त्व आणि दुसऱ्या पुस्तकातील मजकूर परवानगीविना न वापरणे या गोष्टींबाबत ते जागरूक झाले. पुढे आंतरराष्ट्रीय कॉपीराइट समितीचे अध्यक्षपदही त्यांना मिळाले.

त्याचवेळी इंग्रजी, उर्दू, हिंदी भाषांमध्ये आधुनिक धर्तीवर पुस्तके काढण्याची गरज त्यांना जाणवली. त्यासाठी इंडियन बुक कंपनी लि. ही स्वतंत्र संस्था त्यांनी स्थापन केली. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर प्रशासकीय पुनर्रचनेची निकड जाणवणार,



त्या दृष्टीने पुस्तके तयार करण्याची योजना त्यांनी आखली. 'इकॉनॉमिक स्ट्रक्चर ऑफ फ्री इंडिया' हे पुस्तक त्यांनी काढले. दोन हजार प्रतींची आवृत्ती हातोहात खपली... 'दि डिप्लोमॅटिक सर्व्हिस फॉर फ्री इंडिया', 'ए प्लॅन फॉर म्युनिसिपल रिफॉर्म्स इन फ्री इंडिया', 'ए व्हिजन फॉर न्यू इंडिया' वगैरे याच धर्तीवरची पुस्तकेही लगोलग काढली... यापैकी 'ए प्लॅन फॉर म्युनिसिपल रिफॉर्मस्' हे पुस्तक अरुण शौरी यांचे वडील एच. डी. शौरी यांनी लिहिलेले होते. 'ए व्हिजन फॉर न्यू इंडिया' डॉ. कन्हैयालाल मुन्शी यांनी लिहिलेले होते.

उत्तम मुद्रक, उत्तम बांधणीकार, पुस्तकांची योग्य ती जाहिरात, मार्केटिंगची योजनाबद्ध आखणी, लेखकांची योग्य निवड, हस्तलिखितांचे साक्षेपी संपादन, मुद्रणातील अचूकता- अशा सर्व बाबींकडे आरंभीपासून लक्ष पुरवल्याने दर्जाबाबत त्यांनी मानदंड निर्माण केले.

पुस्तक प्रकाशन व्यवसायाचे सामाजिक उत्तरदायित्वही त्यांनी आरंभापासून जाणून विविध स्तरातील लेखकांशी स्नेह जोडला. उत्तम मुद्रणदर्जासाठी लाहोरच्या रिपन प्रेसच्या मिर्झांशी संपर्क साधला... कामाचा दर्जा आणि परिपूर्णता यंत्रावर नाही तर त्यावर काम करणाऱ्या माणसाच्या वृत्तीवर व ते काम करून घेणाऱ्याच्या वृत्तीवर... हे आरंभापासून त्यांना उमजले... आपल्या संस्थेतही स्वच्छता, कर्मचारी, टंकलेखनयंत्रे, लेखकांना देण्यात येणारी वागणूक याबाबत दक्षता घेऊन अल्पावधीतच संस्थेचा लौकिक वाढवला. उत्तम मुद्रक, उत्तम बांधणीकार, पुस्तकांची योग्य ती जाहिरात, मार्केटिंगची योजनाबद्ध आखणी, लेखकांची योग्य निवड, हस्तलिखितांचे साक्षेपी संपादन, मुद्रणातील अचूकता– अशा सर्व बाबींकडे आरंभापासूनच लक्ष पुरवल्याने दर्जाबाबत त्यांनी मानदंड निर्माण केले.

उत्तम मुद्रणदर्जामुळे चांगल्या लेखकांनाही या प्रकाशनसंस्थेतर्फे आपली पुस्तके निघावी अशी ओढ वाटू लागली. डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांनी आपला 'कॉंस्टिट्यूशन ऑफ द वर्ल्ड' हा ग्रंथ दीनानाथजींना प्रकाशनासाठी दिला. त्यावेळी घटना समितीची स्थापना झालेली होती. तेव्हा रात्रंदिवस पाठपुरावा करून हे पुस्तक छापून बाजारात आणले.

फाळणीच्या घोषणेनंतर मल्होत्रा कुटुंबाने लाहोरमध्ये राहण्याचे आरंभी ठरवले, परंतु मुस्लिम वस्तीत हिंदू कुटुंबाला जगणे अशक्य हे जाणवल्याने त्यांनी तडकाफडकी लाहोर सोडले. भाऊ व आई मागे राहिले... छत्तीस तासांनी दीनानाथजी मुंबईला बोरीबंदर स्टेशनवर उतरले. दादरला राहणाऱ्या बहिणीकडे गेले. बहिणीचे यजमान सत्यकार विद्यालंकार लेखक-संपादक होते. मुंबईत प्रकाशनव्यवसाय सुरू करण्याची इच्छा प्रत्यक्षात येणे अवघड आहे असे आढळल्यावर दीनानाथजी दिल्लीला गेले.

**दहा पुस्तकांचा पहिला संच... प्रत्येकी सहा हजार प्रतींची पहिली आवृत्ती... प्रत्येकी किंमत एक रुपया. वितरणाची व्यवस्था, पुस्तकांची दुकाने, स्टॉल्स, फेरीवाले, विक्रेते, डिपार्टमेंटल स्टोअर्स, रेल्वे स्टेशन इत्यादी ठिकाणी...**

'डेली तेज'च्या छापखान्यात लाला देशबंधू गुप्ता यांनी त्यांनी सक्रिय भागीदारी दिली. छापखान्याला त्यांनी उर्जितावस्था आणली. त्याला 'विजय प्रेस' नाव देऊन सत्यकाम विद्यालंकार यांना दिल्लीला बोलावून विजय हे मासिक सुरू केले... परंतु वर्षाच्या आतच भागीदारीत काही ताण निर्माण झाले तेव्हा दीनानाथजींनी 'विजय प्रेस'मधून मुक्त होण्याचा निर्णय घेतला.

प्रकाशन क्षेत्रात त्यांनी पुन्हा पदार्पण करायचे ठरवले. 'राजपाल अँड सन्स' नावाने पाठ्यपुस्तक क्षेत्रात काम सुरू केले. गावोगावच्या शाळांना भेटी देऊन आपली पाठ्यपुस्तके नेमण्यात यश मिळवले. हिंदी रीडर्स, इंग्लिश रीडर्स, गणिताची पुस्तके, दिल्ली, पंजाब एवढेच नव्हे तर राजस्थानमधील शाळांमध्येही लागले. दक्षिण भारत हिंदी प्रचारसभेच्या कार्यकर्त्यांना भेटून आपली हिंदी पुस्तकेही तेथील परीक्षांना लावण्यात यश मिळवले. सौराष्ट्रात दौरा काढून तेथील ग्रंथालयांची साठ हजारांची ऑर्डर मिळवली.

१९५६ मध्ये दीनानाथजींनी युरोपचा साडेचार महिन्यांचा दौरा केला. पुस्तकप्रकाशन प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी होऊन त्याबाबतच्या पाश्चात्य यंत्रणांची माहिती करून घेतली. लिटररी एजंट, नॅशनल बुक लीग, बुक क्लब्ज यांच्या कामकाजाची उपयुक्तता त्यांच्या लक्षात आली. (भारतात परतल्यावर या धर्तीवरचे प्रयत्न त्यांनी केले.) 'ॲलेन अँड अनविन'चे स्टॅन्ले अनविन यांच्याशी परिचय झाला. पुस्तकविक्रेता संस्थेच्या वार्षिक अधिवेशनासाठी वेल्समध्ये जाता आले. इटलीतील आंतरराष्ट्रीय प्रकाशक संघटनेच्या काँग्रेसलाही ते उपस्थित राहिले. पेंग्विन बुक्सच्या अलेन लेन यांनी पेपरबॅक्सची माहिती दिली. या दौऱ्यावरून परत येताना अनेक नवनव्या योजना दीनानाथजींच्या डोक्यात घोळत होत्या...

त्यापैकी पेपरबॅक काढण्याच्या योजनेला अग्रक्रम मिळाला. त्यासाठी हिंद पॉकेट बुक्स प्रा. लि. ही नवी संस्था त्यांनी काढली.

दहा पुस्तकांचा पहिला संच... प्रत्येकी सहा हजार प्रतींची पहिली आवृत्ती... प्रत्येकी किंमत एक रुपया. वितरणाची व्यवस्था, पुस्तकांची दुकाने, स्टॉल्स, फेरीवाले, वृत्तपत्र विक्रेते, डिपार्टमेंटल स्टोअर्स, रेल्वे स्टेशन इत्यादी ठिकाणी... संपादक म्हणून प्रकाश पंडित या हिंदी-उर्दू-पंजाबी भाषांचे उत्तम ज्ञान असणाऱ्या तरुणाची नेमणूक...

तीन वर्षांच्या अखंड परिश्रमांनी हिंद पॉकेट बुक्सचा जम चांगला बसला.



**१९६१ मध्ये युनेस्कोच्या फेलोशिपसाठी दीनानाथजींची निवड झाली. दोन महिने अमेरिकेतील प्रकाशन व्यवसायाचा अभ्यास करण्यासाठी ही फेलाशिप होती.**

आगेकूच सुरू राहिली. रोखीनेच जास्तीत जास्त व्यवहार होऊ लागले.

१९६१ मध्ये युनेस्कोच्या फेलोशिपसाठी दीनानाथजींची निवड झाली.

दोन महिने अमेरिकेतील प्रकाशन व्यवसायाचा अभ्यास करण्यासाठी ही फेलाशिप होती. मॅकग्रा हिल, प्रेन्टिस हॉल, नॉर्टन, हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस वगैरेंना भेटी... नंतर टोकियोमधील मुख्य प्रकाशन संस्थांना भेट... त्यानंतर बँकॉक...

या दौऱ्यात बुक क्लब स्थापन करण्याच्या योजनेने त्यांना भारावून टाकले. घरेलू लायब्ररी योजनेचा तपशील मग तयार झाला... दरमहा पाच रुपयात सहा पुस्तके... पोस्टखर्च माफ... पुस्तकासाठी पोस्टाने सवलत द्यावी म्हणून शिष्टमंडळ घेऊन दीनानाथजी पंतप्रधान नेहरू, लालबहादूर शास्त्री वगैरेंना भेटले. आश्वासने मिळाली परंतु प्रत्यक्षात काही पदरी पडले नाही... पोस्टखात्याचे म्हणणे असे की ही कमर्शियल ॲक्टिव्हिटी आहे...

१९६६ मध्ये युनेस्कोने नवसाक्षरांसाठी पुस्तके यावर कराचीत एक परिषद घेतली... दीनानाथजींना तिचे आमंत्रण मिळाले. चार दिवसांच्या या परिषदेत बरेच निर्णय घेण्यात आले...

त्यानंतर 'युनेस्को कॉन्फरन्स ऑफ बुक एक्स्पर्टस ऑफ एशिया' ही परिषद टोकियोमध्ये झाली. १८ विकसनशील देशांतील पुस्तकतज्ज्ञ उपस्थित होते. 'युनेस्को ग्रंथ सल्लागार' म्हणून दीनानाथजींची नेमणूक झाली. दक्षिण कोरिया, जपान, थायलंड, सिंगापूर, मलेशिया, नेपाळ वगैरे देशांचे दौरे करून तेथील प्रकाशनव्यवसायाबाबत संबंधितांशी चर्चामसलती केल्या. १९७१ मध्ये क्वालालंपूर येथे प्रकाशकांसाठी तीन आठवड्यांचा प्रशिक्षणवर्ग होता. त्याचे तांत्रिक सल्लागार म्हणून दीनानाथजींनी काम पाहिले. १९७३ मध्ये लॅटिन अमेरिकी देशांच्या प्रादेशिक ग्रंथतज्ज्ञांच्या परिषदेत सहभाग... त्यामुळे भारताचे प्रतिनिधित्व परदेशात वारंवार करण्याची संधी त्यांना लाभली.

आपला व्यवसाय करतानाही एखादा प्रकाशक किती कल्पकता दाखवतो, उपक्रमशील राहून समाजाच्या व देशाच्या विविध गरजांची पूर्तता करू शकतो आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही कर्तृत्व गाजवतो– हे बघायचे असेल तर हे पुस्तक वाचायलाच हवे.

**पृष्ठे: २३२ ● किंमत: २०० रु. ● सभासदांना: १५० रु. ● पोस्टेज: २५रु.**




# असे घडले सहस्रक

**मानवी संस्कृतीच्या वाटचालीतले वेगवेगळे टप्पे दाखवणाऱ्या हजारो नोंदींचा खजिना**

**निरंजन घाटे**
**डॉ. प्रमोद जोगळेकर**

'असे घडले सहस्रक' हे एक वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक आहे.

गेल्या पाच हजार वर्षांत मानवी संस्कृतीची जी वाटचाल झाली तिची धावती झलक या पुस्तकात बघायला मिळते.

खरे तर पाच हजार वर्षांच्या काळातील विशेष वेगवान प्रगतीचा काळ हा रेनेसान्सनंतरचा– म्हणजे गेल्या चारपाचशे वर्षांचाच; त्यातही गेल्या शंभर-दीडशे वर्षांत जी प्रगती झाली ती फारच विलक्षण!

आपल्या सर्वांच्याच जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणारी ही वाटचाल कशी झाली, तिच्यातील मुख्य टप्पे कुठले, हे थोडक्यात सांगणे वा जाणून घेणे हे देखील एकूण अवघडच! पण ते काम या डबल क्राऊन अडीचशे पृष्ठांच्या पुस्तकात नोंदीच्या रूपात करण्याचा घाट घातला गेला आहे, आणि या नोंदीतून विविध क्षेत्रातील प्रगतीचा एक विशाल, विस्तृत, व्यापक संदर्भ-कोश सिद्ध करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

मानवी प्रगतीचे हे विविधांगी दर्शन घडवण्याच्या दृष्टीने या पुस्तकात मानवी समाजरचना, खाद्यसंस्कृती, अर्थव्यवहार आणि पाकशास्त्रकला, गणित (कालगणना, खगोलशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र), वैद्यकशास्त्र, राज्यव्यवस्था व साम्राज्ये, स्थापत्य आणि अभियांत्रिकी, वाहतुकीची व दळणवळणाची साधने (सागरी मार्ग, जमिनीवरचे मार्ग, रेल्वेमार्ग, विमानविद्या, भूप्रदेशांचा शोध), संज्ञापन व संपर्कमाध्यमे (टपालसेवा, मुद्रण, छायाचित्रण, चित्रपट, ध्वनिमुद्रण, संगीत, रेडिओ, टेलिव्हिजन, संगणक, इंटरनेट) असे मुख्य भाग पाडले आहेत.

या प्रत्येक विभागाचे आवश्यकतेनुसार पोटविभाग पाडलेले असून, त्या त्या क्षेत्रातील गेल्या पाच हजार वर्षांतील वाटचालीतील काही महत्त्वपूर्ण टप्पे नोंदवण्यात



आले आहेत. हे टप्पे नोंदवताना इसवी सनपूर्व काळातील घटना, इसवी सन १ ते १००० मधील घटना, इ. स. १००० ते २००० मधील घटना असे कालदृष्ट्या मुख्य तीन टप्पे धरून, त्या त्या टप्प्यातील प्रमुख घडामोडींवरची संक्षिप्त टिपणे देण्यात आली आहेत.

**सहा लाख वर्षांपूर्वी परस्परांशी संवाद साधणारी भाषा माणसाला अवगत झाली... लेखी भाषा, चित्रभाषा, लिपी या संकल्पना इ. स. सनापूर्वी तीनचार हजार वर्षांपूर्वी त्याला उमजू लागल्या...**

त्याशिवाय गरजेनुसार तुलनात्मक तक्तेही जागोजाग देण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, ग्रहांची माहिती, ११२ मूलद्रव्ये, विविध रोगांच्या साथी, राज्यशास्त्रावरील महत्त्वाचे ग्रंथ, जगातील २५ मुख्य संस्कृती, सर्वात उंच इमारती, सर्वात जास्त लांबीचे पूल, बोगदे, धरणे, अभियांत्रिकीतील मुख्य टप्पे, ऊर्जास्रोत व त्यांचे शोधक, खनिज व नैसर्गिक तेलाचे साठे, अग्निबाणांची काही शस्त्रे व त्यांचे निर्माते, वंशसंहाराच्या प्रमुख घटना, अण्वस्त्रे, विरामचिन्हे व स्वरोच्चार, इ. इ. शेकडो नोंदी आणि तक्ते याद्वारे मानवाच्या ज्ञानात्मक सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैज्ञानिक, संज्ञापनात्मक इ. इ. क्षेत्रातील वाटचालीतील महत्त्वाच्या घटनांचा एक धावता पट डोळ्यांपुढे येतो आणि आज ज्या गोष्टी आपण सहज स्वाभाविक म्हणून गृहीत धरून चालतो त्यामागे किती प्रदीर्घ परंपरा आहे, परिश्रम, प्रयोगशीलता आणि शोधबुद्धी आहे याची विस्मयकारक जाणीव होते.

दगडापासून हत्यारे, शस्त्रे बनवण्याची किमया माणसाने तीनचार लक्ष वर्षांपूर्वी हस्तगत केली. आज तो अण्वस्त्रेही बनवत आहे.

लंबवर्तुळाकार झोपड्या बांधण्याचे तंत्र त्याला ३ लाख ८० हजार वर्षांपूर्वी प्राप्त झाले. आजच्यासारख्या गगनचुंबी इमारती उभ्या करण्याचे तंत्र अवगत करून घेण्यासाठी त्यानंतर लक्षावधी वर्षे जावी लागली. समूहाने टोळ्या करून राहण्याची पद्धत एक लाख वर्षांपूर्वी त्याला स्वीकारावीशी वाटली... पुढे देशाची, राष्ट्राची कल्पना रुजत गेली... जागतिकीकरणाच्या प्रचंड लाटेत सापडलेल्या आजच्या माणसातली ही टोळ्या करून राहण्याची आदिम प्रवृत्ती अजूनही पदोपदी डोके वर काढून संघर्षाचे वातावरण निर्माण करते हे आपण पाहातच आहोत.

सहा लाख वर्षांपूर्वी परस्परांशी संवाद साधणारी भाषा माणसाला अवगत झाली... लेखी भाषा, चित्रभाषा, लिपी या संकल्पना इ. स. सनापूर्वी तीनचार हजार वर्षांपूर्वी त्याला उमजू लागल्या...

**जगात वेगवेगळ्या भागात इसवीसनपूर्व साडेतीन हजार वर्षांपासून विशिष्ट जीवनशैलींचा पुरस्कार करणाऱ्या संस्कृतींची उभारणी होण्यास आरंभ झाला.**

यांत्रिक छपाईचा शोध गुटेनबर्गने पंधराव्या शतकात लावला. (इ. स. १४५५) इ. स. १६०५ मध्ये पहिले वृत्तपत्र निघाले; संगणक, इंटरनेट, मोबाइल, लेसर प्रिंटिंग, अंतरिक्ष याने, क्षेपणास्त्रे, अणुशक्ती... ही सर्व मजल विसाव्या शतकातील– आधीच्या हजारो लाखो वर्षांच्या तुलनेत प्रचंड वेगवान आणि झपाटेबंद. हे पुस्तक सहज चाळले तरी या सर्व प्रगतीची धावती चित्रमालिका डोळ्यांपुढून भराभर सरकत राहते.

जगात वेगवेगळ्या भागात इसवीसनपूर्व साडेतीन हजार वर्षांपासून विशिष्ट जीवनशैलींचा पुरस्कार करणाऱ्या संस्कृतींची उभारणी होण्यास आरंभ झाला. राज्यप्रणाली, समाजव्यवस्था, धर्मकल्पना, नीतीमूल्ये, अर्थव्यवस्था, निरनिराळे व्यवसायउद्योग व सेवाकार्ये, यांची विशिष्ट चौकट या संस्कृतींना पायाभूत ठरत गेली. सुमेरियन (इ.स.पू. ३६००), इजिप्शियन (इ.स.पू. ३४००), भारतीय (इ.स.पू. २५००- मोहेंजोदारो, हडप्पा, सिंधू संस्कृती), मिनोअन (इ.स.पू. २०००), हिटाइट (इ.स.पू. १९००), चिनी संस्कृती (इ.स.पू. १६००), बॅबिलोनियन (इ.स.पू. १९३०), ग्रीक-रोमन (इ.स.पू. १३००) या संस्कृती इसवीसन पूर्वकाळात उदयाला आल्या. त्यापैकी काही अस्तंगत झाल्या तर नव्या स्वरूपात पुनरुज्जीवन झाल्याने काही अजूनही अस्तित्वात आहेत.

अतिपूर्व मंगोलियन, खमेर (कंबोडिया), इस्लाम, जपान-कोरियन, पाश्चिमात्य, आर्थोडॉक्स ख्रिश्चन, हिंदू, ऑटोमन, अँडीमन (इंका)या ख्रिस्त जन्मानंतरच्या संस्कृती बहुतेक आजही विद्यमान आहेत. अपवाद– खमेर, ऑटोमान, इंका या संस्कृतींचा. या पुस्तकात कम्युनिस्ट संस्कृती असाही निर्देश करण्यात आला आहे. (प्रारंभ १८४८ आणि शेवट १९९१. अशा दीडशे वर्षांचा कालावधी या पश्चिम युरोपीय संस्कृतीच्या नावे दाखवण्यात आला आहे.) सोव्हिएत महासंघ १९१७ मध्ये अस्तित्वात आला. त्याआधी या संस्कृतीचा आरंभ झाला असे म्हणणे कितपत सयुक्तिक आहे हा प्रश्न काहींना पडेल. कार्ल मार्क्सने केवळ ग्रंथ लिहिला म्हणून या संस्कृतीचा उदय झाला असे मानणे तर्कसंगत नाही... कम्युनिस्ट संस्कृती ही अशी वेगळी संस्कृती मानण्याची खरोखर गरज आहे का असाही प्रश्न चोखंदळ वाचकांना पडेल.

**शस्त्रे : कालची आणि आजची**



**आरंभी कोणाशीही लढण्यासाठी केवळ हातांचाच वापर करणारा आदिमानव सुमारे पाच लाख वर्षांपूर्वी लाकडी, टोकदार भाले आणि लाकडी दांड्याचे पाषाण वापरू लागला.**

आरंभी कोणाशीही लढण्यासाठी केवळ हातांचाच वापर करणारा आदिमानव सुमारे पाच लाख वर्षांपूर्वी लाकडी, टोकदार भाले आणि लाकडी दांड्याचे पाषाण वापरू लागला. पुढे धनुष्यबाण, गोफण, बूमरँग, पाषाण परशू, दोराचा फास, टोकाला वजन बांधलेला दोर यापर्यंत प्रगती करायला त्याला इ.स.पू. साडेतीन हजार वर्षांपर्यंत वेळ लागला. त्यानंतर तलवार, विषारी बाण, रथांच्या चाकाला बांधलेल्या तलवारी, सामुराई तलवार, बाण फेकणारी यंत्रे, पॉलीडियसची उल्हाट यंत्रे यांचा वापर करीत. इ. स. पूर्वकाळात त्याने शत्रूशी सामना केला. इ. स. ६७४ मध्ये संपूर्ण जहाजावर हल्ला करण्यासाठी ग्रीक फाय कॅलिनिकसचा, ज्वलनशील पदार्थांचे पेटते मिश्रणीने गोफण किंवा उल्हाट यंत्राने फेकण्यापर्यंत त्याने मजल मारली. बाराव्या शतकात पिस्तुलाचा वापर होऊ लागला. लष्करी अग्निबाण, दगडी तोफा व तोफगोळे, ६०० किलोचे क्षेपणास्त्र, ताणधनुष्य, आतून आरे असलेली बंदुकीची नळी, फायरशिप, येथवरच्या प्रगतीसाठी अठरावे शतक उजाडावे लागले. टिपू सुलतानने १३.६ किलोचे घन इंधनाचे अग्निबाण १७९२ मध्ये वापरले. बोळ्यांचा पट्टा वापरणारी एका नळीची मशीनगन हिराम मॅक्सीनने लंडनमध्ये शोधून ६०० फुटांवरचे लक्ष्य टिपण्यात यश मिहवले. १९१५ मध्ये जर्मनीने रशियाविरुद्ध विषारी वायू वापरून १७ हजार सैनिकांना ठार केले आणि पाच लाख सैनिकांना जायबंदी केले. जर्मन मशीनगन, बझुका द्रव, इंधनी अग्निबाण, ८.६६ इंची तोफ, यांचा वापर पहिल्या महायुद्धात झाला. दुसऱ्या महायुद्धात सी गन्स, व्ही २ व्हर्गेल, टुंगेन स्वाफेझेड, व्ही १ क्षेपणास्त्र, येथपासून अणुबॉम्बपर्यंत झेप घेतली गेली. एकाच वेळी दीड लाख माणसांचा बळी घेतला गेला. त्यापुढच्या काळात प्रचंड संहारक अशा आंतरखंडीय प्रक्षेपणास्त्रावर हायड्रोजन बॉम्ब बसवण्याच्या दृष्टीने अमेरिका, रशिया यांनी प्रगत संशोधन सुरू केले.

**प्रचंड मानवी संहार**

विसाव्या शतकाने प्रचंड प्रमाणावरचे मानवी संहार पाहिले.

१९४९ ते १९६९ या वीस वर्षांत माओ त्से तुंगने २ कोटी ६३ लाख नागरिकांना सांस्कृतिक क्रांतीच्या नावावर ठार मारले.

**संगणक क्षेत्रातील गेल्या पस्तीस वर्षांतील प्रगती थक्क करणारी आहे. १९७१ मध्ये व्यक्तिगत वापराचा पहिला संगणक केनबॅक-१ बाजारात आला. त्याची स्मृतीक्षमता २५६ बाइटसची होती. किंमत ७५० डॉलर्स.**

१९२१ ते १९६० या चाळीस वर्षांत रशियात छळ छावण्यांतील १ कोटी ९० लाख लोकांचा बळी घेण्यात आला. स्टॅलिनने सामूहिक-शेतीला विरोध करणाऱ्या ७० लाख शेतकऱ्यांना १९३१-३२ या दोन वर्षांत यमसदनी पाठवले. नाझी जर्मनीने १९४१ ते १९४५ दरम्यान ५७ लाख ज्यूंना कंठस्नान घातले आणि ४० लाख रशियन सैनिकांना व नागरिकांनाही ठार केले.

**संगणक क्षेत्र**

संगणक क्षेत्रातील गेल्या पस्तीस वर्षांतील प्रगती थक्क करणारी आहे.

१९७१ मध्ये व्यक्तिगत वापराचा पहिला संगणक केनबॅक-१ बाजारात आला. त्याची स्मृतीक्षमता २५६ बाइटसची होती. किंमत ७५० डॉलर्स.

१९७२ मध्ये पहिला इलेक्ट्रॉनिक गेम पाँग बाजारात आला.

१९७५ मध्ये बिल गेटसने वयाच्या विसाव्या वर्षी हार्वर्ड विद्यापीठातील अभ्यासक्रम अर्धवट सोडून संगणक आज्ञावली लिहिण्याचे काम हाती घेतले. बेसिक भाषेतील आज्ञावली तयार केली. १९७७ मध्ये डॉस (डिस्क ऑपरेटिंग सिस्टिम) तयार करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट ही कंपनी सुरू केली. १९८१ मध्ये त्याच्या डॉस या प्रणालीचा वापर आयबीएमने आपल्या पीसीमध्ये केला. इतर कंपन्यांच्याही पीसीमध्ये डॉस या आज्ञाप्रणालीचा वापर व्हावा म्हणून बिल गेटसने चालना दिली आणि मानधनापोटी अमाप रक्कम मिळवली. आपली आज्ञावली वापरणे जगातील प्रत्येक संगणकाला क्रमप्राप्त, अटळ ठरावे अशी महत्त्वाकांक्षा बाळगून त्याने आज्ञावलीत सतत सुधारणा करण्याचे धोरण ठेवले... अवघ्या दहा वर्षांत अमेरिकेतील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून बिल गेटसने स्थान पटकावले.

जून १९७७ मध्ये स्टीव्ह जॉब्ज आणि स्टीफन वॉझयनिक यांनी ॲपल-दोन हा पीसी (वैयक्तिक संगणक) बाजारात आणला. या कंपनीने हार्ड डिस्कची क्षमता दर दोन वर्षांनी दुप्पट वाढवण्याचे धोरण ठेवले. तीन वर्षांत दहा कोटी डॉलर्सवर कमाई केली...

१९८१ मध्ये पहिला संगणक– ऑसबॉर्न-एक बाजारात आला.

१९८२ मध्ये मांडीवर मावणारा पहिला लॅपटॉप संगणक उपलब्ध झाला.



१९८९ मध्ये इंटेलने न्यूरोलिप बाजारात आणली. दर सेकंदाला २ अब्ज आकडेमोडी करण्याची क्षमता या चिपमध्ये होती.

१९८९ मध्ये स्कॉट फिशरने व्हर्च्युअल रिॲलिटी– आभासी सत्य या तंत्राचा शोध लावला. त्यामुळे शिक्षण-संशोधनक्षेत्रात क्रांती झाली.

१९८९ मध्ये थॉमस बैन याने सिलिकॉन चिप्सच्या ऐवजी पॉलिपायरोल, पॉलिॲनिलित किंवा पॉलिथायोफिन या रेणूंच्या वायर्स बसवून संगणकाचे भाग अधिक सूक्ष्म करता येतील हे दाखवून दिले.

**या पुस्तकात अशा कितीतरी क्षेत्रांतील प्रगतीच्या, घटनांच्या रूपरेषा बघायला मिळतात. या रूपरेखांवरून त्या त्या क्षेत्राचा अधिक मागोवा घेण्याची जिज्ञासा नक्कीच जागी होईल.**

१९९० मध्ये हाताने लिहिलेल्या आज्ञा पाळू शकणारा ग्रिडपॅड हा संगणक बाजारात आला. जेम्स हॉकिन्सने तो तयार केला होता.

१९९२ मध्ये वर्ल्ड वाइड वेब ही संकल्पना अणुविज्ञानक्षेत्रातील संशोधकांनी पुढे आणली.

१९९३ मध्ये आवाजाचा वापर करून चालवल्या जाणाऱ्या पहिल्या संगणकाची सुरुवात आयबीएमने केली.

१९९६ मध्ये पीसीमधील मायक्रो प्रोसेसरचा वेग २००-२२५ मेगाहर्टझ एवढा वाढला. एक मेगाहर्टझ म्हणजे दर सेकंदाला १० लक्ष चक्रे.

पुढच्या काळात इंटरनेट, ई-मेल, हॉटमेल, वगैरे सेवा अधिकाधिक व्यावहारिक, सोयीस्कर, स्वस्त होत गेल्या. ध्वनीप्रमाणेच चित्रांची, प्रतिमांचीही संगणकाद्वारे देवघेव सहजगत्या होणे शक्य झाले. ॲमेझॉन डॉट कॉम, ई-बे आदींनी संगणकाद्वारे विविध वस्तूंची खरेदी-विक्री करण्यास चालना मिळाली. विकिपीडिया, ब्लॉग्ज वगैरे कंपन्यांनीही माहिती संकलनाचे आणि विचार-मत-प्रकटीकरणाचे नवे मार्ग खुले झाले.

...या पुस्तकात अशा कितीतरी क्षेत्रांतील प्रगतीच्या, घटनांच्या रूपरेषा बघायला मिळतात. या रूपरेखांवरून त्या त्या क्षेत्राचा अधिक मागोवा घेण्याची जिज्ञासा नक्कीच जागी होईल.

एवढ्या मर्यादित पृष्ठांत इतके विषय, हजारो बाबींचा तपशील संकलित करण्यातील लेखकांचे कौशल्यही विलक्षणच!

**पृष्ठे: २५६ ● किंमत: ३०० रु. ● सभासदांना: २२५ रु. ● पोस्टेज: २५रु.**




# अमेरिकेतील पापनगरी

## लास वेगासच्या मायानगरीचे रंग आणि ढंग

**डॉ. अनंत लाभसेटवार**

लास वेगास हे अमेरिकेतील शहर जुगाराचे शहर म्हणून जगभर मशहूर आहे. नेवाडा या वालुकामय राज्यात पीकपाण्याची वानवा; तेथील लोकांना रोजगाराचे कुठलेच साधन नाही. त्यांना निर्वाहाचे काहीतरी साधन हवे. म्हणून नेवाडा राज्याने जुगाराला कायद्याने मान्यता दिली आणि कॅसिनो– ज्यू द्यूतगृहे– काढण्यास आपल्या नागरिकांना परवानगी दिली.

त्या काळात अमेरिकेतील अन्य सर्व राज्यांत कायद्याच्या दृष्टीने जुगार हा दंडनीय अपराध होता. जुगाराला राजरोस मुभा मिळाल्याने अमेरिकेच्या इतर राज्यांमधून लास वेगासला पर्यटकांचे लोंढेच्या लोंढे येऊ लागले. त्यांच्या निवासाची उत्तम सोय करण्यासाठी एकापेक्षा एक भव्य हॉटेल्स तेथे निघत राहिली आणि त्या हॉटेल्समध्ये नाना प्रकारचे चविष्ट खाद्यपदार्थही माफक दरात मिळतील अशी व्यवस्था करण्यात आली. त्याचबरोबर पर्यटकांच्या रंजनासाठी आकर्षक करमणुकीचे कार्यक्रम ठेवण्याची कल्पनाही अमलात आणली गेली. जगभरचे नामवंत कलावंत, नृत्यकार, नकलाकार, जादूगार, अभिनेते तेथील फ्लोअर शोज्, स्ट्रिपटीझ, रेव्ह्यू वगैरे कार्यक्रमात भाग घेऊ लागले. एकाच वेळी शंभर (दोनशे...) नर्तकांचा सहभाग असणारे भव्य नेत्रदीपक शोज् हे लास वेगासमधल्या प्रत्येक हॉटेलचे खास आकर्षण ठरले. त्यामध्ये नाना प्रकारचे ट्रिक सीन्स, बदलते रंगमंच, चमत्कृतिपूर्ण सजावटी वगैरेंचे प्रयोग होऊ लागले. आणि या सर्व गोष्टींची माफक दरात लयलूट होत असताना आलेल्या पर्यटकांना अधिकच थ्रील वाटावे म्हणून एकेका हॉटेलात शेकडो स्लॉट मशीन्स बसवण्यात आली. एकाच प्रकारची तीन फळे एकाच रांगेत आली की जॅकपॉट म्हणून एक डॉलरचे पंचवीस-पन्नास डॉलर मिळू लागले. अशा जॅकपॉटमुळे पर्यटकांच्या खिशातून



नोटावर नोटा निघू लागल्या आणि तासन्तास त्या मशीनच्या समोर बसण्यात पर्यटकांना धन्यता वाटू लागली. त्याचबरोबर पोकरसारखे पत्त्यांचे खेळ, केनो, रौलेट– डझनवारी प्रकारचे खेळही सुरू झाले आणि लास वेगासच्या समृद्धीत भर घालू लागले.

**एकेका हॉटेलमध्ये चार-सहा हजार खोल्या आहेत; आणि हजारो स्लॉट मशीन्स, पंधरा-वीस रेस्टॉरंटस्, नाट्यगृहे, दुकाने... न्यूयॉर्क, पॅरीस, इंग्लंड, इजिप्त, व्हेनिस इत्यादी शहरांच्या प्रतीकात्मक प्रतिकृती येथे तयार करण्यात आल्या आहेत.**

अमेरिकेतील इतर संस्थानात लग्न करणे आणि घटस्फोट घेणे यासाठी महिनाभर आधी नोटीस द्यावी लागते. लास वेगासच्या प्रशासनाने ही जाचक तरतूद रद्दबातल करून हव्या त्या क्षणी, हव्या त्या ठिकाणी लग्न करण्याची आणि घटस्फोट घेण्याची मुभा दिली. त्यामुळे अनेक चॅपेल्स व चर्चेस तेथे निघाली आणि तेथील चर्चप्रमुखांनाही अमाप कमाईचे मार्ग राजरोस खुले झाले.

या झटपट श्रीमंतीला पुढे अनेक फाटे फुटत राहिले...

या शहरात रात्रंदिवस विद्युद्दीपांचा झगमगाट उजळत राहिला. रात्रीही दिवसापेक्षा जास्त लखलखाट... या शहराला झोप नाही. कुठलाही कॅसिनो चोवीस तास चालू... तशात हूवर डॅममुळे येथील पाण्याचा प्रश्न सुटला. हे धरण हाही स्थापत्यशास्त्रातला चमत्कारच मानला जातो. अनावर बेधुंद कोलोराडो नदीला धरणाची वेसण घालून पाण्याचा हा प्रश्न सोडवून लास वेगासला वाळवंटातली अद्‌भुत मायानगरीच बनवले गेले! जगण्यातले थ्रील... जुगारातले थ्रील... मुक्त स्त्रीपुरुष प्रणयाचे रंगढंग... अल्पावधीत लक्षावधी डॉलर्स कमविण्याचे आमिष... लासवेगासला एकीकडे काही लोक पृथ्वीवरचे नंदनवन बनवत होते, तर दुसरीकडे सिनसिटी/पापनगरी म्हणून काही प्युरिटन तिला नाके मुरडत होते... तरीही लासवेगासची लोकसंख्या वाढत होती... आज लास वेगासची वस्ती तीस-पस्तीस लाखांच्या घरात आहे... अमेरिकेतील इतर शहरांच्या तुलनेने बरीच जास्त... येथील दहापैकी आठ हॉटेल्स ही जगातील सर्वात मोठ्या दहा हॉटेल्सच्या यादीत गणली जातात. एकेका हॉटेलमध्ये चार-सहा हजार खोल्या आहेत; आणि हजारो स्लॉट मशीन्स, पंधरा-वीस रेस्टॉरंटस्, नाट्यगृहे, दुकाने... न्यूयॉर्क, पॅरीस, इंग्लंड, इजिप्त, व्हेनिस (इटली) इत्यादी शहरांच्या वा देशांच्या प्रतीकात्मक प्रतिकृती येथे तयार करण्यात आल्या आहेत. म्हणूनच येथे स्टॅच्यू ऑफ लिबर्टी आहे, पॅरिसचा आयफेल टॉवर आहे, इजिप्तचा पिरॅमिड आहे. व्हेनिससारखा

**डॉ. अनंत लाभसेटवार हे गेली तीस-पस्तीस वर्षे अमेरिकेत राहतात. पेशाने संशोधक पण पुढे एक बँकही त्यांनी अमेरिकेत खरेदी केली आणि शॉपिंग मॉल्सचेही सौदे त्यांनी केले. एक हजार एकरात शेती केली, आकाशवाणी केंद्र चालवले.**

गावातून जाणारा जलमार्ग आहे, एमजीएमचा स्टुडिओ आहे, विषुववृत्तीय अरण्य आहे... पाहण्यासारख्या गोष्टी इतक्या आहेत की महिनाभर राहिले तरी त्यांचा पुरता छडा लागणार नाही...

विमानतळापासूनच स्लॉट मशीन्स सुरू होतात... आणि ती प्रत्येक इमारतीत, प्रत्येक दुकानात, प्रत्येक कॅसिनोत आपल्याला खुणावत राहतात... वाळवंटात हे सर्व कल्पनेच्याही पलीकडचे अद्‌भुतरम्य विश्व बघताना आपण स्वप्नात तर नाही ना असेच वाटत राहते.

या शहराला तुम्ही वाळवंटातले नंदनवन म्हणा, अद्‌भुत मायानगरी म्हणा की पापनगरी म्हणा; तिची भूल सर्वांना पडते. जन्माला यावे आणि काशीला जाऊन जन्माचे सार्थक करावे; त्याचप्रमाणे लासवेगासला जावे आणि त्या मायानगरीचे दर्शन घेऊन मनुष्यजन्माची संधी पुन्हा लाभावी असा संकल्प सोडावा, अशी या नगरीची जादू आहे.

...अशा या विलक्षण जादूनगरीवर मराठीत आजवर फुटकळ प्रवासवर्णनात्मक लेख अधूनमधून वाचायला मिळत होते; परंतु स्वतंत्र पुस्तक मात्र निघाले नव्हते. ती उणीव आता डॉ. अनंत लाभसेटवार यांनी 'अमेरिकेतील पापनगरी : एक वारी' हे पुस्तक लिहून भरून काढली आहे. अर्थात एका पुस्तकात वा एका वारीत 'लस वेगास'चे अगदी जुजबी दर्शन घडणार हे उघडच आहे; त्यामुळे अशी पाचपंचवीस पुस्तके आहेत; ग्लॅमरच्या जगात लास वेगासला अफाट महत्त्व व मान आहे.

डॉ. अनंत लाभसेटवार हे गेली तीस-पस्तीस वर्षे अमेरिकेत राहतात. पेशाने संशोधक पण पुढे एक बँकही त्यांनी अमेरिकेत खरेदी केली आणि शॉपिंग मॉल्सचेही सौदे त्यांनी केले. एक हजार एकरात शेती केली, आकाशवाणी केंद्र चालवले. त्याबद्दल त्यांनी मोकळेपणाने आपल्या 'अमेरिकेतील धावपळ' या आत्मकथनात बरेच काही सांगितले आहे. त्या कमाईतून एक कोटी रुपयांचा एक धर्मादाय ट्रस्ट नागपूरला काढून मराठी लेखकांना आणि लोकसंख्या नियंत्रण क्षेत्रातील कार्यकर्त्यांना लाखालाखाचे पुरस्कार देण्याचा उपक्रम चालू केला आहे. अमृतमध्ये डझनावारी लेख लिहून अमेरिकेतील जीवनाचे वेगवेगळे रंगढंग आणि अंतर्विरोध टिपले आहेत.



लाभसेटवारांचे एक बलस्थान म्हणजे त्यांचे चौफेर निरीक्षण आणि दुसरे बलस्थान म्हणजे त्यांची मिस्किल विनोदबुद्धी. स्वत:ला विनोदविषय बनवण्यात ते कधीच हात आखडून घेत नाहीत; त्यामुळे त्यांचे लेखन हे अघळपघळ गप्पांच्या मैफलीसारखे रंगते.

**लाभसेटवारांचे एक बलस्थान म्हणजे त्यांचे चौफेर निरीक्षण आणि दुसरे बलस्थान म्हणजे त्यांची मिस्किल विनोदबुद्धी. स्वतःला विनोदविषय बनवण्यात ते कधीच हात आखडून घेत नाहीत; त्यामुळे त्यांचे लेखन हे चौफेर गप्पांच्या मैफलीसारखे रंगते.**

"आत प्रविष्ट होताच डावीकडे प्रशस्त व स्वतंत्र स्नानगृह होतं. एक पारदर्शक भिंतींनी व्यापलेलं तुषारस्थान (शॉवर)... दुसरी स्नानव्यवस्था म्हणजे शवपेटीच्या आकाराच्या मोठ्या पांढऱ्याशुभ्र घंघाळात (टब) ऊन-पाणी ओतून त्यात पहुडून संगीत श्रवण व पुस्तकवाचन... त्या घंघाळात वायुमिश्रित लघुलाटा निर्माण करून अंगाला मोरपंखी स्पर्श... पुढं भव्य शयनगृह... त्यात बादशहाला शोभेल अशी (किंगसाइझ) शय्या... शय्येच्या शिरोगामी छतापासून लोंबणारे... मखमली पडदे..." अशा संस्कृतप्रचुर शैलीतले डॉ. लाभसेटवारांचे वर्णन विवरण वाचकांना आरंभी ठेचकाळसारखे वाटेल; परंतु परिचित इंग्लिश शब्द वापरण्याऐवजी जाणीवपूर्वक मराठी शब्दयोजना करू पाहण्याची अमेरिकेत दीर्घकाळ राहणाऱ्या डॉ. लाभसेटवारांची जिद्द हीदेखील वाचकांची दाद मिळवून जाईल.

खुद्द पुण्यात राहणारे मराठी तरुण आता साधे साधे मराठी शब्द विसरून इंग्रजीचा सर्रास वापर करताना दिसतात. तेव्हा अमेरिकेत राहूनही मराठीचे मराठीपण टिकविण्यासाठी झटणाऱ्यांना मानाचा मुजरा करायलाच हवा.

अतिविशेष लोक (व्हीआयपीज), लंबू गाड्या (स्ट्रेच्ड लिओसीन्स) अल्प विस्ताराचे अंतर्गत वस्त्र (शॉर्ट लिंगरी), कुलूपहीन पेट्या (लॉकलेस बॅग्ज), अष्टपदरी गाड्यांनी तुडुंब भरलेला रस्ता, भाडं निर्देश यंत्र (मीटर्स), युद्धपूर्व पूर्व युरोप, जेवणाची ठिकाणं (कॉफी शॉप्स), पतपत्र किंवा पैसेधारक कार्ड (क्रेडिट कार्ड), कृष्णबाजू (ब्लॅक साइड), मादक व लैंगिक गणवेश (प्रवोकेटिव्ह अँड सेक्सी युनिफॉर्म), वक्षभेग (क्लीव्हेज), उर्ध्वगामी रेल्वे, खाजगीपणा (प्रायव्हसी), देशद्रोही बंडखोर (पायरेटस्), सुघटन शस्त्रक्रिया (प्लॅस्टिक सर्जरी), वायुयान (हेलिकॉप्टर), संगती सखी (कॉलगर्ल), सोबत (एस्कॉर्ट), सांध्य कार्यक्रम (इव्हिनिंग शोज्), शिशुपाल (नॅनी, परिचारिक), बाह्य पुरवठा (आऊट सोर्सिंग), कौशल्यस्थान (निशे), विद्युत निर्मिती करणारी भव्य चाकं (टर्बाईन), साधी भाकरी (ब्रेड), मोठी

**बरोबरची बॅग उघडून बघतात तर तिच्यात झिरझिरीत झगा, अंतर्गत वस्त्र, भडक रंगाची लांडी पोलकी... आपण लिंगांतर केलंय की काय अशी बघणाऱ्याला शंका यावी. आपण सकाळी पेटीत जे कपडे भरले होते त्यांचं या स्त्रीवस्त्रात उत्परिवर्तन कसं झालं असा प्रश्न पडतो.**

नळी (पाइप), मध्यनगर (डाऊनटाऊन), लग्नपूर्व पार्टी (बॅचलर पार्टी), मद्यांगना (बार मेड्स), श्वसनव्याधी, जुगारयंत्र, दोन तुकड्यांचं वस्त्र (बिकिनी), द्विवस्त्रधारी (बिकिनी क्लॅड), चिनीमातीची कुंडं (बेसिन्स), सौंदर्यवेधक वक्षपट्ट्या, कटिवस्त्र, वक्षवस्त्र, जल निरीक्षक (लाइफ गार्ड), शीघ्र अन्न (फास्ट फूड)... असे शब्द घडवण्याचा डॉ. लाभसेटवारांचा मराठी बाणा निश्चितच कौतुकास्पद ठरतो.

इ. स. २००४ मध्ये चार दिवसांचा लास वेगासचा दौरा डॉ. लाभसेटवार यांनी पत्नीसह केला. डेट्रॉइटवरून सायंकाळी साडेसात वाजता विमानाने निघून, चार तासांचे उड्डाण करून, लास वेगासच्या मॅककॅरन विमानतळावर ते उतरतात; तेव्हा तेथील घड्याळात फक्त साडेआठ वाजलेले असतात. त्या दोन शहरातील घड्याळात तीन तासांचा फरक आहे– त्यामुळे हा चमत्कार घडतो!)

सामान येईपर्यंत लासवेगासमध्ये चालू असलेल्या रंजनात्मक शोजची माहिती ते घेतात.

व्हिनिशियन हॉटेलमध्ये रिझर्वेशन असल्याने टॅक्सीने तेथे जातात. रोमन संस्कृतीची इटालियन झलक दाखवणारे हे भव्य हॉटेल. सोळाव्या मजल्यावरची प्रशस्त रूम (स्वीट)...

बरोबरची बॅग उघडून बघतात तर तिच्यात झिरझिरीत झगा, अंतर्गत वस्त्र, भडक रंगाची लांडी पोलकी... आपण लिंगांतर केलंय की काय अशी बघणाऱ्याला शंका यावी. आपण सकाळी पेटीत जे कपडे भरले होते त्यांचं या **स्त्रीवस्त्रात उत्परिवर्तन** कसं झालं असा प्रश्न पडतो. शिवाजी पळून गेल्यावर जसं औरंगजेबाला दगा झालं असं वाटलं तशीच माझी स्थिती झाली.'' दुसऱ्या कुणाची तरी ती बॅग होती... मग विमानतळाला फोन. तेथील कर्मचारी त्या फोनची वाटच बघत असतो... मग विमानतळावर जाऊन बॅगेची अदलाबदल करणे... टॅक्सीवाल्याची अडवणूक... आपली बॅग व ही बॅग– दोन्ही जुळ्या भावंडांसारख्या... दोघींवर लाल फिती खुणेसाठी लावलेल्या– त्यामुळे हा घोटाळा...

मध्यरात्री हॉटेलवर येऊन कॉफी हाऊसमध्ये घेतलेला खाना. कॅसिनोमधील जुगाराचे तपशील... व्हिनिशियन हॉटेलची माहिती.

हॉटेलसमोर कालवा... ३१५ फूट उंचीचा मनोरा... उंच छतावर इटालियन



पेंटिंग्ज, हॉटेलमधील ग्रँड कॅनॉलमध्ये होड्यांतून चालणारा जलविहार... सेंट मार्क चौक, इटालियन स्थापत्यशास्त्राचे नमुने... चार हजार खोल्या... १९९७ ते १९९९ या दोन वर्षांत संपूर्ण बांधकाम... सभा संमेलनांसाठी १९ लक्ष चौ. फूट वातानुकूलित दालने... २.३ एकर विस्ताराचे जुगारगृह... २००० जुगार यंत्रे... आरंभी ३ हजार खोल्या (आता आणखी ३००० लोकांची भर) जगातले सर्वांत मोठे हॉटेल २.३ अब्ज डॉलर्स खर्च... या हॉटेलचा मालक शेल्डन ॲडल्सन... व्हेनिसची प्रतिकृती करण्याची कल्पना... पहिल्याच वर्षात शेअर्स भाव वाढून ॲडल्सनचे भांडवल १४ अब्ज डॉलर्स झाले... इ.

**व्हिनिशियन हॉटेलमध्ये चौथ्या मजल्यावर छान तलाव... त्यात केलेला जलतरणाचा कार्यक्रम... अमेरिकन स्त्रियांचा धीटपणा... जास्तीत जास्त अंगप्रदर्शन करून आपलं शरीर, सौष्ठव उधळण्यात त्यांना वाटणारा आनंद...**

दुसऱ्या दिवशी वीन हॉटेलला भेट. स्टीव्ह वॉन हा त्याचा निर्माता.

त्यानेच चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी गोल्डन गेट हे जुने हॉटेल घेऊन त्याचे नूतनीकरण केले. फ्रँक सिनात्राचे तेथे कार्यक्रम केले. पुढे बिलाजिओ हे नवे हॉटेल– चार हजार खोल्यांचे सुरू केले... त्यानंतर ट्रेझर आयलँड आणि मिराज ही आणखी दोन भव्य हॉटेल्स बांधली... शेअर्सचा भाव थोडा घटला तेव्हा कर्कोरियन या वृद्ध गुंतवणूकदाराने मोठ्या प्रमाणावर शेअर्स खरेदी केले आणि स्टीव्ह वॉनलाच डच्चू दिला... तरीही खचून न जाता स्टीव्ह वॉनने नंतर वीन हे नवे हॉटेल (३००० खोल्यांचे) इ. स. २००५ मध्ये सुरू केले.

बिलाजिओच्या शेजारी सीझर्स पॅलेस हे जुने हॉटेल आहे.

त्यापुढे एमजीएम ग्रँड, ट्रॉपिकाना ही भव्य हॉटेल्स.

ग्रँड कॅनियनची हेलिकॉप्टरने टूर...

संध्याकाळी सिलीन डीयान या गायिकेच्या शोला लावलेली हजेरी. तिकिटासाठी करावे लागणारे सव्यापसव्य.

स्लॉट मशीनवार खेळून घेतलेली नशिबाची परीक्षा. दहा डॉलरची कमाई झाल्यावर चढलेला हुरूप. पण 'आमच्या सौ.ने झडप घालून ते दहा डॉलर जप्त केले. म्हणाली, मी खेळत बसलो तर तेही हरून जाईल... पण शेवटी तिचं म्हणणं खरं निघालं... उरलेली चिल्लर केव्हा हरलो ते कळलं देखील नाही...'
''युधिष्ठिरानं सगळं राज्य हरल्यावर द्रौपदीनं त्याला शुद्धीवर का आणलं नाही? आमच्या बायकोसारखं तिनं केलं असतं तर महाभारत बदललं नसतं का?''

> **अमेरिकत दीर्घकाळ राहूनही मराठी बाणा जपणाऱ्या डॉ. लाभसेटवार यांच्यासारख्या व्यक्तीच्या नर्मविनोदी शैलीतून होणाऱ्या विवेचनामुळे हा लास वेगासचा धावता फेरफटका रंजक व उद्‌बोधक ठरतो.**

(८२)

रविवारचा दिवस आराम करण्यासाठी.

व्हिनिशियन हॉटेलमध्ये चौथ्या मजल्यावर छान तलाव... त्यात केलेला जलतरणाचा कार्यक्रम... अमेरिकन स्त्रियांचा धीटपणा... जास्तीत जास्त अंगप्रदर्शन करून आपलं शरीर, सौष्ठव उधळण्यात त्यांना वाटणारा आनंद... आपल्याकडे तरुणांचं लक्ष वेधून घेणं हाच त्यांचा उद्देश... आपल्या शरीरप्रदर्शनाकडे कुणी त्रयस्थ माणूस बघत असेल तर त्यांना त्यात काही वावगं वाटत नाही. कोणी बघत असले तरी त्याचं भान अमेरिकन नारीला नसते... स्त्रीसुलभ लज्जा व सोज्वळता अमेरिकन नारीमध्ये सापडत नाही. लासवेगासमध्ये कितीतरी प्रकारची पापं घडतात हे माहीत असलं तरी त्या एकट्यानं यायला तरुण मुली भीत नाहीत. उलट ते आव्हानासारखं मानतात...'' (८६)

तेथील उपाहारगृहे... एकावेळी पाचशे माणसे बसण्याची सोय. बुफेतील विविध पदार्थ... ४० डॉलर्समध्ये कितीही खा... मैदानासारखे मोठे अन्नवितरण क्षेत्र... टेबलांवर भिन्न भिन्न डिशेस... तेथील शाकाहाराची व्याख्या (कोंबडी, मासे यांना सामावून घेणारी), गाय, डुक्कर, शेळी अशा चतुष्पाद प्राण्यांचे मांस खाणारा तो मांसाहारी... वगैरे तपशील...

अशी ही लास वेगासची वारी... किंवा या वारीची एक झलक...

या नगरीत अजून खूप काही आहे... ते सगळे चार दिवसात बघून होणे अशक्यच! पण अमेरिकत दीर्घकाळ राहूनही मराठी बाणा जपणाऱ्या डॉ. लाभसेटवार यांच्यासारख्या व्यक्तीच्या नर्मविनोदी शैलीतून होणाऱ्या विवेचनामुळे हा लास वेगासचा धावता फेरफटका रंजक व उद्‌बोधक ठरतो.

त्या नगरीची अनेकविध वैशिष्ट्ये त्यामुळे लक्षात येतात. लास वेगासला भेट देण्याची ओढ लागावी– अशी लाभसेटवार यांच्या लेखणीची एकूणच किमया आहे.

**पृष्ठे: १०४ ● किंमत : १२० रु. ● सभासदांना: ९० रु. ● पोस्टेज:२०रु.**



## कसिनो रॉयल

**जेम्स बाँड या व्यक्तिरेखेचे प्रथमच घडलेले प्रभावशाली दर्शन- ५४ वर्षांपूर्वी!**

**इयान फ्लेमिंग**
**अनु. सुभाष जोशी**




'००७ जेम्स बाँड' ही व्यक्तिरेखा गेली चाळीस वर्षे चित्रपट आणि गुप्तहेर कथा यांच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांच्या मनावर प्रभाव पाडत आहे. इयान फ्लेमिंग याने ग्रेट ब्रिटनच्या (नाविकदलाच्या) गुप्तहेरखात्यातून निवृत्त झाल्यावर एका वृत्तसंस्थेत काम केले.

१९५२ मध्ये वयाच्या ४४ व्या वर्षी कॅसिनो रॉयल ही गुप्तहेरकथा लिहिली. या कादंबरीत जेम्स बाँड हा गुप्तहेर प्रथम अवतरला.

१९६४ साली इआन फ्लेमिंगचे निधन झाले. म्हणजे अवघ्या १२ वर्षांच्या अवधीत त्याचे कादंबरी लेखन चालले. एकूण बारा-तेरा कादंबऱ्या आणि दोन कथासंग्रह एवढेच त्याचे लेखन. जमैकामध्ये समुद्रकाठी एक मोठा बंगला त्याने भाड्याने घेतला. तेथे वर्षातून दोन महिने जाऊन लेखन करण्याचा त्याचा परिपाठ होता. डॉ. नो, मूनरेकर, गोल्ड फिंगर, डायमंडस् फॉर एव्हर, फ्रॉम रशिया वुइथ लव्ह वगैरे त्याची पुस्तके एकापाठोपाठ एक येत गेली आणि जेम्ड बाँड या व्यक्तिरेखेला 'कल्ट फिगर'ची प्रतिष्ठा लाभू लागली.

आजवरच्या गुप्तहेरांपेक्षा जेम्स बाँड हा अनेक बाबतीत वेगळा होता. त्याचा बिनधास्तपणा, सुंदर स्त्रियांचे त्याला वाटणारे आकर्षण, त्याची मद्यासक्ती, अद्ययावत प्रगत बंदुका व अन्य शस्त्रास्त्रांचे त्याचे वेड, आलिशान मोटारींची त्याची आवड, निरनिराळ्या देशात त्याचा चालणारा संचार, त्याचा हजरजबाबीपणा... या सर्वांनी त्यावेळच्या एकूणच थरारकथांना नवीन वळण दिले. गुप्तहेराला मर्दानी सुपरहीरो म्हणून पेश केले.

१९६२ साली डॉ. नो हा चित्रपट निघाला; त्यातील सीन कॉनरी या नटाने केलेली जेम्स बाँडची भूमिका प्रेक्षकांना आवडली. डॉ. नो ला अभूतपूर्व यश

**कॅसिनो रॉयल ही त्याची पहिली कादंबरी १९५२ साली ती लिहिली गेली. १९५३ मध्ये प्रसिद्ध झाली. जेम्स बाँड ही व्यक्तिरेखा या कादंबरीत पहिल्यांदाच आली.**

लाभले आणि त्यानंतर एकापाठोपाठ एक असे जेम्स बाँडचे चित्रपट येत राहिले, उत्पन्नाचे उच्चांक गाठत राहिले. १९६४ मध्येच इयान फ्लेमिंगचे देहावसान झाले; त्यामुळे हे भावी यश त्याला प्रत्यक्ष बघायला मिळाले नाही; परंतु डॉ. नोच्या यशाने त्याला निश्चितच त्याची खात्री पटवली.

आजवर त्याच्या पुस्तकांच्या एकूण चार कोटीवर प्रती खपलेल्या आहेत आणि अनेक भाषांमध्ये त्याची भाषांतरे झालेली आहेत. त्याच्या चित्रपटांनी त्याच्या उत्तराधिकाऱ्यांना लक्षावधी डॉलर्स मिळवून दिले आहेत.

कॅसिनो रॉयल ही त्याची पहिली कादंबरी १९५२ साली ती लिहिली गेली. १९५३ मध्ये प्रसिद्ध झाली. जेम्स बाँड ही व्यक्तिरेखा या कादंबरीत पहिल्यांदाच आली. त्यामुळे आरंभीच्या काही प्रकरणात इयान फ्लेमिंगने जेम्स बाँड नौदलाच्या ज्या गुप्तहेर विभागात काम करीत आहे त्याच्या कामाची व स्वरूपाची माहिती दिली आहे.

कॅसिनोत रौलेटवर जुगार खेळत पहाटे तीन वाजले तेव्हा जेम्स बाँडला दमल्यासारखे वाटते आणि तो त्या टेबलापासून दूर जाऊ पाहतो. तरी त्याचे लक्ष रौलेट खेळणाऱ्या मिस्टर शिफ्र याच्यावर आणि त्याच्या पुढ्यातल्या पाच-पाच लाख फ्रँक्सच्या चळतीवर असते.

आदल्या दिवशी शिफ्रने वीस लाख फ्रँक जिंकलेले असतात. हा शिफ्र त्या कॅसिनोच्या चालकांना एक डोकेदुखीचा विषय ठरलेला असतो. तो रशियाच्या गुप्तहेर खात्यातला उच्चपदस्थ अधिकारी असून रौलेटमध्ये त्याला खूप गती आहे; आणि फ्रान्समधील वाहतूक क्षेत्रातील कामगार संघटनेला गुप्तपणे अर्थसहाय्य करत असतो. फ्रान्समधील कम्युनिस्टांशी त्याचे संबंध असल्याने ब्रिटिश युरोपीय सुरक्षिततेला त्याच्यामुळे धोका पोहोचू शकतो. त्याला ठार मारण्याची कामगिरी जेम्स बाँडवर सोपवण्यात आलेली असते. त्यासाठी श्रीयुत शिफ्र याचे उपलब्ध जीवनवृत्तही जेम्सकडे पाठवलेले असते.

शिफ्रला जाळ्यात पकडण्यासाठी या विभागाने एका युरेशियन तरुणीला-कुमारी व्हेस्पर लीन्ड हिला शिफ्रशी जवळीक साधण्यासाठी नेमलेले असते आणि त्याची रखेली (मिस्ट्रेस) म्हणून ती वावरत असते. या शिफ्रने ब्रिटनमधील



अनेक वेश्यागृहे विकत घेतलेली असतात; ती विकत घेण्यासाठी रशियाने कामगार संघटनेला देण्यासाठी त्याजजवळ दिलेल्या पाच कोटी फ्रँक्सचा वापर शिफ्रने केलेला असल्याने त्याच्या हालचालीबद्दल व हेतूबद्दल साशंकता निर्माण झाली होती. शिफ्र उर्फ सायफर, हेर झिपर याचा संपूर्ण बायोडाटाही देऊन त्याचे वय, त्याची राहणी, त्याच्या सवयी (भरपूर खर्च, विषयवासना जबरदस्त, मोटारींचे वेड, हॅटमध्ये धारदार ब्लेडस्, हिशेबी, जुगार खेळण्यात कुशल... खतरनाक..), फ्रेंच गुप्तहेरखाते व सीआयएच्या मार्फत उपलब्ध माहिती याचे तपशील असतात...

**शिफ्रला जाळ्यात पकडण्यासाठी या विभागाने एका युरेशियन तरुणीला-कु. व्हेस्पर लींड हिला शिफ्रशी जवळीक साधण्यासाठी नेमलेले असते आणि त्याची रखेली (मिस्ट्रेस) म्हणून ती वावरत असते.**

त्याचबरोबर मि. शिफ्र ज्या विभागात काम करतो त्या रशियन स्मर्श या गुप्तहेर यंत्रणेतील वेगवेगळ्या विभागांचीही माहिती या पुस्तकात सुरुवातीलाच दिलेली आहे. या यंत्रणेचे १) रशियन गुप्तहेरांवर नजर ठेवणे, २) प्रत्यक्ष कृती व हत्या करणे, ३) व्यवस्थापन आणि वित्त विभाग, ४) तपास-कायदा-कर्मचारी व्यवस्थापन, ५) गुन्हेगार अन्वेषण व अंतिम व्यवस्था असे पाच विभाग असतात.

जेम्स बाँडने पॅरिसमध्ये जावे; त्याला अडीच कोटी फ्रँक्स देण्यात येतील, मोठा खेळ सुरू होण्याआधीच जेम्सने रॉयल कॅसिनोत जाऊन तेथील जुगाराच्या खेळांची माहिती घ्यावी; शिफ्र हा बक्करात प्रवीण आहे. त्यात त्याला हरवायचे वगैरे योजना त्याचा बॉस– मि. एम– त्याला समजावून सांगतो.

रॉयल लेझो हे एक मासेमारी करणारे खेडेगाव. पण आता ते आधुनिक जुगाराचे केंद्र; नैसर्गिक झऱ्यामुळे औषधी पर्यटनस्थळ बनलेले असते.

कॅसिनो रॉयल हे तेथील एक भव्य हॉटेल.

बाँड या हॉटेलला आपल्या बेन्टली या कादरमधून भेट देतो... ताशी एकशे वीस मैल तिचा वेग असतो. मॅथिस हा एक सहकारी त्याच्याबरोबर असतो. तेथील माहीतगार असतो. तो तेथे कुमारी व्हेस्पर लीन्डशी त्याची ओळख करून देतो... सुंदर चेहरा... निळेशार डोळे, उघडे दंड व हात, रंगवलेली नखे, सोन्याची माळ, टोपाझ खड्याची अंगठी, चौकोनी गळा असलेला टॉप... खादी सिल्कचा मध्यम लांबीचा ड्रेस, चुणीदार स्कर्ट, सोनेरी गोल गवती हॅट... बाँड तिच्या सौंदर्याने उद्दीपित होतो... हिच्या संगतीत आपण आपली कामगिरी पार

**तो तेथे कुमारी व्हेस्पेर लीन्डशी त्याची ओळख करून देतो... सुंदर चेहरा... निळेशार डोळे, उघडे दंड व हात, रंगवलेली नखे, सोन्याची माळ, टोपाझ खड्याची अंगठी, चौकोनी गळा असलेला टॉप....**

पाडायची आहे या कल्पनेने तो उल्हसित होतो...

बाँड हॉटेलातून बाहेर पडतो.

मॅथिस व मिस लीन्ड हॉटेलातच एका टेबलाशी बसून बाँडबद्दल बोलत राहतात.

तेवढ्यात काच फुटल्याचा आवाज येतो... त्याच्या टेबलाच्या दिशेने गोळी येते. दोघेजण जागच्या जागी मरतात. बाहेर झाडाशी उभ्या असणाऱ्या बाँडला ही गोळी आपल्यासाठीच होती याची खात्री पटते. त्या झाडामुळे त्याचा जीव वाचलेला असतो.

मिस लीन्ड त्याला फोन करून सांगते, ''तू ठीक आहेस ना?... काळजी घे स्वत:ची.''

...आणि पुढे रॉयल कॅसिनोच्या खाजगी दालनात शिफ्रबरोबर बक्कारा खेळण्याचा तो अवसर येतो. सहा नंबरचे टेबल बाँड राखून ठेवतो.

पहिली खेळाची बोली पाच लाख फ्रँक्स.

मि. शिफ्र झडप घातल्याच्या पवित्र्यात पत्ते घेतो...

एका ग्रीक इसमाशी डाव सुरू होतो...

शिफ्र जिंकतो...

पुढचा डाव दहा लाख फ्रँक्सचा...

त्यापुढची बोली वीस लाखाची.

''बँक कबूल आहे'' असे जेम्स बाँड म्हणतो तेव्हा शिफ्र त्याच्याकडे निर्विकारपणे बघतो.

न मोजता नोटांचं एक बंडल बाँड टेबलावर ठेवतो...

तो डाव बाँड जिंकतो...

खेळ पुढे चालू राहतो.

शिफ्र दुसरा, तिसरा डावही हरतो. पन्नास लाख फ्रँक गमावतो.

बाँडजवळ तब्बल दोन कोटी ऐंशी लाख फ्रँक्स जमतात.

चाळीस लाखाची बोली...

बाँड तो डाव हरतो...

ऐंशी लाखाची बोली. आपल्या पंज्याला घाम येतोय असे बाँडला वाटते.

शिफ्र निरर्थक हालचाली करत टेबलावर बोटे वाजवत राहतो.



बाँड तो डावही हरतो.

आता त्याच्याजवळ काहीही उरलेले नसते.

पण तेवढ्यात एक पाकीट त्याच्या हातात सरकवण्यात येते. फेलिक्सकडून.

तीन कोटी वीस लाख फ्रँक्स... अमेरिकेची सप्रेम भेट. मार्शल मदत योजना असा वर मजकूर.

सूत्रधार ओरडतो, ''तीन कोटी वीस लाखांची बोली...''

बाँड म्हणतो, ''मी स्वीकारतो.'' सर्वत्र एकच हल्लागुल्ला. टेबलाभोवती गर्दी वाहू लागते.

**''मी दहा अंक मोजेपर्यंत बोली मागे घ्या- नाहीतर बंदुकीचा चाप ओढीन'' असे त्याला मागून सांगण्यात येते. मागे एक माणूस आपल्या जाड मिशांमधून हसत असतो. शिफ्र त्याच्याकडे बघत असतो.**

कॅसिनोचा संचालक मुख्य सूत्रधाराशी काही गुफ्तगू करतो. सूत्रधार बाँडजवळ येतो. बाँड तीन कोटी वीस लाख दाखवतो...

त्याचवेळी कोणीतरी आपल्या मागे कठीण वस्तू ढोसत आहे हे बाँडला जाणवते.

''मी दहा अंक मोजेपर्यंत बोली मागे घ्या– नाहीतर बंदुकीचा चाप ओढीन'' असे त्याला मागून सांगण्यात येते. मागे एक माणूस आपल्या जाड मिशांमधून हसत असतो. शिफ्र त्याच्याकडे बघत असतो.

बाँड एकदम पूर्ण ताकदीने जोर लावत मागे कोसळतो. बंदुकीची नळीच खुर्चीच्या दांडीने तुटते. तो जाड मिशावाला बघत राहतो.

बाँडला लोक उठवतात. तो सॉरी म्हणतो. ''चक्कर आली असावी. थोडं खेळाचं दडपण. थोडा गरम हवेचा परिणाम...'' बँकरलाही तो सॉरी म्हणतो.

शिफ्रच्या चेहऱ्यावर भीतीची छटा दिसते. खडकामागे बसलेल्या ऑक्टोपससारखा शिफ्र त्याच्याकडे बघत असतो. त्याच्या चोचीसारख्या नाकाच्या दोन्ही बाजूंनी घाम निथळतो. तरीही धूर्त कोल्ह्यासारखा गालातल्या गालात तो हसत असतो.

...आणि नववा डाव हुकमी होतो. बाँड जिंकतो. शिफ्र खुर्चीतच मरगळल्यासारखा कोसळतो... निषेध व्यक्त करत तोंडाची उघडझाप करून निश्चल बसतो. सात कोटीहून जास्त फ्रँक्स बाँडला मिळतात.

बाँड त्यातील तीन कोटी वीस लाख फ्रँक्स फेलिक्सनला देतो. उरलेल्या रकमेचा चेक घेतो... तो चार कोटीचा चेक आपल्या हॉटेलातल्या खोलीत नेऊन चोरीला जाऊ नये अशा पद्धतीने ठेवतो.

**...आणि नववा डाव हुकमी होतो. बाँड जिंकतो. शिफ्र खुर्चीतच मरगळल्यासारखा कोसळतो... निषेध व्यक्त करत तोंडाची उघडझाप करून निश्चल बसतो. सात कोटीहून जास्त फ्रँक्स बाँडला मिळतात.**

संध्याकाळी किंग गॅलट नाइट क्लब... मिस लीन्ड बरोबर... शॅंपेन... अंडा बुर्जी...

तेवढ्यात मिस लीन्डला एक वेटर चिठ्ठी देतो. ती मॅथिसची चिठ्ठी असते. ''मला प्रवेशद्वाराशी एक मिनिट भेटशील का? तुझ्या जोडीदारासाठी खास बातमी आहे...'' रेने मॅथिस...

ती त्याला सांगून प्रवेशद्वाराकडे जाते... काही वेळात एक किंकाळी त्याला ऐकू येते... एक तपकिरी सिट्रोन गाडी गुरगुरत जाताना दिसते... बाँड धावतो. मिस लीन्डची पर्स आणि तिच्यातील चिठ्ठी त्याला बघायला मिळते. ती चिठ्ठी हा एक बनाव आहे हे त्याला जाणवते. तो त्या कारच्या मागे आपली गाडी सोडतो... ती सिट्रोन शिफ्र चालवत असतो. त्याच्याबरोबर आणखी दोघे पुरुष व एक तरुणी असते... बाँडची गाडी एका वळणावर येते तेव्हा रस्त्यावर खिळ्यांची चादर चमकताना दिसते. तो ब्रेक लावतो. पण ती त्याच्यावरच्या टायरचं रबर फुटून चाकाची लोखंडी आरी डांबरी रस्ता चिरू लागते. बाँड सीटखाली पडतो... शिफ्र व त्याचे साथीदार त्याला ताब्यात घेतात... आपल्या गाडीत घेतात. बाँडचं पिस्तूल शिफ्र आपल्या खिशात टाकतो. बाँडला शुद्ध येते. आपली हाडं शाबूत आहे हे जाणवते. पण तो बेशुद्ध पडल्याचं नाटक चालूच ठेवतो... सिट्रोन एका इमारतीजवळ थांबते... बाँडला उतरवण्यात येते. बाँड शिफ्रच्या अंगरक्षकांना लाथ मारतो; पण तो जमिनीवर आदळतो... शिफ्र त्याला म्हणतो, ''ये मित्रा ये. आपण उगीचच वेळ वाया घालवत आहोत.'' बाँडला आपण क्षुल्लक आणि नामर्द असल्यासारखे वाटते.

...शिफ्र त्याला पैसे कुठे आहेत ते विचारतो.

''जोपर्यंत उत्तर देत नाहीस तोपर्यंत तुझ्या शरीराच्या नाजूक भागावर असेच तडाखे देत राहीन'' असे त्याला धमकावतो.

''तो चेक तू खोलीतच कुठेतरी लपवला असणार. ...तू नाइट क्लबमध्ये गेल्यावर ती खोली माझ्या माणसांनी उलथीपालथी केली. पण चेक सापडला नाही...'' म्हणून बाँडवर आघात करीत राहतो. जंगली पशूसारखा त्याच्यावर तुटून पडतो. शिफ्र बाँडचे दोन्ही कान धरून पिरगाळतो.

''तुला आता संपवतोच...''



तोच मागून आवाज येतो. ''स्टॉप इट.'' स्मर्श...

बाँड सुस्कारा सोडतो.

स्मर्शचा माणूस शिफ्रच्या मागे पिस्तूल रोखून उभा असतो. ''तू महामूर्ख, चोर आणि देशद्रोही आहेस. तुला नाहीसं करण्यासाठी रशियानं मला पाठवलं आहे... तुझी दोन्ही माणसं मरून पडली आहेत... तू दोषी आहेस... तुला कबूल आहे ना?''

**स्मर्शचा माणूस शिफ्रच्या मागे पिस्तूल रोखून उभा असतो. ''तू महामूर्ख, चोर आणि देशद्रोही आहेस. तुला नाहीसं करण्यासाठी रशियानं मला पाठवलं आहे... तुझी दोन्ही माणसं मरून पडली आहेत... तू दोषी आहेस...**

शिफ्र हो म्हणतो– तेव्हा फट् असा आवाज होतो... शिफ्रच्या दोन्ही डोळ्यांमधील भागातून रक्ताचा ओघ सुरू होतो... तो खाली कोसळतो.

बाँडला तो मारेकरी म्हणतो, ''तू नशीबवान आहेस. तुला मारायचा मला हुकूम नाही. तुझे प्राण आज दोनदा वाचले आहेत... पण तुला मी तसा सोडणार नाही.'' आणि बाँडची जी शुद्ध हरपते, ती दोन दिवस कायम राहते.

बाँड शुद्धीवर येतो तेव्हा एका शुश्रुषागृहात असतो. आणि लंडनहून आलेली नर्स गिब्सन त्याची देखभाल करीत असते... एक फ्रेंच डॉक्टर त्याला काय घडले ते सांगतो...

''तुझ्या जखमा गंभीर आहेत... पण जीवघेण्या नक्कीच नाहीत... तू विश्रांती घे... शक्ती परत मिळव... तू अजून जिवंत आहेस हेच आश्चर्य... खूप कमी लोक इतके सहन करू शकतात. मि. एम यांचा फोन होता. ते तुझ्यावर जाम खूष आहेत. खजिन्याचा भार हलका केला म्हणून...''

बाँड समाधानाने हसतो...

तीन दिवसांनी मॅथिस त्याला भेटून चार कोटीचा चेक देतो... ''तू त्यावर सही कर...''

मिस लीन्ड त्याला भेटते. त्याला ती हवीहवीशी वाटत असतेच... ''तू छान दिसते आहेस... बरा झाल्यावर मी तुझ्याबरोबर त्या समुद्रावर येईन...''

त्या नाइट क्लबमधून बाहेर पडल्यावर काय घडले ते ती त्याला सांगते, चिठ्ठी देणारा इसम गाडीत आहे... असे तिला सांगण्यात येते तेव्हा ती गाडीकडे जाते; तर तिला पकडून आत गाडीत घेतले जाते... प्रतिकाराचा उपयोग होत नाही... ''पण मी माझी पर्स तेवढी गाडीच्या काचेतून खाली फेकली... मी खूप घाबरले होते.''

**गुप्तहेरांच्या निरनिराळ्या देशांच्या यंत्रणा आणि त्यातील स्पर्धा, एकमेकावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न हे सर्व जेम्स बाँडच्या या पहिल्या कादंबरीतही विद्यमान आहेत. जेम्स बाँडची व्यक्तिरेखा काहीशी धूसर राहते.**

''त्या पर्समुळेच मी तुझ्या मागावर निघालो... पहिल्या दिवशीच मी तुला लग्नाची मागणी घालणार होतो. आपण तसे परत होऊ शकत नाही का?''

''मी आज आनंदात आहे.'' म्हणत त्याच्या मिठीत ती विसावते.

...आणि दुसऱ्या दिवशी जेम्सला तिची चिठ्ठी मिळते. मी रशियाबाहेर आहे... मी WMD गुप्तहेर आहे...'' शिफ्रची हत्या रशियन स्मर्शला करणे का भाग पडते ते तिने पत्रात लिहिलेले असते...

गुप्तहेरांच्या निरनिराळ्या देशांच्या यंत्रणा आणि त्यातील स्पर्धा, एकमेकावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न हे सर्व जेम्स बाँडच्या या पहिल्या कादंबरीतही विद्यमान आहेत. जेम्स बाँडची व्यक्तिरेखा यात काहीशी धूसर राहते. शिफ्रची हत्या त्याच्या हातून होत नाही, ती स्मर्शकडून म्हणजे रशियाकडूनच होते. शिफ्रने रशियन गुप्तहेर म्हणून काम करीत असताना जे गैरप्रकार केले त्याबद्दल त्याला सजा देणे रशियन यंत्रणेलाच अपरिहार्य वाटते...

जेम्स बाँडच्या या थरारकथेतली कथावस्तू बरीचशी सरळ रेषेत जाणारी आहे; तिच्यातली उपकथानकेही फारशी गुंतागुंतीची नाहीत. मिस लीन्डने बजावलेली भूमिकाही त्यातल्या त्यात गूढरम्य ठरते.

**चित्रपट**

नव्या चित्रपटाचे जागतिक प्रदर्शन आणि या पुस्तकाचा मराठी अनुवाद या दोन्ही घटना एकाच वेळी घडत आहेत ही विशेष उल्लेखनीय बाब.

हा चित्रपट बनवताना या मूळ कथेत बरीच भर घातली आहे.

ही थरारकथा १९५२ साली लिहिली गेली. म्हणजे तब्बल ५४ वर्षांपूर्वी.

या चोपन्न वर्षांत खूपच बदल झालेले आहेत. संघर्ष विषयात, जागतिक समस्यांच्या स्वरूपात, हेरगिरीच्या तंत्रात... त्यावेळी शीतयुद्ध तेवढे होते, आता दहशतवाद ही प्रमुख समस्या.

या चित्रपटाची सुरुवात होते ती एका दहशतवादी, घातपाती अतिरेक्याचा पाठलाग जेम्स बाँड करीत आहे येथपासून. हा दहशतवादी मादागास्करमधला असून तो मियामी विमानतळावर एका विमानाचा स्फोट घडवून आणण्याच्या कामगिरीवर निघालेला असतो. जेम्स बाँड मियामी विमानतळावर बॉम्ब घेऊन



चाललेल्या अतिरेक्याचा पाठलाग करून त्याला ठार मारतो. त्याला विमानात स्फोट घडवून आणण्याची सुपारी कोणी दिली, त्यासाठी पैसा कुणी पुरवला याची माहिती तो अतिरेक्याकडून आधी काढून घेतो. हा पैसा ली शिफ्र याने पुरवलेला असतो. तो अट्टल जुगारी असतो आणि शेअर मार्केटमध्येही मोठी उलाढाल करणारा असतो. विमानाचा स्फोट न झाल्याने त्याने शेअर मार्केटमध्ये काही पूर्व आडाखे ठरवून केलेली गुंतवणूक निरर्थक ठरते. त्याला प्रचंड नुकसान होते. ते पैसे परत मिळवण्यासाठी तो कॅसिनो रॉयलमध्ये जुगारात मोठा स्टेक लावतो. त्या पत्त्यांच्या जुगारात जेम्स बाँड ली शिफ्रला आव्हान देतो. त्यामागे त्याची अतिरेक्यांना असणारी फूस हे नवे कालोचित कारण या नव्या पटकथेद्वारे पुरवले जाते.

**या चोपन्न वर्षांत खूपच बदल झालेले आहेत. संघर्ष विषयात, जागतिक समस्यांच्या स्वरूपात, हेरगिरीच्या तंत्रात... त्यावेळी शीतयुद्ध तेवढे होते, आता दहशतवाद ही प्रमुख समस्या.**

त्यापुढचा कॅसिनोतील प्रत्यक्ष जुगाराचा खेळ मूळ थरारकथेसारखाच आहे आणि तो चित्रपटाचा बराच भाग व्यापणारा आहे. या खेळातला एकेक डाव प्रेक्षकांची उत्सुकता ताणणारा आणि रक्तदाब वाढवणारा आहे.

त्याला भेटणारी मिस व्हेस्पर लिन्ड ही मैत्रीण... त्याला तिच्याबद्दल वाटणारे आकर्षण... वगैरे भाग चित्रपटात मूळ कथेच्या वळणारच परंतु अधिक मसालेदार असणार हे स्वाभाविक आहे!

जेम्स बाँडला रशियन मारेकऱ्याने मारून बेशुद्ध केल्याचा भाग मूळ कथेत फारसा तपशीलाने दाखवलेला नाही. चित्रपटात तो फारच भयंकर वाटतो. अंगावर शहारे आणतो. इतका निर्घृण छळ... सॅडिस्टिक... हॉरिबल!

बाँडला विषप्रयोग होतो– तेव्हा मोबाइलवरून तो त्याही अवस्थेत डॉक्टरांशी संपर्क साधून रुग्णालयात जातो...

जेम्स बाँडची या चित्रपटात भूमिका डॅनिएल क्रेग याने केली आहे. 'सीन कॉनेरी'च्या भूमिकेसारखी ती गाजावी अशी निर्मात्यांची अपेक्षा आहे. बघूया प्रेक्षक काय कौल देतात ते!

**पृष्ठे: १६० ● किंमत: १२० रु. ● सभासदांना: ९० रु. ● पोस्टेज: २० रु.**




## मृत्यू : माझ्या उंबरठ्याशी

**खुशवंतसिंग यांना मृत्यूचे कुतूहल वाटते, भय नाही.**

**खुशवंतसिंग**
**अनु. सुप्रिया वकील**

खुशवंत सिंग यांच्या बिनधास्त आणि परखड शैलीने भारतभरच्या वाचकांना वेळोवेळी धक्के दिले आहेत. एक पत्रकार, एक स्तंभलेखक म्हणून त्यांनी आपला दरारा प्रस्थापित केला आहे. आपल्या जीवनात आलेल्या स्त्रिया, आपले मद्यप्रेम, आपले राजकीय व्यक्तींशी असणारे भेद-मतभेद वगैरे गौप्यस्फोट करण्याला धैर्य लागते. ते धैर्य खुशवंत सिंग यांनी वेळोवेळी दाखवलेले आहे. आपल्या दीर्घकाळ चाललेल्या सदराचे नाव त्यांनी ठेवले होते– वुईथ मॉलिस टोवर्डस ऑल... सर्वांबद्दल आकस बाळगून– उगाच प्रेमाचे गुडीगुडी नाटक करायचे टाळून आपण परखड लेखन करणार हे या शीर्षकावरून स्पष्ट होत होते. आणि त्यानुसार ते लिहीतही होते. वाचकांनीही ते स्वीकारले होते.

आता ऐंशीच्या टप्प्यावर असणाऱ्या खुशवंतसिंग यांचे नवे पुस्तकही असेच धक्का देणारे आहे. आपण आजारी पडलो आहोत... कुठल्याही क्षणी रामनाम सत्य म्हणण्याची पाळी येईल. आपला हा मृत्यू आपल्या मित्रांना पचवणे जड जाईल, असे त्यांना वाटते... आपल्या मृत्यूनंतर वृत्तपत्रात बातमी येईल; ती कशी असेल असा प्रश्न विचारून ते स्वत:च ती बातमी देतात :

**''कळवण्यास दु:ख होते की काल संध्याकाळी सहा वाजता सरदार खुशवंतसिंग यांचं आकस्मिक निधन झालं... त्यांच्या मागं तरुण विधवा, दोन तान्हुली आणि प्रचंड मोठा मित्रपरिवार व चाहतावर्ग आहे... त्यांना 'बार' आणि 'राजकारण' या क्षेत्रात मोठे स्थान लाभले होते... आज सकाळी दहा वाजता अंत्यविधी होणार आहे...''**

अशी कल्पना करीत प्रेसला निधनाचं वृत्त समजण्यासाठी पुरेसा वेळ देऊन ते प्राण सोडतात...

त्यांचा सूक्ष्मदेह मृतदेहातून उठून मरणानंतरचं वैभव अनुभवू लागतो.



आपले मित्र कादिर, खोसला, कम्युनिस्ट वगैरेंच्या घरी ही वार्ता कशी स्वीकारली जाते हे तो सूक्ष्मदेह न्याहाळतो. शववाहिकेभोवती पाचसात जण असतात... शेवटी एकजणच उरतो...

**''माफ करा. मला साड्या फेडण्याचा अनुभव असला तरी त्या नेसवण्याचा अजिबात नाही.'' तेव्हा तो प्रतिनिधी उद्वेगाने ती साडी घेऊन परत जातो. खुशवंतसिंगांच्या रासवट वागणुकीबद्दल भारताच्या उच्चायुक्तांकडे तक्रार करतो.**

आणि इंग्लंडमध्ये असताना हर हायनेस मंडीच्या महाराणींच्या मृत्यूच्या वेळचा प्रसंग त्यांना आठवतो... त्यांच्या मृतदेहाला त्यांची आवडती साडी नेसवली म्हणून अंडरटेकर्स कंपनीचा प्रतिनिधी खुशवंत सिंगांना विनंती करतो. तेव्हा ते म्हणतात, ''माफ करा. मला साड्या फेडण्याचा अनुभव असला तरी त्या नेसवण्याचा अजिबात नाही.'' तेव्हा तो प्रतिनिधी उद्वेगाने ती साडी घेऊन परत जातो. खुशवंतसिंगांच्या रासवट वागणुकीबद्दल भारताच्या उच्चायुक्तांकडे तक्रार करतो. उच्चायुक्तांच्या कार्यालयातील एका तरुणीकडून मृतदेहाला साडी नेसवून घेतो. उच्चायुक्त खुशवंतसिंगांना म्हणतात, ''सरदार, तुम्ही तुमचा थट्टेखोरपणा जराही आवरू शकत नाही.''

आणि नंतर काही लेखांतून खुशवंतसिंग मृत्यूबद्दल दलाई लामा, आचार्य रजनीश, आयकर आयुक्त एस. प्राशेर, अल्लाम्मा इक्बाल, प्रा. ए. जे. अयेर, रशियन मित्र ओरेकोव्ह, प्रा. सत्यव्रत शास्त्री, प्रभृतींशी झालेल्या चर्चांतील विविध मते प्रकट करतात.

दलाई लामा म्हणतात, ''मी जर पुनर्जन्मावर विश्वास ठेवला नाही तर मला इथून– प्रमुख लामा पदावरून– बाहेर पडावं लागेल.''

आचार्य रजनीश म्हणतात, ''मृत्यू म्हणजे सुंदर झोप. स्वप्नरहित झोप. तुम्हाला दुसऱ्या देहात प्रवेश करण्यासाठी आवश्यक असणारी झोप... आत्म्याचं देहांतर... मला माझे मागचे जन्म आठवतात. मी देहान्तर केलेलं आहे...

अल्लाम्मा इक्बालनी म्हटले आहे, ''जेव्हा मृत्यू समोर येतो तेव्हा त्याच्या ओठावर स्मित विलसत असते तो खरा श्रद्धावान पुरुष.''

खुशवंतसिंग म्हणतात, ''मी शीख असलो तरी थोडा भित्राच आहे.'' खलिस्तानविरुद्ध लेखन केल्याबद्दल त्यांना खुनाच्या धमकीची पत्रे येतात. आपले नाव हिटलिस्टवर असेल तर ते अग्रस्थानी असावे असे त्यावर खुशवंतसिंग म्हणतात.

माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग त्यांना म्हणतात, गेली नऊ वर्षे मृत्यू माझ्या सोबत राहतोय...'' ते बोटात संकटनाशक अंगठी घालतात. दुष्ट शक्तींचा त्रास

**नेहरूंचे सचिव एम. ओ. मथाई यांच्याविषयी लिहिताना खुशवंतसिंग नोएल कॉवर्डचे विधान उद्धृत करतात, ''तो खुजा माणूस होता. पायांची उंची कमी असणाऱ्या माणसावर कधीही विश्वास ठेवू नका. त्याचा मेंदू त्याच्या बुडाच्या फारच जवळ असतो.''**

दूर व्हावा म्हणून खास बनवून घेतलेला सुवर्णहारही घालतात.

प्रा. ए. जे. अयेर यांना मृत म्हणून घोषित केले जाते... पण नंतर काही मिनिटांनी त्यांच्या हृदयाचे ठोके पुन्हा पडू लागतात. त्यांनी मृत्यूनंतरच्या त्या क्षणांवर एक लेख लिहिलेला आहे. मृत्यू म्हणजे पूर्णविराम हा त्यांचा आधीचा ठाम सिद्धान्त त्यामुळे डळमळीत होतो.

हिंदू, जैन, बौद्ध व शीख पुनर्जन्म मानतात.

मृत्यूनंतर देहाचा नाश होतो पण आत्मा जिवंत राहतो ही संकल्पना आपल्याकडे सर्वमान्य आहे.

एखाद्या माणसाने वस्त्र बदलावे तसा आत्मा देहरूपी वस्त्र बदलतो असे कठोपनिषदात म्हटले आहे.

आत्मा म्हणजे काय याचं रहस्य अजून उलगडलेलं नाही.

मृत्यूनंतर आत्म्याचं अस्तित्व टिकून असतं हे सिद्ध करणारा कोणताही शास्त्रीय पुरावा नाही असे दिल्ली विद्यापीठातील प्रा. सत्यव्रतशास्त्री म्हणतात.

अशी विविध मते खुशवंतसिंग यांनी आपल्या या पुस्तकाच्या पूर्वार्धात संकलित केली आहेत.

उत्तरार्धात अनेक व्यक्तींच्या मृत्यूविषयी त्यांनी लिहिले आहे.

पाकिस्तानचे पंतप्रधान भुट्टो यांचे शेवटचे दिवस आणि त्यांना मिळालेला मृत्यूदंड, ''संपवून टाका'' असे शेवटी त्यांनी उच्चारलेले शब्द (त्याबाबत मतभेद), ओठ हलले पण आवाज फुटलाच नाही असे काहीजण म्हणतात. मृत्यूनंतर ते शांत दिसत होते. झोपेत असल्यासारखे...

संजय गांधी– राजकारणात झपाट्यानं स्थान मिळवणारा– बदनामी आणि निंदा-नालस्ती... विमान अपघातात मृत्यू... मेनका आपल्या दिवंगत पतीसारखीच आहे. निर्भय... संतापानं भडकून उठते तेव्हा व्याघ्रारूढ दुर्गेसारखी भासते.

नेहरूंचे सचिव एम. ओ. मथाई यांच्याविषयी लिहिताना खुशवंतसिंग नोएल कॉवर्डचे विधान उद्धृत करतात, ''तो खुजा माणूस होता. पायांची उंची कमी असणाऱ्या माणसावर कधीही विश्वास ठेवू नका. त्याचा मेंदू त्याच्या बुडाच्या फारच जवळ असतो.''

रजनी पटेल, गुरुचरण सिंग तोहरा, धीरेन भगत, प्रभा दत्त, हरदयाळ, आर. जी. के., मुल्कराज आनंद, निराद चौधरी, बलवंत गार्गी, आर. के. नारायण, अली सरदार जाफरी, डॉम मोराएस, किशनलाल, प्रोतिमा बेदी, नर्गिस



दत्त, अमृता शेरगिल, चेतन आनंद, पी. सी. लाल, भीष्म साहनी, अशा अनेक व्यक्तींबद्दल आठवणी खुशवंतसिंग सांगतात. आपला कुत्रा, सिम्बा, आपली आजी दादी माँ यांच्याबद्दलचा त्यांचा जिव्हाळाही प्रकट होतो.

**आपल्या परिचित व्यक्तींच्या निधनानंतर लिहिलेल्या मृत्युलेखांमध्ये त्या-त्या व्यक्तीचे परखडपणे ते मूल्यमापन करतात. त्या व्यक्तीच्या वर्तनातील अभद्रपणा, त्रुटी, नैतिकता यांची चिकित्साही करतात.**

'मृत्यू'च्या संदर्भात खुशवंतसिंग नवे काय सांगतात का?

अनेक मान्यवरांची मते ते संकलित करतात. मृत्यूचे नेमके आकलन कोणालाच नाही; आत्मा आणि देह यांच्यातील नाते शास्त्रीय कसोटीवर सिद्ध होत नाही; पण मृत्यूचे भय मात्र प्रत्येकाला वाटते हे ते अधोरेखित करतात.

आपल्या परिचित व्यक्तींच्या निधनानंतर लिहिलेल्या मृत्युलेखांमध्ये त्या-त्या व्यक्तीचे परखडपणे ते मूल्यमापन करतात. त्या व्यक्तीच्या वर्तनातील अभद्रपणा, त्रुटी, नैतिकता यांची चिकित्साही करतात.

रजनी पटेल यांच्या निधनानंतरही त्यांच्या पहिल्या पत्नीला– सुशीला पटेल यांना– त्यांचे अंत्यदर्शन घेऊ दिले जात नाही यासारख्या प्रसंगांचा ते उल्लेख करतात– त्यातून मृत्यूविषयक चिंतन असे काही अभिप्रेत नसून, त्या-त्या व्यक्तीच्या स्वभाववैचित्र्यावरच त्यांचा जास्त भर दिसतो.

सरदार खुशवंतसिंग यांच्या बिनधास्त प्रतिमेला साजून दिसावे असे हे पुस्तक आहे.

खुशवंतसिंग यांनी आपल्या मृत्यूनंतर आपल्या स्मारकावर कोणता मजकूर लिहावा हेदेखील या पुस्तकात शेवटी दिलेले आहे.

***या स्थळी चिरविश्रांती घेणाऱ्या माणसानं***
***ना मानवाला सोडलं, ना देवाला...***
***त्याच्यासाठी तुमचे अश्रू व्यर्थ घालवू नका,***
***तो हलकट होता, ओंगळवाण्या गोष्टी लिहिण्यात***
***त्याला फार मजा वाटायची.***
***हल्ला चढवायला टपलेला हा माणूस गेल्याबद्दल***
***परमेश्वराचे आभार!***

**पृष्ठे: १७७ ● किंमत: १४० रु. ● सभासदांना: १०५ रु. ● पोस्टेज: २५रु.**

**खास दीपावलीनिमित्त** **फक्त सभासदांसाठी**

# दीप योजना

आमच्या प्रकाशनाची कोणतीही
दर्शनी २५००रु. किंमतीची पुस्तके घ्या व त्यावर मिळवा
दर्शनी ८७५रु. किंमतीची पुस्तके मोफत!
दर्शनी २०००रु. किंमतीची पुस्तके घ्या व त्यावर मिळवा
दर्शनी ६००रु. किंमतीची पुस्तके मोफत!
दर्शनी १५००रु. किंमतीची पुस्तके घ्या व त्यावर
मिळवा दर्शनी ४००रु. किंमतीची पुस्तके मोफत!

---

**म्हणजेच २५००रु. द्या व ३३७५रु. ची पुस्तके मिळवा.**
**२०००रु. द्या व २६००रु. ची पुस्तके मिळवा.**
**१५००रु. द्या व १९००रु. ची पुस्तके मिळवा.**

**पोस्टखर्च वेगळा अंदाजे १००रु.**

**अंतिम मुदत ३१ डिसेंबर २००६**

योजनेचा लाभ घेण्यासाठी आजच सभासद व्हा.
संपूर्ण सूची मागवा.
योजना पुस्तके उपलब्ध असेपर्यंतच!

## दीप योजनेतील मोफत पुस्तकांची यादी

| | | |
|---|---|---|
| अभोगी | रणजित देसाई | १५०/- |
| पावनखिंड | रणजित देसाई | १००/- |
| समिधा | रणजित देसाई | १००/- |
| प्रतिक्षा | रणजित देसाई | ८०/- |
| आलेख | रणजित देसाई | १२०/- |
| तुझी वाट वेगळी | रणजित देसाई | ६०/- |
| संचित (निवडक अध्यक्षीय भाषणे) | रणजित देसाई | ६०/- |
| पहिले प्रेम | वि. स. खांडेकर | ९०/- |
| दोन ध्रुव | वि. स. खांडेकर | १८०/- |
| क्रौंचवध | वि. स. खांडेकर | १८०/- |
| फुले आणि काटे | वि. स. खांडेकर | ६०/- |
| प्रसाद | वि. स. खांडेकर | १५०/- |
| वेचलेली फुले (अनु.) | वि. स. खांडेकर | ५०/- |
| अविनाश | वि. स. खांडेकर | ५०/- |
| रानफुले | वि. स. खांडेकर | ७०/- |
| आस्तिक | वि. स. खांडेकर | ६५/- |
| माऊली | आनंद यादव | १२०/- |
| नटरंग | आनंद यादव | १४०/- |
| माळावरची मैना | आनंद यादव | ११०/- |
| उखडलेली झाडं | आनंद यादव | १५०/- |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९०/- |
| झाडवाटा | आनंद यादव | ९०/- |
| उगवती मने | आनंद यादव | १००/- |
| पाणभवरे | आनंद यादव | १२५/- |
| ग्राम संस्कृती | आनंद यादव | १२५/- |
| वपु ८५ | व. पु. काळे | ६०/- |
| सखी | व. पु. काळे | १२०/- |
| रंग मनाचे | व. पु. काळे | १८०/- |
| तू भ्रमत आहासी वाया | व. पु. काळे | ७०/- |
| ही वाट एकटीची | व. पु. काळे | १२०/- |
| पाणपोई | व. पु. काळे | ५०/- |
| प्लेझर बॉक्स भाग-१ | व. पु. काळे | १६०/- |
| प्लेझर बॉक्स भाग-२ | व. पु. काळे | २००/- |
| चिअर्स | व. पु. काळे | १००/- |
| कथा ही दिवावादळाची (अनु.) | वि. स. वाळिंबे | १००/- |
| वॉर्सा ते हिरोशिमा | वि. स. वाळिंबे | ३००/- |
| नेताजी (सुभाषचंद्र बोस) | वि. स. वाळिंबे | ३५०/- |
| ध्यानसूत्र | अनु. माधव कर्वे | १००/- |
| मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही | अनु. मृणालिनी गडकरी | १००/- |
| विद्रोही | अनु. माधुरी काबरे | १२०/- |
| लज्जा | अनु. लीना सोहोनी | १२५/- |
| नष्ट मेयेर नष्ट गद्य | अनु. मृणालिनी गडकरी | १२०/- |
| निर्बाचित कबिता | अनु. मृणालिनी गडकरी | ७०/- |
| फरासि प्रेमिक | अनु. सुप्रिया वकील | २००/- |

| | | |
|---|---|---|
| चौघीजणी | शान्ता शेळके | ३००/- |
| पूर्व संध्या | शान्ता शेळके | ५०/- |
| कविता स्मरणातल्या | शान्ता शेळके | १२०/- |
| सांगावेसे वाटले म्हणून | शान्ता शेळके | १००/- |
| मजल दरमजल | अनु. भारती पांडे | ८०/- |
| ॲज आय सी... | अनु. माधुरी शानभाग | २००/- |
| निसर्गपुत्र (अनु.) | निरंजन घाटे | ८०/- |
| पर्यावरण प्रदुषण | निरंजन घाटे | १३०/- |
| वेध पर्यावरणाचा | निरंजन घाटे | १५०/- |
| वसुंधरा | निरंजन घाटे | २५०/- |
| यंत्रलेखक | निरंजन घाटे | ११०/- |
| फार फार वर्षापूर्वी | निरंजन घाटे | १२०/- |
| युगंधर (विज्ञान) | निरंजन घाटे | १००/- |
| विदेशी विज्ञान चित्रपट | निरंजन घाटे | १२०/- |
| नवे शतक | निरंजन घाटे | १५०/- |
| हॅलो, मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय | व. कृ. जोशी | १२०/- |
| रक्तदान | व. कृ. जोशी | १३०/- |
| निर्मनुष्य | रत्नाकर मतकरी | १००/- |
| मध्यरात्रीचे पडघम | रत्नाकर मतकरी | १००/- |
| मुलांसाठी गमती-जमतीचा स्वयंपाक : रोहिणी सिंग | अनु. आशा परुळेकर | ६०/- |
| मायक्रोवेव्ह ओव्हन | राजश्री नवरे | ७०/- |
| अन्नसंरक्षण | राजकुमार कांबळे | १२०/- |
| अंतराळ | अनु. उमा कुलकर्णी | १००/- |
| अवस्था | अनु. उमा कुलकर्णी | ११०/- |
| डोंगराएवढा | अनु. उमा कुलकर्णी | ८०/- |
| नियती | माधवी देसाई | ६०/- |
| धुमारे | माधवी देसाई | ७०/- |
| किनारा | माधवी देसाई | ९०/- |
| शुक्रचांदणी | माधवी देसाई | १००/- |
| अणसार | अनु. अंजनी नरवणे | १८०/- |
| वडवाई | अंजनी नरवणे | २००/- |
| तत्त्वमसि | अंजनी नरवणे | १४०/- |
| टेक् २५ | अनु. अंजनी नरवणे | ४००/- |
| गहाण पडलेली टेकडी | अनु. अंजनी नरवणे | १२०/- |
| काँगो : मायकेल क्रायटन | अनु. अरुण मांडे | १६०/- |



| | | |
|---|---|---|
| डिस्क्लोजर : मायकेल क्रायटन | अनु. माधव कर्वे | २२०/- |
| ज्युरॅसिक पार्क : मायकेल क्रायटन | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | २५०/- |
| द फोर्थ के : मारिओ पुझो | अनु. वनिता सावंत | २००/- |
| क्रोमोझोम-६ : रॉबिन कुक | अनु. वैशाली जोशी | ३५०/- |
| द हॉट झोन : रिचर्ड प्रेस्टन | अनु.डॉ.प्रमोद जोगळेकर | २००/- |
| काळोखाची लेक : कॅथरीन दी जीजस | अनु. सरिता पदकी | १५०/- |
| द ब्रेडविनर : डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर | १००/- |
| द ब्लाइन्ड असॅसिन : मार्गरेट ॲटवूड | अनु. चारूता नानिवडेकर | २५०/- |
| चाईल्ड ऑफ द होलोकॉस्ट : जॅक कूपर | अनु. सिंधू जोशी | १३०/- |
| देवदास : शरच्चंद्र चट्टोपाध्याय | अनु. मृणालिनी गडकरी | ९०/- |
| ब्लास्फेमी : तेहमिना दुर्रानी | अनु. भारती पांडे | १००/- |
| शिवा डान्सिंग : भारती कर्चनर | अनु. मंजुषा गोसावी | २५०/- |
| संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती | अनु. लोकापूर/कानिटकर | ८०/- |
| द कंपनी ऑफ विमेन | खुशवंत सिंग | २००/- |
| स्पीड पोस्ट : शोभा डे | अनु. अपर्णा वेलणकर | २५०/- |
| द्वंद्व : विजयदान देथा | अनु. वनिता सावंत | १५०/- |
| रावीपार : गुलजार | अनु. पाडळकर/वेल्हाळ | १५०/- |
| अंतर-पर्व (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १३०/- |
| द स्ट्रीम विदिन (बंगाली कथा) | अनु. मीना वैशंपायन | १३०/- |
| इंटरप्रिटर ऑफ मॅलडीज् : झुंपा लाहिरी | अनु. भारती पांडे | १७०/- |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १००/- |
| भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया : नवाझ मोदी | अनु. वासंती फडके | ३००/- |
| योद्धा शास्त्रज्ञ : राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम | माधव मोर्डेकर | ४०/- |
| मोरावळा | शिवाजी सावंत | ६०/- |
| थॉट लीडर्स : श्रीनिवास पंडित | अनु. वकील / वाडकर | ३००/- |
| छत्रपती राजर्षी शाहू महाराज | तु. बा. नाईक | १००/- |
| मदर टेरेसा : ॲन सेबा | अनु. अनंत बेदरकर | २५०/- |
| चेहऱ्यामागचे चेहरे | महादेव मोरे | १५०/- |
| देव जो भूवरी चालिला : साईबाबा रंगास्वामी पार्थसारथी | अनु. लीना सोहोनी | १२०/- |
| जीवनयात्रा : अभिनेता-दिग्दर्शक मा. विनायक | भाई भगत | १५०/- |
| द जॉय ऑफ कॅन्सर : अनुप कुमार | अनु. माधुरी शानभाग | १५०/- |
| मनावर विजय : एकनाथ ईश्वरन् | अनु. वैशाली जोशी | १२५/- |

| | | |
|---|---|---|
| चिंतामुक्त जीवन | आर. डी. मुनोत | १६०/- |
| असे बना अन् बनवा विद्यार्थी | शं. व्यं. काश्यपे | १००/- |
| एकच पेला शिवाम्बूचा | डॉ. शशि पाटील | ९०/- |
| रेकी | शुभदा दामले | ६०/- |
| तारकांच्या विश्वात | पराग महाजनी | ३५०/- |
| सभेत कसे बोलावे | श्याम भुरके | ६०/- |
| महिलांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर महाम्बरे | ९०/- |
| कॉम्प्युटरच्या करामती | डॉ. बाळ फोंडके | ५०/- |
| फक्त खेळण्यांसाठी | डी. एस्. इटोकर | ७०/- |
| चला, प्रयोग करू या! | | |
| उर्जा | मीना किणीकर | २०/- |
| उष्णता | मीना किणीकर | २०/- |
| अन्न | मीना किणीकर | २०/- |
| परिस्थितीशास्त्र | मीना किणीकर | २०/- |
| रसायने | मीना किणीकर | २०/- |
| अवकाश | मीना किणीकर | २०/- |
| हवास्थिती | मीना किणीकर | २०/- |
| गती : चलन | मीना किणीकर | २०/- |
| ध्वनी | मीना किणीकर | २०/- |
| वाचनातून विज्ञान | डी. एस्. इटोकर | १००/- |
| शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी : | अनु. मीना किणीकर | ७०/- |
| नवचैतन्याचा झरा : डॉ. बाळ फोंडके | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | ६५/- |
| संभव असंभव | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | ८०/- |
| मेंदू आणि वर्तन | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | ७०/- |
| देव?छे!परग्रहावरील अंतराळवीर | बाळ भागवत | १००/- |
| विज्ञान प्रपंच | डॉ. बाळ फोंडके | १५०/- |
| ग्यानबाचं विज्ञान | डॉ. बाळ फोंडके | १३०/- |
| नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी | सुरेशचंद्र नाडकर्णी | ८०/- |
| शेतकऱ्याचा असूड | संपा.डॉ.नागनाथ कोत्तापल्ले | ७०/- |
| सुंदर आपली फुलबाग | आ. बा. पाटील | १००/- |
| सुंदर आपला रोपमळा | आ. बा. पाटील | १२०/- |
| एकवचनी | संजय राऊत | ३५०/- |
| प्रहार | प्रकाश पोहरे | १५०/- |
| आपल्या आत्म्यांची लुटालूट : अरुण शौरी | अनु. सुधा नरवणे | ३००/- |
| द अदर साईड ऑफ सायलेन्स | | |
| उर्वशी बुटालिया | अनु. नारायण आवटी | २५०/- |



| | | |
|---|---|---|
| धर्मयुद्ध | डॉ. रवींद्र ठाकूर | २५०/- |
| भंडारभोग | राजन गवस | १५०/- |
| तीन दगडाची चूल | विमल मोरे | १५०/- |
| काट्यावरची पोटं | उत्तम बंडु तुपे | १००/- |
| वज्रकमळ घननीळ | धनंजय देशपांडे | २००/- |
| मृद्गंध | इंदिरा संत | १६०/- |
| कांचनकण | शिवाजी सावंत | ८०/- |
| रंगल्या रात्री | संकलनः अरुण शेवते | ८०/- |
| स्वप्नी जे देखिले | संकलनः अरुण शेवते | ९०/- |
| सुखशांतीच्या शोधात | अंजली ठकार | १००/- |
| या सुखांनो | सुरेश नाईक | १७०/- |
| भारतीय शिल्प वैभव | सु. र. देशपांडे | १५०/- |
| ग्रामीण बोलीचा शब्दकोश | द. ता. भोसले | ११०/- |
| पत्रकारितेची मुलतत्त्वेः प्रभाकर पाध्ये | अनु. प्र. ना. परांजपे/ | |
| | वसुधा परांजपे | ७०/- |
| चांगदेव पासष्टी | वा. पु. गिंडे | ३०/- |
| शिवार | विजय कुवळेकर | १००/- |
| ईगीन | महादेव मोरे | १५०/- |
| सामक्षा | सुमेध वडावाला(रिसबूड) | २००/- |
| कालिंदीच्या तीरावरती | य. दि. फडके | ७५/- |
| सिरसी | सतीश सुरवसे | ७०/- |
| शोधकथा इन्सपेक्टर व्ही अनंतांच्या | अनंत वाईकर | १६०/- |
| कोंडवाडा | दया पवार | ४०/- |
| उत्सव | सुप्रिया वकील | ५०/- |
| काळोख देत हुंकार | दिलीप परदेशी | ४०/- |
| नाटक | दिलीप परदेशी | १२/- |
| अखेरचा सवाल | वसंत कानेटकर | ७०/- |
| मराठी व्याकरण परिचय | राजशेखर हिरेमठ | ८०/- |
| कुसुमाग्रज/शिरवाडकर एक शोध | डॉ. द. दि. पुंडे | ७०/- |
| निवडक 'भाषा आणि जीवन' | संपा. कल्याण काळे/ | |
| | मृणालिनी शहा | २००/- |
| एकनाथांची निवडक भारुडे | डॉ. वसंत जोशी | ४०/- |

## साधंसुधं...

# एका नोटेची गोष्ट

**प्रमोदिनी वडके-कवळे**

लवकरात लवकर काही महत्त्वाच्या कामासाठी पोचायचंय म्हणून घरातली दोनचार कामं बाजूला ठेवून आपण गडबडीने घराबाहेर पडलोय आणि नेमकी आपल्याला हव्या असलेल्या नंबरची बस अगदी आपल्या नजरेसमोर सुटताना दिसतेय□.

.. अशा वेळी नेमकं काय वाटतं याचं वर्णन करायला कोणत्याही भाषेतल्या कुठल्याही शब्दकोशात योग्य शब्द दिलेले नाहीत. चीड, पराभव, आत्मविश्वासाला लागलेली थेंबथेंब गळती ,आता दिवसभरात कुठचंच काम धड होणार नाही असा निराशाजनक अंधविश्वास. एक शतांश मिलीसेकंदाच्या त्या कालखंडात कितीतरी भावनांचा सुरूंग ठासून भरलेला असतो. त्याक्षणी समोर येऊन एखाद्याने अगदी साध्या शब्दाची काडी लावली तरी या सगळया भावनांचा दणदणीत स्फोट होण्याची अगदी एकशेपन्नास टक्के शक्यता असते.

त्यादिवशी माझ्या बाबतीत अगदी हेच घडलं असतं. मी जेमतेम चार पावलांच्या अंतरावर असताना कंडक्टरने खणखणीत डबल बेल दिली. क्षणभर मी निराश झाले खरी पण दुसऱ्याच क्षणी जिवाच्या कराराने झेप घेतली आणि ती जवळजवळ हातून सुटलेली बस गाठलीच. विजयी मुद्रेने मी बसच्या पायऱ्या चढताच कंडक्टरने माझ्याकडे बघून आधी एक तुच्छतादर्शक कटाक्ष फेकला आणि मगच माझ्यापुढे चिमटा खटखटवला.. ''कुठं जायचं बोला.''

त्याचा तुच्छ कटाक्ष पाहिलाच नाही अशा ऐटीत मी पटकन माझ्या इच्छित स्टॉपचं नाव सांगितलं आणि पन्नासची नोट काढून त्याच्यापुढे धरली.

''सुट्टे पैसे काढा बाई.'' त्याने खरखरीत आवाजात माझ्या बस मिळवण्याच्या विजयावर बोळा फिरवला.

''खरंच सुट्टे नाहीत माझ्याकडे.'' माझा केविलवाणा स्वर.

यावर तो काहीही उत्तर न देता माझ्या हातातली नोट हिसकावून उर्मटपणे पुढे निघून गेला आणि मी बस गाठण्याचा आनंद आपल्याला आता पन्नास रूपयाला पडतोय की काय या फिकीरीत पुढचा प्रवास करत राहिले.

पण आज नशिब खरंच जोरावर होतं. उतरताना कंडक्टरने मुकाट्याने माझ्या हातात उरलेले पैसे ठेवले. चला कोणताही भुर्दंड न भरता आपल्याला वेळेवर आणि नशिबावर छोटासा का होईना पण विजय मिळवता आला.. या समाधानात ते पैसे पर्समधे कोंबून मी गडबडीने पुढे निघाले.



पण संध्याकाळी निवांतपणे पर्स बघितली लागले मात्र कंडक्टरच्या मौनातला धोरणीपणा माझ्या लक्षात आला. त्याने परत दिलेल्या रकमेतली वीस रूपयाची एक नोट म्हणजे चक्क दोन वेगवेगळया नोटांचे उलटसुलट चिकटवलेले दोन भाग होते. ती नोट पुढे खपवणं फारच मुश्कील होतं. म्हणजे खरंच आजचा 'विजयी प्रवास' मला तिकीटाची रक्कम अधिक वीस रूपये एवढ्यालाच पडला होता.

दुसऱ्या दिवशी मी ती नोट पुन्हा बसच्या तिकीटासाठी खपवण्याचा प्रयत्न केला. आज अर्थातच कंडक्टर वेगळा होता. ''ही नोट चालणार नाही बाई. दुसरी द्या.'' त्याने जाहीर स्वरात मला शिक्षा सुनावली.

''पण ही मला एका कंडक्टरनेच दिलीय काल.'' मी पडलेल्या सुरात माझी बाजू मांडण्याचा प्रयत्न केला.

''सगळया खराब नोटा कंडक्टरच्याच नावावर खपवल्या जातात. लोकांना वाटतं कंडक्टरचा प्रेसच आहे खराब नोटा छापायचा.'' त्याच्या या 'विनोदा'वर खूष झाल्यासारखे बसमधले सगळे प्रवासी माझ्याकडे बघून हसले. मी मुकाट्याने पर्समधली दुसरी नोट काढली..

रोजच्या भाजीवालीला ती नोट दिली तर तिने ''बाई. पयसं नसलं तर ऱ्हाऊ द्या की. तुमी कुटं पळून नाय जानार.'' अशी साखरपेरणी करून ती नोट परत माझ्या ओटीत टाकली.

म्हणून मग रोज ज्याच्याशी गाठ पडणार नाही अशा अनोळखी रिक्षावाल्याला मी ती देऊन पाहिली. त्याने माझ्याकडे असं काही संशयाने पाहिलं की क्षणभर मलाही मी कुठच्यातरी बनावट नोटा छापणाऱ्या टोळीतली आहे की काय असंच वाटलं. गुपचूप त्याच्या हातातून ती नोट परत घेऊन मी पर्समधली चिल्लर त्याच्या हातावर ओतली.

जिथे जिथे ती नोट 'चालेल' असा मला भरवसा वाटला तिथे तिथे मी ती चालवून बघितली. पण दरवेळी तिने माझा विश्वासघातच केला. कुणी गोड बोलून तर कुणी परखड शब्दात संभावना करून ती नोट मला परत केली.

असे पराभव मग रोजचेच झाले. केवळ त्या वीस रूपयांसाठी वेळ काढून रोजची वाट वाकडी करून बँकेत जाणं आणि एकदाची ती नोट 'चालवून टाकणं' काही मला जमत नव्हतं आणि वीस रूपयांच्या घसघशीत रकमेवर निष्कारण पाणी सोडायलाही माझं मध्यमवर्गी मन तयार होत नव्हतं. एखाद्या वय वाढलेल्या कुरूप मुलीसारखी माझ्या पर्समधली ती नोट कुठेही खपत नव्हती आणि तरीही वधूपित्याच्या जन्मजात चिकाटीने मी रोज ती खपवायचा आटोकाट प्रयत्न करत होते. त्या वीस रूपयांमुळे माझ्या पुण्याच्या महाराष्ट्राच्या भारताच्या किंवा जागतिक रिझर्व बँकेच्यासुद्धा आर्थिक परिस्थितीत फारसा फरक पडणार नव्हता. पण तरीही पर्स उघडली की त्या नोटेकडे बघून मी अस्वस्थ

व्हायची. ही धड खरीही नाही आणि धड खोटीही नाही अशी नोट कुठेतरी खपली पाहिजे. एका हातातून दुसऱ्या हातात जात लौकरात लौकर चलनातून बाद झाली पाहिजे अशी कळकळ मला वाटायची. नोटांच्या गठ्ठ्यातून पुढे सरकवून एकदाची ती नोट 'चालवून' टाकावी असा धूर्त विचारही मनात येउन जायचा.. पण महिन्याचा शेवटचा आठवडा असल्यामुळे कुणाला असे गठ्ठ्याने पैसे द्यायचा खानदानी इज्जतवाला प्रसंगही येत नव्हता.

त्या वीस रूपयांच्या नोटेने माझी पुरती झोप उडवली होती.

वास्तविक पासापुरते मार्क मिळवण्याइतका का होईना पण मीही अर्थशास्त्राचा थोडाफार अभ्यास केलेला आहे. लोकांच्या मानसिकतेमुळे चलनात नव्याने आलेली नोटानाणी विनीमयात अडथळा बनून रहातात आणि जुन्या नाणी नोटांमुळे चलनाचा प्रवाह वाहता रहातो हा सिद्धांत मला ठाऊक आहे. कितीतरी वेळा मी स्वत:ही तो अनुभवलेला आहे. □□

एकदा ऑफिसमधून येताना अचानक रस्त्यात वीरू भेटला. आग्रहाने बाजूच्या गुऱ्हाळात रस प्यायला घेऊन गेला. जुन्या चाळीतल्या आठवणींच्या गप्पा मारत तो चवीने रस पीत होता. पण मी मात्र त्याच्या रसाळ गप्पा जरा सावधपणेच ऐकत होते. त्याच्या गप्पांचा नेमका हेतू माझ्या लक्षात येत नव्हता.

वीरू आणि त्याची विधवा आई पूर्वी आमच्या शेजारी रहायचे. आई अतिशय गरीब. नम्र. पण वीरू नको एवढा स्वाभिमानी मात्र अभ्यासात अतिशय तल्लख. आई सैंपाकाची पोळ्यांची कामं करून त्याला शिकवायची. पण मधेच वीरूला वाईट संगत लागली. बारावीला नापासच झाला तो. नंतर कुठेतरी साध्याशा नोकरीला चिकटला. त्याच सुमारास आम्ही ती जागा बदलल्यामुळे त्या कुटुंबाची फारशी हालहवाल कळली नव्हती.

आज अचानक समोर आलेल्या वीरूकडे बघून मला मधल्या घडामोडींचा अंदाज लावता येत नव्हता.. अंगावर कडक इस्त्रीचे कपडे. चेहऱ्यावर तोच मगरूर बेफिकीर भाव.

''काय करतोस सध्या मी वरवर चौकशीच्या स्वरात विचारलं.

''व्यक्तीमत्त्व विकासाचे वर्ग घेतो.'' त्याने ऐटीत उत्तर दिलं.

माझ्या नजरेत अर्थातच लख्ख अविश्वास. नक्कीच बंडल मारतोय हा.

माझ्या नजरेतला अविश्वास वीरूला सहज वाचता आला. हसून त्याने विचारलं. ''काकू आत्ता तुझ्या पर्समधे एखादी नोट आहे?''

माझ्या मनात आसुरी आनंदाच्या लाटा.. म्हणजे माझा अंदाज बरोबरच निघाला. वीरू अजून तसाच -दुसऱ्यांकडे पैसे उसने मागणारा उनाड मुलगाचं आहे. त्या व्यक्तीमत्त्व विकासवर्गाच्या नुसत्या गप्पा.. आणि ही एक ग्लास रसाची लाच केवळ माझ्याकडून पैसे उकळायला.

एकदम मला पर्समधल्या त्या नोटेची आठवण झाली. ती नोट खपवायला ही बरी संधी होती. मी झटकन ती नोट काढून वीरूच्या हातात ठेवली. त्याने त्याहूनही झटकन ती खाली टाकली आणि सिगारेट विझवावी तशी बुटाने चिरडली.

''..अरे अरे..'' मी रागाने ओरडले. न खपणारी असली तरी माझ्या पर्समधली लक्ष्मी होती ती.

त्याने हसून ती नोट उचलली आणि माझ्यासमोर धरली. ''आता ही नोट कितीची आहे सांग बरं.''

''वीस रूपयांचीच.'' मी घुश्शात म्हणाले. त्याने ती पुन्हा मुठीत धरून चुरगाळली आणि उघडून माझ्यापुढे धरत विचारलं. ''आता?''

''काय पोरखेळ चाललाय हा तुझा?'' आता मात्र मी संयम सोडून ओरडलेच त्याच्या अंगावर. ''फाटली चुरगाळली तरी नोटेची किंमत कमी होत नाही.''

तेच मलाही सांगायचंय. माणसांचंही तेच असतं. कोणतीही परिस्थिती आली तरी त्याची किंमत कमी होत नाही. हां.. मात्र त्याने स्वत:ने आधी स्वत:ची किंमत ओळखायला हवी. माझ्यासारखी माझ्याबद्दल तुम्हा लोकांचे खुप गैरसमज होते. अजूनही आहेत. पण मी माझी किंमत चांगली ओळखून आहे. मध्यंतरी वहावत गेलो होतो. पण आता स्थिर आहे. इतरांना उभं रहायला हात देतोय. कळलं? ही घे तुझी नोट.''

मी ओशाळून अवाक उभी.

जरा वेळाने तोच समजुतीच्या सुरात म्हणाला ''माफ कर काकू. जरा आगाऊपणे वागलो मी. पण जुन्या चाळीतलं कुणीही भेटलं की मी प्रेमाने बोलायला जातो आणि ते मात्र मला तसाच वाह्यात मुलगा समजून माझ्याशी बोलतात वागतात. मग एकदम मेंदू सरकतो माझा.

''अरे चालायचंच.'' मीही परिस्थिती सावरून घेतली. ''पण तू उदाहरण मात्र फार छान दिलंस हं.

वीरू मोठ्याने हसला. ''आमच्या व्यक्तीमत्त्व विकास वर्गातला अगदी प्राथमिक धडा आहे तो. प्रत्येकाने शिकायला हवा असा.''

जाताना पाठमोरा वीरू जरा जास्तच रूबाबदार दिसला.

अजूनही ती नोट माझ्या पर्समधे तशीच आहे. आता मी ती खपवायचा प्रयत्न करत नाही. कारण पर्स उघडल्यावर ती हाताला लागली की मला वीरू आणि त्याचा तो 'प्राथमिक धडा' आठवतो.

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८




*** राज्य सरकारचे साहित्य पुरस्कार वर्ष २००५ - २००६**

| पुरस्कार | पुस्तकाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| **काव्य** | | |
| केशवसुत पुरस्कार | जगण्याच्या पसाऱ्यात | प्रफुल्ल शिलेदार |
| बालकवी पुरस्कार | कुठल्याही विरामचिन्हाशिवाय | अविनाश साळापुरीकर |
| बहिणाबाई पुरस्कार | दर साल दर शेकडा | वीरधवल परब |
| **नाटक** | | |
| गडकरी पुरस्कार | फायनल ड्राफ्ट | गिरीश जोशी |
| किर्लोस्कर पुरस्कार | विकल्प | दादाकांत धनविजय |
| लोटू पाटील पुरस्कार | खुर्चीवरचा शहाणा | किसन नामदेव गंगावणे |
| **कादंबरी** | | |
| वि.वा.शिरवाडकर | आघात | कुमार देशमुख |
| ह. ना.आपटे पुरस्कार | ब्र | कविता महाजन |
| वि. स.खांडेकर | कळा | उत्तम बंडू तुपे |
| साठे पुरस्कार | गावठाण | कृष्णात तुकाराम खोत |
| उद्धव शेळके पुरस्कार | आणि धरणीकंप होत राहिला | भालचंद्र देशपांडे |
| **कथा** | | |
| दिवाकर कृष्ण | गाठी गाठी जीव | राजन खान |
| पु.भा.भावे | गोंदणवेणा | सुरेश पाचकवडे |
| ग. ल. ठोकळ | चौकटीबाहेर | प्रमोद कोपर्डे |
| बी. रघुनाथ पुरस्कार | माती आणि कागुद | आप्पासाहेब खोत |
| **ललित गद्य** | | |
| अनंत काणेकर | स्टुडिओ | सुभाष अवचट |
| वि.द. घाटे पुरस्कार | सहप्रवासी | वसंत सरवटे |
| ताराबाई शिंदे | एक पूर्ण-अपूर्ण | नीला सत्यनायण |
| मधुकर केचे | कोरा कागद निळी शाई | नंदिनी आत्मसिद्ध |
| **चरित्र, आत्मचरित्र** | | |
| लक्ष्मीबाई टिळक | खाली जमीन वर आकाश | डॉ.सुनीलकुमार लवटे |



| | | |
|---|---|---|
| न. चिं. केळकर | कायदे आझम | आनंद हर्डीकर |
| धनंजय कीर | या सुखांनो या | रमेश नारायण देव |
| **समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र** | | |
| श्री. के. क्षीरसागर | बहुपेडी विंदा खंड एक | विजया मंगेश राजाध्यक्ष |
| कुरुंदकर पुरस्कार | मर्ढेकरांची कविता आकलन, आस्वाद आणि चिकित्सा | डॉ.अक्षयकुमार काळे |
| कुसुमावती देशपांडे | स्त्रियांचे गद्यलेखन | डॉ.मधुबाला खोपडे |
| वा. ल. कुलकर्णी | साहित्याचे संदर्भ | हरिश्चंद्र थोरात |
| **इतिहास- अर्थशास्त्र- राज्यशास्त्र- समाजशास्त्र** | | |
| म. ज्योतिराव फुले | प्रेषितानंतरचे पहिले चार आदर्श खलिफा | शेषराव मोरे |
| डॉ. आंबेडकर | संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव | प्रा. डॉ. द.ना.धनागरे |
| **तत्त्वज्ञान मानसशास्त्र आणि शिक्षणशास्त्र** | | |
| नाना पाटील | सम्राट अकबर | रवींद्र गोडबोले |
| भाऊराव पाटील | शिक्षणातील चांगले काही | रेणू दांडेकर |
| यशवंतराव चव्हाण | आनंदयात्रा संगोपनाची | डॉ. लता काटदरे |
| बॅ. नाथ पै | बोधिसत्व आंबेडकरांचे बुद्ध धम्म मिशन | श्याम तागडे |
| **भाषाशास्त्र व व्याकरण** | | |
| ना. गो. कालेलकर | सामाजिक भाषा विज्ञान | डॉ. रमेश धोंगडे |
| दादोबा पांडुरंग | लेवा गणबोली कोश | नीलकंठ रामदास पाटील<br>उर्मिला नीलकंठ पाटील |
| ना. गो. नांदापूरकर | जनभाषेच्या शोधात | सुभाष दामोदर सावरकर |
| **भौतिकशास्त्र, तंत्रविज्ञान** | | |
| सी. डी. देशमुख | तारकांच्या विश्वात | पराग महाजनी |
| डॉ. एन.आर.तावडे | आइनस्टाइनचा सापेक्षतावाद | डॉ. अरविंद पारसनीस |
| डॉ. पंजाबराव देशमुख | अवकाशातील आघात नि अपघात | रामचंद्र ज्ञा. शेळके |
| **एकांकिका** | | |
| मामा वरेरकर | आमचाबी पंधरा आगस्ट आणि इतर एकांकिका | डॉ. विलासराज भद्रे |
| दादासाहेब धनवटे | मृत्यूदंड | चंद्रकांत भोसले |
| जयवंत दळवी | समन्स | डॉ.सतीश साळुंके |

**विनोद**

| | | |
|---|---|---|
| कोल्हटकर/आचार्य अत्रे | झिंग आणि झटके | आनंद देशपांडे |
| दत्तू बांदेकर | पर्स हरवलेली बाई | मंगला गाडबोले |

**ललित विज्ञान**

| | | |
|---|---|---|
| र.धो. कर्वे | ईश्वराचा जन्म | डॉ. यशवंत देशपांडे |
| संत तुकडोजी महाराज | कहाणी कोयनेची | उषा तांबे |

**संकीर्ण**

| | | |
|---|---|---|
| भाई बागल | आयडियाज आर डेंजरस | राजू परुळेकर |
| कृष्णराव भालेकर | नग आणि नमुने | शिवराज गोर्ले |

**क्रीडाशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| राजर्षी शाहू महाराज | मुष्टीयोद्धा | ॲड. शंकर निकम व राजन जोथाडी |

**अनुवादित**

| | | |
|---|---|---|
| लक्ष्मणशास्त्री जोशी | कलिकथा व्हाया बायपास | जयप्रकाश सावंत |
| वा. रा. कांत | मागोवा | अनुरेखा ढोले |

**संपादित**

| | | |
|---|---|---|
| डॉ.व्ही.बी.कोलते | सर्वोत्कृष्ट मराठी कथा खंड दोन उत्तरार्ध | राम कोलारकर |

**आधारित**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेमहाराज | नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या लोककथा | डॉ. अरुण प्रभुणे |

**संशोधन**

| | | |
|---|---|---|
| ग. त्र्यं. माडखोलकर | आंबेडकरी जलसे | डॉ. भगवान ठाकूर |

**ललितकला आस्वादपर लेखन**

| | | |
|---|---|---|
| पु. ल. देशपांडे | नादवेध | अच्युत गोडबोले व सुलभा पिशवीकर |

**शेती व शेतीपूरक लेखन**

| | | |
|---|---|---|
| वसंतराव नाईक | शेतीचे कायदे | शेखर गायकवाड |

**दलित,पददलित साहित्य**

| | | |
|---|---|---|
| अण्णाभाऊ साठे | पारधी | गिरीश प्रभुणे |

**संगणक,इंटरनेट, पर्यावरण व संरक्षणशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| रँग्लर परांजपे | बखर पर्यावरणाची आणि विवेकी पर्यावरणवाद्याची | अतुल देऊळगावकर |



**बृहन्महाराष्ट्र पुरस्कार**

| | | |
|---|---|---|
| वि. रा. शिंदे | वनराईचा लढा | अनिल परुळेकर |
| सयाजी गायकवाड | वानप्रस्थ | गणेश देवी |

**बालवाङ्मय कविता**

| | | |
|---|---|---|
| भा. रा. तांबे | खूप मजा करू | मीरा सिरसमकर |
| वा. गो. मायदेव | बबलू छबलू | प्रा.सय्यद अमिनोद्दीन |

**बालवाङ्मय नाटक**

| | | |
|---|---|---|
| राम गणेश गडकरी | आईशप्पथ | विनिता पिंपळखरे |
| शाहीर अमरशेख | बाप पिकवतो घास, त्याला गळफास | प्रा. सय्यद अमीनोद्दीन |

**बालवाङ्मय कादंबरी**

| | | |
|---|---|---|
| गोपीनाथ तळवलकर | एक हिरवंगार वर्ष | रेणू पाचपोर |

**बालवाङ्मय छोट्या गोष्टी**

| | | |
|---|---|---|
| सानेगुरुजी | या लाडक्या मुलांनो | अरुणा भागवत |

**बालवाङ्मय लोककथा**

| | | |
|---|---|---|
| ना. धो. ताम्हणकर | दूर देशांच्या लोककथा | शरयु सोनावळे |

**बालवाङ्मय एकांकिका**

| | | |
|---|---|---|
| वा. गो. आपटे | गोष्टीची गोष्ट | गोविंद गोडबोले |

**बालवाङ्मय चरित्रे**

| | | |
|---|---|---|
| वि. को. ओक | जमशेदजी टाटा | सुभाषचंद्र जाधव |
| ग. ह. पाटील | नारी माता नारायणी | प्रा. उर्मिला अघोर |

**बालवाङ्मय ललित गद्य**

| | | |
|---|---|---|
| ना. वा. टिळक | विचित्र माणसांचे विश्व | निरंजन घाटे |

**बालवाङ्मय सर्वसामान्यज्ञान छंद व शास्त्रे**

| | | |
|---|---|---|
| यदुनाथ थत्ते | वैज्ञानिक सर्जनशीलता | डी.एस.इटोकर |
| राजा केळकर (विभागून) | दुर्मिळ प्राणी | डॉ. विलास गाजरे |
| | कथारुपी खगोलशास्त्र | लिना दामले |

**पुरस्कार विजेत्या सर्व लेखकांचे, प्रकाशनसंस्थांचे मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे हार्दिक अभिनंदन!**

## * ज्येष्ठ साहित्यिक 'मधु मंगेश कर्णिक' यांना २००६ सालचा 'डॉ. लाभसेटवार साहित्य सन्मान पुरस्कार' जाहीर

मराठी ललित साहित्यावर चिरकाल ठसा उमटणाऱ्या साहित्यिकास देण्यात येणारा, साहित्यजगतात सन्मानाचा मानला जाणारा 'डॉ. लाभसेटवार साहित्य सन्मान पुरस्कार' या वर्षी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. मधु मंगेश कर्णिक यांना जाहीर झाला आहे.

अमेरिकेतील डॉ. लाभसेटवार फौंडेशनतर्फे प्रतिवर्षी दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराची घोषणा डॉ. अनंत लाभसेटवार आणि प्रकाशक अनिल मेहता यांनी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'मध्ये आयोजित पत्रकारपरिषदेत केली.

एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या फेब्रुवारीमध्ये मुंबईत होणाऱ्या सोहळ्यात हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान केला जाईल.

दहा कादंबऱ्या, दोन लघुकादंबऱ्या, चाळीस कथासंग्रह, सहा ललितगद्यसंग्रह अशी विपुल ग्रंथसंपदा निर्माण करणारे कर्णिक सध्या महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आहेत. १९९० साली रत्नागिरी येथे आयोजित केलेल्या ६४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. भारत सरकारच्या पद्मश्री पुरस्कारासह रणजित देसाई पुरस्कार, भैरुरतन दमाजी पुरस्कार, कोकण साहित्यभूषण आदी पुरस्कारांनी श्री. कर्णिक यांना गौरवण्यात आले आहे.

यापूर्वी लाभसेटवार पुरस्कार श्री. ना. पेंडसे, विंदा करंदीकर, गंगाधर गाडगीळ, भालचंद्र नेमाडे, डॉ. आनंद यादव तसेच डॉ. अनिल अवचट आदी ज्येष्ठ साहित्यिकांना प्राप्त झाला आहे.

पुरस्कार निवड समितीत डॉ. आनंद यादव, डॉ. सुनीलकुमार लवटे, अनिल व सुनिल मेहता यांचा समावेश होता.

### *'खाली जमीन वर आकाश'ला 'ना. ह. आपटे' पुरस्कार

कोरेगाव, सातारा येथील देशभक्त दादासाहेब साखवळकर प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या 'ना. ह. आपटे' ग्रंथ पुरस्कारासाठी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित, डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या 'खाली जमीन वर आकाश' या पुस्तकाची निवड करण्यात आली. १९ नोव्हेंबर रोजी कोरेगाव येथील साखळकर भवनात ज्येष्ठ कादंबरीकार रंगनाथ पाठारे यांच्या हस्ते 'डॉ. लवटे' यांना सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ समीक्षक द.ता. भोसले हे अध्यक्षस्थानी होते.

रु. १००० रोख, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून या समारंभात सातारा, सांगली परिसरातील अनेक मान्यवर कवी, लेखक, समीक्षक आणि साहित्यप्रेमी हजर होते.



## * 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या तीन पुस्तकांना राज्य पुरस्कार

'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे प्रकाशित झालेल्या तीन पुस्तकांना २००६ सालचे महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार मिळाले. चरित्र/आत्मचरित्र या विभागात डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या 'खाली जमीन वर आकाश' या आत्मचरित्राला प्रतिष्ठेचा 'लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार' जाहीर झाला.

भौतिकशास्त्र व तंत्रविज्ञान विभागात 'पराग महाजनी' यांच्या 'तारकांच्या विश्वात' या खगोलशास्त्रविषयक संदर्भग्रंथाला सन्मानाचा सी. डी. देशमुख पुरस्कार आणि छंद व शास्त्र विभागात 'लीना दामले' यांच्या 'कथारूपी खगोलशास्त्र' या पुस्तकाला 'राजा केळकर' पुरस्कार जाहीर झाला. दोन हजार ते दहा हजार रुपये रोख, मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

यशस्वी लेखकांचे मेहता पब्लिशिंग हाऊस परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

## * तुर्कस्तानच्या पामुक यांना साहित्याचे नोबेल

'माय नेम इज रेड' आणि 'स्नो' या 'बेस्टसेलर' पुस्तकांचे लेखक ओऱ्हान पामुक यांना साहित्याचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. तुर्कस्तानचे पामुक यांच्या पुस्तकांची कीर्ती याआधीच जगभर पसरली आहे. शिवाय, व्यक्तिस्वातंत्र्यासाठी त्यांनी दिलेला लढाही नावाजला गेला आहे.

'लेखनातून इस्तंबूलचा शोध घेताना पामुक यांनी शहरातील संस्कृतीची वाण आणि त्यातील संघर्ष यांची नवी प्रतिके शोधली,' असे शब्दांत परीक्षकांनी त्यांचे साहित्य नावाजले आहे. त्यांची पहिली कादंबरी १९८२ मध्ये प्रसिद्ध झाली. तुर्कस्तानातील कुर्दिश अल्पसंख्य समूहाला मिळणाऱ्या अपमानास्पद वागणुकीवर या कादंबरीत परखड भाष्य आहे.

या नोबेल पुरस्कारात १३.७ लाख डॉलर्स सुवर्णपदक आणि मानपत्र असेल. १० डिसेंबरला स्टॉकहोममध्ये हा कार्यक्रम होईल.

## * डॉ. नरेंद्र जाधव यांना प्रभुणे पुरस्कार

श्रीक्षेत्र माहुली (ता. सातारा) येथील 'न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठान'तर्फे देण्यात येणारा यंदाचा 'न्या. रामशास्त्री प्रभुणे सामाजिक न्याय पुरस्कार' पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर झाला आहे.

पाच हजार रुपये रोख, सुवर्णपदक व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून, पेशव्यांचे सरन्यायाधीश म्हणून काम पाहिलेल्या रामशास्त्री प्रभुणे यांच्या

२१७ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात तो देण्यात येणार आहे.

सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यासाठी धडपडणाऱ्यांना हा पुरस्कार देण्यात येतो. आजवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गं. बा. सरदार, बाबा आमटे, यशवंतराव चव्हाण, एस. एम. जोशी, नानाजी देशमुख, गोविंदभाई श्रॉफ, पांडुरंगशास्त्री आठवले, अप्पासाहेब पवार, बाळासाहेब भारदे, डॉ. बानू कोयाजी, डॉ. अभय व राणी बंग, मोहन धारिया, नसिमा हुरजूक, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. नरेंद्र जाधव हे सामाजिक न्यायाचे प्रतीक बनून राहिले आहेत. आत्मविश्वास, समन्वयवादी वृत्ती, समस्यांवर मात करणारी दुर्दम्य इच्छाशक्ती या त्यांच्या गुणांमधून जनसामान्यांना प्रेरणा मिळाली आहे. अर्थकारण, समाजकारण, संस्कृती अशी विविध क्षेत्रे आत्मउन्नतीसाठी व आत्मविकासासाठी खुली आहेत, हे पटवून देण्याच्या त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ हा पुरस्कार दिला जात आहे.

## * विजय दर्डा यांना पत्रकारितेतील गर्गे स्मृती पुरस्कार

बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारा स. मा. गर्गे स्मृती पुरस्कार या वर्षी 'लोकमत'चे समूह संपादक विजय दर्डा यांना जाहीर झाला आहे.

स. मा. गर्गे यांचा प्रथम स्मृतिदिन ४ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात आला. बीड जिल्हा पत्रकार संघाने त्यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात यासाठी त्यांच्या नावाने पुरस्कार देण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रातील नामवंत पत्रकारांना हा पुरस्कार देण्यात येतो. या अगोदरचा पुरस्कार 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक भारतकुमार राऊत यांना प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ, फेटा असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## * मुंबई साहित्य संघ पुरस्कार

मुंबई मराठी साहित्य संघाच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्त डॉ. भालेराव नाट्यगृहात पुरस्कार वितरण सोहळा मधु मंगेश कर्णिक आणि डॉ. बाळ फोंडके यांच्या उपस्थितीत हा पार पडला.

डॉ. विजया राजाध्यक्ष यांना द्विखंडात्मक 'बहुपेडी विंदा' या ग्रंथासाठी ज्येष्ठ साहित्य समीक्षक पुरस्कार, 'ललितकलादर्श' संस्थेच्या शतकमहोत्सवानिमित्त नटवर्य भालचंद्र पेंढारकर यांना साहित्य संघ सेवा पुरस्कार, 'हृदयस्थ'च्या लेखिका ड. अलका मांडके यांना साहित्य समाज सेवा पुरस्कार, मोनिका गजेंद्रगडकर यांना 'भूक' कथासंग्रहासाठी नवकथा लेखिका पुरस्कार, 'ब्रह्मकमळ' या कथासंग्रहाचे लेखक यशवंत कर्णिक यांना १० हजार रुपयांचा साहित्य पुरस्कार आदी पुरस्कार देण्यात आले.

बरगड्यांच्या मुळापासून



मी हृदयाला मुक्त केले
जिथे जिथे धमनी आहे
तिथे माझे रक्त गेले...

कविवर्य विंदा करंदीकरांनी मुंबई मराठी साहित्य संघाचा ज्येष्ठ साहित्यिक पुरस्कार स्वीकारताना आणि संघाचे सन्माननीय सदस्यत्व गौरवाने स्वीकारताना उत्तरादाखल खड्या आवाजात आपली ही कविता पेश केली आणि उपस्थितांना आपल्या वैश्विक जाणिवांचा पुन्हा एकदा प्रत्यय दिला.

मराठी साहित्य आणि विज्ञान यांच्यात अजूनही बरेच अंतर असल्याची खंत व्यक्त करीत डॉ. बाळ फोंडके यांनी जगभरच्या मोठ्या लेखकांनी विज्ञान जगतातल्या घडामोडींचा वेध घेऊन त्यावर थोर साहित्यकृती निर्मिल्या हे सांगितले. अल्क्रा रेड किरणांनी मोनालिसाच्या गूढ हास्यामागचा नवा अर्थ शोधला आणि व्हॅन गॉगच्या 'मूनराइज' या गाजलेल्या चित्राचा खगोलशास्त्राच्या आधारे मागोवा घेऊन ते चित्र फ्रान्समध्ये कोणत्या वर्षी, कुठल्या पौर्णिमेला काढले असावे त्याचा अचूक घेतला गेला, यांचे मार्मिक दाखले देत, कला आणि विज्ञान यांचा कसा अन्योन्य संबंध आहे तेही त्यांनी सांगितले. नव्या बायो टेक्नॉलॉजीमुळे आणि इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीमुळे माणसाच्या भावविश्वात निर्माण होणारे नैतिक, सामाजिक आणि कायदेविषयक प्रश्न साहित्यिकांना आव्हान ठरू शकतात, असे सांगून डॉ. फोंडके म्हणाले की, मराठी साहित्य आणि विज्ञान यांची समांतर वाटचाल संपून कुठेतरी दोघांचा सांधा जुळावा, अशी माझी इच्छा आहे.

सुहासिनी कीर्तिकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कवयित्री अनुपमा उजगर यांनी सूत्रसंचालन केले.

## * डॉ. रेखा इनामदार साने यांना बाळाजी हुद्दार पारितोषिक

डॉ. रेखा इनामदार साने यांच्या 'अस्तित्ववाद आणि मराठी कादंबरी' ग्रंथाला यंदाचे कै. बाळाजी हुद्दार पारितोषिक देण्यात आला. विदर्भ संशोधन मंडळ आयोजित मानव्यशास्त्रांतर्गत मराठीतील वैचारिक ग्रंथास दिले जाणारे हे पारितोषिक १ जानेवारी २००४ ते ३१ डिसेंबर २००५ या कालावधीचे आहे.

दि. १९ नोव्हेंबर रोजी मंडळाच्या मिराशी सभागृहात डॉ. गो. मा. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली व मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्राचार्य रामभाऊ शेवाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

याप्रसंगी 'वाङ्मयीन संशोधन : सिद्धांत आणि उपयोजन' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

## * डॉ. जयंत नारळीकर, एस. बी. भोजे यांना फिरोदिया पुरस्कार

प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर आणि एस. बी. भोजे यांना यंदाचा

एच. के. फिरोदिया पुरस्कार २० नोव्हेंबर रोजी देण्यात आला.

विज्ञानाच्या क्षेत्रात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शास्त्रज्ञाला दरवर्षी एच. के. फिरोदिया फाउंडेशनच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो. कायनेटिक उद्योगसमूहाचे अध्यक्ष अरुण फिरोदिया यांनी आज या पुरस्काराची घोषणा केली. अनुक्रमे दोन लाख व एक लाख रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या कार्यक्रमाला प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यापूर्वी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉ. पी. चिदंबरम, डॉ. अनिल काकोडकर, डॉ. के. कस्तुरीरंगन, डॉ. सीएनआर राव आदी नामवंत शास्त्रज्ञांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## * निळू फुले यांना भावे पुरस्कार

देहू येथील संत तुकारामांच्या नावे दिला जाणारा पुरस्कार स्वीकारल्यानंतरस कोणताही पुरस्कार घ्यायचा नाही, असे ठरविले होते. पण मराठी रंगभूमीच्या परंपरेचे आपणही एक घटक आहोत, या भावनेतून आणि विष्णुदास भावे पुरस्काराच्या यादीत आपलेही नाव असावे, हा मोह टाळता न आल्याने हा पुरस्कार विनम्रपणे स्वीकारत असल्याचे उद्गार ज्येष्ठ नाट्यकर्मी व अभिनेते निळू फुले यांनी काढले.

अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीच्या वतीने श्री. फुले यांना रंगभूमीदिनी आद्य नाटककार विष्णुदास भावे गौरव पदक अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. दत्ता भगत यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. येथील विष्णुदास भावे नाट्यमंदिरात आज सायंकाळी आयोजित या गौरवसमारंभात विष्णुदास भावे यांच्या पुनर्मुद्रांकित चरित्राचे प्रकाशनही प्रा. भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

राष्ट्र सेवादलाचे काम करताना अनेकदा टक्के-टोणपे खाऊन कलापथके सादर केली. त्यावर सेवादलाचा संसार चालत होता. त्याकाळी चहालासुद्धा आमच्याजवळ पैसे नसायचे. मनातून आनंद आणि कामात रस होता म्हणूनच हे सर्व करू शकलो. राष्ट्र सेवादलाच्या पथनाट्यातूनच आपण ही कला आत्मसात केली.

लोकांना चांगली कलाकृती देणे व त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणे, हेही एक प्रबोधनच असल्याचे सांगून ते म्हणाले की, सांगलीतील अनेक आठवणी आजही आपल्या मनात ताज्या आहेत. 'कथा अकलेच्या कांद्याची', 'सखाराम बाईंडर', 'बेबी' अशा अनेक नाटकांच्या प्रयोगांना सांगलीकरांनी भरभरून दाद दिली आहे. वीस ते पंचवीस वर्षांचा काळ सांगलीकरांनी सुखासमाधानाने तर कधी पाठीवर कौतुकाची थाप मारून आपणाला शाबासकी दिली. त्यामुळेच विष्णुदास भावे गौरवपदक आपण विनम्रपणे स्वीकारत आहे, असेही निळू फुले



म्हणाले.

## * 'नवनीत जीवनगौरव पुरस्कार'

'नवनीत प्रकाशन'तर्फे राज्यातील राज्य व राष्ट्रीय पातळीवरील आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त १३१ शिक्षकांना 'नवनीत सन्मान' देण्यात आल्याचे पत्रकाद्वारे कळविले आहे. औरंगाबाद येथील तापडिया नाट्यमंदिर येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. दुर्गादास पाठक व डॉ. वसंत ताम्हणकर यांना 'नवनीत जीवनगौरव पुरस्कार' देण्यात आला. 'नवनीत यशोभारती पुरस्कार' हा या वर्षीपासून देण्यात येणार पुरस्कार प्राचार्य शिवाजीराव भोसले यांना देण्यात आला. कार्यक्रमाला माजी शिक्षण संचालक वि. वि. चिपळूणकर, माजी खासदार मोरेश्वर सावे आदी उपस्थित होते.

## * कथाकथन हेच वपुंचे बलस्थान : हृदयनाथ मंगेशकर

''हरहुन्नरी लेखक व. पु. काळे यांच्याकडे कवीचे, चित्रकाराचे गुण होते. मात्र, त्यांचे बलस्थान होते कथाकथनच. वपुंकडे शीघ्रकथाकथनाची हातोटी होती,'' असे मत ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांनी व्यक्त केले.

व. पु. काळे स्मृती प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या 'व. पु. कथन गौरव पुरस्कार' वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या वेळी मंगेशकर यांच्या हस्ते कथाकथन स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

पहिले पारितोषिक 'ऋणानुबंध' कथेसाठी ज्योती ब्रह्मे यांना, दुसरे पारितोषिक 'मीच तुमची वहिदा'साठी प्रसन्न गद्रे यांना, तर तिसरे पारितोषिक संज्ञा कुलकर्णी यांना 'पप्पा' या कथेसाठी देऊन गौरवण्यात आले. व्यासपीठावर 'द महाराष्ट्र ट्रस्टी अँड एक्झिक्युटर कंपनी'च्या मुख्य व्यवस्थापक भाग्यश्री भिडे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिरीष रायरीकर, सुहास काळे, स्पर्धेचे परीक्षक किशोर महाबोले, अनुराधा राजहंस, सुरेश पोरे होते.

मंगेशकर म्हणाले, ''वपुंशी माझा घरगुती परिचय होता. १९६९ मध्ये ते माझ्या 'भावसरगम'चे निवेदन करत असत. त्या वेळी कार्यक्रम नवीन होता आणि प्रेक्षक गडबड करीत. अशावेळी वपु हे आमचे ब्रह्मास्त्र होते. या कार्यक्रमात ते शीघ्रकथाकथन करून जात.''

या वेळी मंगेशकर यांनी दीनानाथ प्रतिष्ठानतर्फे 'वपु काळे प्रतिष्ठान'ला ५० हजार रुपयांची देणगी जाहीर केली.

गिरीश शितोळे, निलेश कुलकर्णी आणि अंजली शहा यांना उत्तेजनार्थ पारितोषिकांनी गौरविण्यात आले. ❐

**राज्य सरकारचा प्रतिष्ठेचा 'लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार' २००६**

अनाथाश्रमात वाढलेल्या व्यक्तीची कर्तृत्वसंपन्न सेवाभावी वाटचाल....

**डॉ. सुनीलकुमार लवटे**




**१५०रुपये पोस्टेज २५ रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

**राज्य सरकारचा प्रतिष्ठेचा 'राजा केळकर पुरस्कार' २००६**

अभ्यासकांनी गौरवलेले, शास्त्रीय परिभाषा असूनही सर्व स्तरावरील वाचकांना आकृष्ट करणारे पुरस्कारप्राप्त पुस्तक

क था रू पी

**खगोलशास्त्र**

**लीना दामले**

**१००रुपये पोस्टेज २० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

**राज्य सरकारचा प्रतिष्ठेचा 'सी. डी. देशमुख पुरस्कार' २००६**




**३५०रुपये**

**पोस्टेज ३० रु.**

**या पुस्तकात तुम्ही काय पहाल?**

* आकाशात दिसणाऱ्या सर्व ८८ तारकापुंजांची अद्ययावत वैज्ञानिक माहिती.
* तारकापुंजांच्या ग्रीक व हिंदू वाङ्मयातील कथा.
* निवडक दिर्घिकांची जगप्रसिद्ध दुर्बिणीतून घेतलेली छायाचित्रे.
* २७ नक्षत्रांचे आणि १२ राशींचे नकाशे.
* 'युरेनोग्राफिया' या सतराव्या शतकात प्रसिद्ध झालेल्या ॲटलासमधील सर्व छायाचित्रे.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

**वर्षभरातच चौथ्या आवृत्तीच्या प्रतिक्षेत.....**

# संभाजी

**विश्वास पाटील**

*आमच्या जिजाऊसाहेब आम्हांला नेहमी आठवण करून द्यायच्या- शिवबा, ह्या शंभूच्या वरवरच्या धसमुसळेपणावर जाऊ नकोस. हे पिवळेधमक खणखणतं नाणं आहे! पुढे मागे तुझ्या हिंदवी स्वराज्यावर तसाच प्रसंग ओढवला तर तुझा हा वेडा पोर प्रसंगी प्राण गमावेल, पण सत्त्व सांभाळेल!''*

**४८०रु.पोस्टेज ३५रु.**




माननीय प्रकाशक,
मेहता पब्लिशिंग हाऊस,

सुधा मूर्ती यांचे 'पुण्यभूमी भारत' हे पुस्तक वाचले. खूप आवडले.

सुधा मूर्ती यांना समाजसेवा करताना अनेक माणसे भेटली. त्या माणसांचं त्यांनी अतिशय साध्या भाषेत वर्णन केले आहे.

एकाच लेखामध्ये दोन विरुद्ध प्रवृत्तीची माणसे दाखवण्याची त्यांची स्टाइल आवडली.

मोठ्या प्रमाणात दान करतानासुद्धा त्यांना अनेकवेळा अपमानित व्हावं लागलं, पण तरी दानाचा वसा त्यांनी टाकला नाही (दृष्टिकोन). आपल्याला सुखी व्हायचं असेल तर आपला दृष्टिकोन आधी बदलला पाहिजे, जगाचा नाही (चप्पल घालून चाल), खऱ्या मैत्रीमध्ये सामाजिक स्थानाचा संबंध नसतो (निवडीचं स्वातंत्र्य) असे अनेक सकारात्मक विचार पुस्तकात आढळतात.

एकूण एकवीस लेखांचा हा गुच्छ संग्रही ठेवण्यासारखा आहे.

**उषा साठे, डोंबिवली पूर्व.**

प्रिय सुनील मेहताजी
सविनय प्रणाम!

आपली फ्रँकफर्टची यात्रा चांगली झाली असेलच! भारत देश ह्यावेळी अतिथी असल्यामुळे आपल्याला आणखी काही नवीन ऐकायला व पहायला मिळाले असेल. इंग्रजी भाषेतील बरीचशी पुस्तके तुम्ही मराठीत आणून मराठी वाचकांची वाचनकक्षा रुंदावली आहे. जगात चालणाऱ्या अवाढव्य विषयांची त्यातून माहिती मिळते व मराठी वाचकांचे ज्ञानही वाढते.

मराठी साहित्यातील प्रगल्भता जातीपाती व धर्मावर आधारित आहे. आर्थिक मागासलेपण हेदेखील कारण आहे. प्रेमचंद्र मुंशी यांनी साठ वर्षांपूर्वी कैक पुस्तके लिहिली. अस्पृश्यता, जातिभेद, अन्याय, अत्याचार या बाबी त्यांनी त्या काळात लेखनात आणल्या. आणि नंतरच मराठी साहित्याने त्याची दखल घेतली व ते दलित साहित्य म्हणून ओळखले जाऊ लागले. इथे लेखन-स्वातंत्र्य दिले ते तुमच्यासारख्या काही प्रकाशकांनी! पन्नास वर्षांपूर्वी 'दो बिघा जमीन' हा चित्रपट आला होता व त्याला राष्ट्रपतींचे पदकही मिळालेले आहे. तरीदेखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडतच आहेत. इथे कुठलाही प्रा. युनूस पैदा होत नाही! इथलं वास्तविक जीवन जो यथार्थपणे मांडू शकतो असलंही साहित्य मराठी भाषेत मिळत आहे. ते जगभर नेण्यासाठी आपल्यासारख्या मान्यवर प्रकाशकांनी प्रयत्न केले, तर मराठी भाषा जगाच्या पाठीवर समर्थपणे जाऊ शकेल. मराठी भाषेतली पुस्तके तिथपर्यंत नेण्याचे काम तुम्ही करू शकता असे वाटते.

**रवींद्र बागडे, मुंबई.**

वेळोवेळी आपले अंक मिळत असतात. त्यामुळे साहित्याविषयीची जाण वाढत जाते. फार पूर्वीपासून भाऊसाहेब खांडेकर, सानेगुरुजी हे माझे आदरस्थान. त्यांच्या साहित्याची माझ्या मनामध्ये जपणूक झाल्यासारखी वाटते. रणजित देसाई, विश्वास पाटील यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या वाचून एक निराळेच विश्व मनामध्ये तयार होते. (आपले वर्तमान वातावरण विसरून त्या काळात आपण वावरत आहोत असे वाटते.)

मेहता मराठी ग्रंथजगत २००६ दीपावली अंक खूप आवडला. ज्यांचे लेख नेहमी वाचतो, जे कलाकार रंगभूमीवर असतात; त्यांची नव्याने ओळख झाली. त्यांचे वेळेचे नियोजन, भान, महत्त्व, येणारे-जाणारे क्षण, त्यांची मूल्ये जाणता आली.

आवड असूनही साहित्यक्षेत्रात मी काहीच करू शकलो नाही. याही वयात मराठी साहित्याविषयीची आवड निर्माण करून जीवन सुसह्य करणे, हे आपल्या सभासदत्वामुळेच झाले हे निश्चित.

**विलास भालचंद्र वायाळ, पुणे ९.**

आदरणीय श्री. मेहताकाका,

आपल्या दिवाळी अंकात बालवाचकांना स्थान दिल्याबद्दल आपणास सर्व बालवाचकांतर्फे धन्यवाद. बालवाचकांसाठी धमाल स्पर्धेत मला दुसरा क्रमांक मिळाला. बक्षीस म्हणून आपल्याकडून 'खरा मित्र' हे पुस्तक आजच मिळाले. त्यामुळे मला खूपच आनंद झाला.

आपल्या दिवाळी अंकात आम्हाला शिकण्यासारख्या महत्त्वाच्या अनेक गोष्टी आहेत.

या नव्हेत गोष्टी हे तर खळखळणारे झरे।

घेऊन आले आमच्यासाठी नव उल्हासाचे वारे।।

वाचन संस्कार आणि वेळेचे नियोजन यातून यशाचे टॉनिक देणारा दिवाळी अंक खूपच आवडला.

**आपला बालवाचक**
**शुभम साळुंखे, उल्हासनगर.**

मा.मंजुषा आमडेकर,

मेहता पब्लिशिंग हाउसतर्फे प्रकाशित हॅरी पॉटर मालिकेतील एका पुस्तकाचे मराठी भाषांतर तुम्ही मध्यंतरी वाचायला व अभिप्रायासाठी दिले होते. माझे वाचन सावकाश का होईना पूर्ण झाले. अनुवाद चांगला झाला आहे. मी मूळ इंग्रजी पुस्तक वाचलेले नाही. परंतु इंग्रजी वाचायची सवय नसलेल्या मुलांना मराठी अनुवाद वाचताना खिळवून ठेवील असा झाला आहे.

**गिरीश बापट**
**संचालक, ज्ञानप्रबोधिनी, पुणे**


# पुण्यभूमी भारत

**सुधा मूर्ती**
**अनु. लीना सोहोनी**

*उच्च अध्यात्मिक संस्कृती, परंपरा याचा वारसा असणारा हा देश. भौगोलिक, सामाजिक विविधता असूनही 'वसुधैव कुटुंबकम्' असा उदार दृष्टीकोन बाळगून निराश्रितांना आश्रय देणारा. प्राचीन काळापासून 'पुण्यभूमी' हे बिरूद सन्मानाने भूषवणारा.....*




**१३०रु.**
**पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**





# डॉलर बहू




मूळ लेखिका. **सुधा मूर्ती**

अनु. **उमा कुलकर्णी**

पारंपारिक भारतीय संस्कृतीत वाढलेली, मूल्यसंस्कार जोपासणारी, भारतात राहणारी सून....आणि विदेशात राहणारी, तेथील जीवनशैली अंगिकारलेली मूळ भारतीय असलेली सून....

यात समंजस कोण.....?

एका भारतीय कुटुंबाच्या मानसिक द्वंद्वाचा ठाव घेणारी मर्मस्पर्शी कादंबरी.

**किंमत १२०रु.**
**पोस्टेज २० रु.**

**लवकरच.....**

# गव्हर्नन्स




*वर्तमानातील भारतीय प्रशासकीय कार्यपद्धती, त्यातील उदासिनता, अकार्यक्षमता, बेपर्वावृत्ती याचे परखड मूल्यांकन करणारा, ही परिस्थिती संपूर्णपणे 'आज' आणि 'आता' का बदलली पाहिजे हे आग्रहाने सांगणारा अनुभवाधिष्ठित दस्तऐवज.*

**अरुण शौरी**
**अनु. भारती पांडे**

**२२०रु.**
**पोस्टेज ३०रु.**

# श्रद्धांजली

## * शं. व्यं. काश्यपे

ज्येष्ठ बालवाङ्मयकार 'शं. व्यं.' तथा 'शंकर व्यंकटेश काश्यपे' यांचे गेल्या २२ नोव्हेंबर रोजी नाशिक येथे वृद्धापकाळाने निधन झाले ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली व मुलगा असा परिवार आहे.



मुलांच्या शिक्षणाचा सर्वांगिण विचार करणारे शिक्षक अशी कै. काश्यपे यांची ख्याती होती.

चाळीसगाव येथील प्राथमिक अध्यापक महाविद्यालयातील आपल्या ३० वर्षांपेक्षा अधिक अशा प्रदीर्घ सेवेनंतर ते उपमुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाले.

शिक्षकी पेशातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी स्वत:ला बालवाङ्मयाच्या कार्यास वाहून घेतले होते. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे त्यांची 'मुलांवरचे संस्कार', 'संस्कार कथा' आणि 'असे बना अन् बनवा विद्यार्थी' अशी एकूण तीन पुस्तके प्रकाशित झाली. त्यापैकी 'मुलांवरचे संस्कार' या पुस्तकाला १९९३-९४ चा राज्य पुरस्कार जाहीर झाला.

'अमृत' मासिक, दै. सकाळ, नाशिक मधून त्यांनी अनेक लेखमाला लिहील्या. त्यापैकी 'भारतीय संस्कृतीची तोंडओळख' या लेखमालेचे स्वतंत्र संकलित पुस्तकही उन्मेष प्रकाशनातर्फे निघाले.

मूल्यसंस्कार, संस्कृतीवर आधारित बालवाङ्मयनिर्मितीवर त्यांनी भर दिला. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे तर्फे १९९८ साली 'उत्कृष्ट राष्ट्रभाषा प्रचारक' म्हणून त्यांचा सन्मानही करण्यात आला होता.



## * 'धर्मभास्कर'चे संपादक अवधूतशास्त्री

'धर्मभास्कर' या मासिकाचे संपादक प्रा. अवधूतशास्त्री यांचे १० नोव्हेंबर रोजी निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मसुराश्रमाचे ब्रह्माचारी विश्वनाथजी यांचे ते बंधू होते. प्रा. अवधूतशास्त्री यांना भाऊबीजेच्या दिवशी अर्धांगवायूचा झटका आल्याने इस्पितळात दाखल करण्यात आले होते. प्रा. अवधूतशास्त्री यांनी गेली ३५ वर्षे 'धर्मभास्कर' हे मासिक अत्यंत निष्ठेने व तळमळीने चालविले होते.

## * डॉ. वि. गो. खोबरेकर यांचे निधन

'भारतीय इतिहास आणि संस्कृती' या पत्रिकेचे संपादक,ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. वि. गो. खोबरेकर (वय ८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाचे संचालक, आणि मराठी संशोधन मंडळाच्या कार्यकारी मंडळाचे ते सदस्य होते. कोकणच्या राजकीय इतिहासावर त्यांनी अभ्यासपूर्ण पुस्तकेही लिहिली आहेत. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे, सुना आणि नातवंडे आहेत.

## * डॉ. इंदूताई टिकेकर

पर्यावरण रक्षणाच्या कार्याला आपले जीवन वाहिलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या डॉ. इंदूताई टिकेकर यांचे मथुरा येथे निधन झाले. त्या ७० वर्षांच्या होत्या.

त्यांच्यावर १४ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या वेळी चिपको आंदोलनाचे प्रणेते सुंदरलाल बहुगुणा, गांधीवादी विचारवंत डॉ. निर्मला देशपांडे आणि 'सर्वोदय' परिवाराचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

मथुरा-वृंदावन येथे सुरू असलेल्या खाणकामाच्या निषेधार्थ तीन दिवसांपूर्वी मथुरा येथे मोर्चा काढण्यात आला. त्याचे नेतृत्व इंदूताईंनी केले. या वेळी त्या अचानक बेशुद्ध झाल्या. त्यांना 'ब्रेन हॅम्रेज' झाल्याचे निदान झाले. त्यांच्यावर तीन दिवस उपचार सुरू होते. मात्र १३ नोव्हेंबर रोजी रात्री त्यांचे निधन झाले. त्या अविवाहित होत्या. इंदूताई या सर्वोदय चळवळीचे प्रणेते विनोबा भावे यांच्या निकटवर्ती होत्या. त्यांनी बनारस येथे तत्त्वज्ञान या विषयात डॉक्टरेट केली. त्यानंतर त्या महाविद्यालयात प्राध्यापक होत्या. १९७० च्या आसपास त्या पर्यावरणरक्षणाच्या कामी उत्तर काशी येथे गेल्या. तेथे चिपको आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. याबरोबरच हिमनद्या वाचविण्यासाठीही त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले. याशिवाय उत्तर भारतातील पर्यावरणाचे विविध प्रश्न त्यांनी हाताळले. त्यांनी पर्यावरण विषयावर अनेक लेख व पुस्तक लिहून जागरुकता निर्माण करण्यास हातभार लावला. अशा प्रकारे त्यांनी आपले जीवन पर्यावरणरक्षणाच्या कार्याला वाहिले. स्वीडनतर्फे दिला जाणारा 'राईट टू लाईव्हलीहूड' हा पुरस्कार त्यांना बहाल करण्यात आला होता. त्यांच्या कार्यावर आधारित एक माहितीपट बी.बी.सी.ने चित्रित केला आहे.

❒

# बालनगरी



## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| इंद्रधनु | १०९ |
| दिसतं तसं नसतं | ११२ |






# इंद्रधनुष्य

ऑस्ट्रेलियाच्या एका बेटावर तीन भाऊ राहत होते. जॉय, मॉय आणि सॉय. मोठे दोघं भाऊ दिसायला देखणे आणि शरीरानं देखील धष्टपुष्ट होते. धाकटा मात्र दिसायला सामान्य, थोडासा दुबळा होता.

ऑस्ट्रेलियाच्या त्याच बेटावर लामारी नावाची सुंदर तरुणी राहत होती. ती इतकी सुंदर होती, तिघंही भाऊ तिला पाहून तिच्या प्रेमातच पडले.

तिघांनीही एकमेकांजवळ तिच्यावरच्या प्रेमाची कबुली दिली. तिघंही म्हणायला लागले, ''लामरीच ठरवेल, आपल्यापैकी तिला कोण आवडतं.''

जॉय, मॉय म्हणाले, ''अरे, आपण छानसे खाद्यपदार्थ देऊन तिला खूष करूया. बघूया तिला काय आवडतं.''

जॉयनं मोठा एक समुद्रमासा आणला तर मॉयनं



कांगारुचीच शिकार करून आणली. आश्चर्य म्हणजे लामारीनं दोघांच्याही या भेटी स्वीकारल्या नाहीत.

सॉयला काय करावं ते सुचेना. 'बघू आपलं नशीब आजमावून,' असं मनाशी म्हणत त्यानं बिचाऱ्यानं थोडीशी फळं, एक मोठा मासा आणला. घाबरत घाबरत त्यानं लामारीला ते दिलं. तिनं अगदी आनंदानं ते स्वीकारलं.

सॉय आणि लामारीनं गुपचूप लग्न केलं. जॉय, मॉयला या लग्नाचा थांगपत्ताच नव्हता.

एक दिवस मात्र दोन्ही भावांना त्यांच्या लग्नाबद्दल समजलं. सॉय-लामारी हसत-खेळत गप्पा मारत होते. एकत्र बसून जेवत, एकमेकांना भरवत जणू काय त्यांचं लग्नच झालंय.

दोन्ही भाऊ अतिशय चिडले. 'या सॉयचा काटा काढलाच पाहिजे,' असं जॉय-मॉयनं पक्कं ठरवलं.

''सॉय, चल की आमच्याबरोबर मासे पकडायला,'' एक दिवस दोघांनी त्याला आग्रह केला. सॉय बिचारा भोळा. यांच्या मनातलं कपट त्याला काय कळणार! तयार झाला जायला.

तिघंही गेले समुद्रात. समुद्रात मध्यावर आल्यावर जॉय-मॉयनं सॉयला दिलं पाण्यात ढकलून. त्याला मारण्यासाठी त्यांनी प्रचंड असा खडकाळ भाग निवडला होता. बिच्चारा सॉय. बराच प्रयत्न करूनही त्याला नीट पोहता येईना.





शेवटी एका खडकावरून जोरात खाली आपटून तो वहात गेला.

त्याचवेळी आकाशातून एक छोटा पक्षी उडत चालला होता. त्यानं हा सारा प्रकार पाहिला आणि सर्व जाऊन लामारीला सांगितलं. तिला अनावर दुःख झालं. नवऱ्याशिवाय जगणं तिला असह्य झालं. नवऱ्याचा कामाचा सुरा तिनं स्वतःच्या पोटात खुपसून घेतला.

जॉय आणि मॉय समुद्रावरून घरी परत आले. तोपर्यंत लामारीने आपले प्राण सोडले होते.

आश्चर्य म्हणजे लामारीपासून तिचा नवरा सॉय याला जिथे ढकलून दिले होते तिथपर्यंत एक सुंदर प्रकाशाची सप्तरंगी कमान तयारी झाली होती. ती कमान म्हणजेच आपण आकाशात पाहतो ते 'इंद्रधनुष्य'!

**अनुवाद : संध्या कुलकर्णी**

# दिसतं तसं नसतं



एका चिमणीला
लागली तहान,
शोधायला गेली
डबकं लहान,
डबक्यातील तळाला
चिखल होता साचलेला,
वरचं नितळ पाणी मात्र
खूप भावलं चिमणीला.
काटेरी झुडुपावर
चिमणी बसली,
पाणी पिण्यासाठी
खाली जरा झुकली.
तोल गेल्यामुळे
डबक्यात पडली,
पंख भिजून
पाण्यावर तरंगली.
तिथं एक आला
लबाड कोल्हा
डोकावून म्हणाला,
'मटकावणार मी तुला.'
धमकी ऐकून
चिमणी भ्याली,
पण धिटाईनं संकटाला
सामोरी गेली.
म्हणाली त्याला
करून बहाणा,





'चिखलात रुतल्यामुळे
बाहेर पडता येईना.'
'मला डबक्यातून
बाहेर काढ आधी.
मग मटकावण्याची
सोडू नको संधी.'
बिनडोक कोल्ह्यानं
उडी मारली डबक्यात,
स्वतःच्या वजनानं
रुतून बसला चिखलात.
घट्ट रुतल्यामुळे
हालचाल त्याची मंदावली.
चिमणीला मटकावण्याच्या बेताला
चांगलीच खीळ बसली.



फुटक्या नशिबाला
दोष देत म्हणाला,
'अविचार केल्यानं
डाव पूर्ण फसला.'
वेळ न दवडता
चिमणीनं मोका साधला.
कोल्ह्याच्या पाठीवर उभं राहून
दीर्घ निःश्वास सोडला.
पंखातील ओलेपणा मग



बिनधास्त झटकला,
बळ येताच झाडावर
उडत म्हणाली कोल्ह्याला,
'दिसतं तसं नसतं
म्हणूनच जग फसतं.
प्रसंगावधान राखल्यानं
संकट नेहमी टळतं.'

**पु. ग. वनमाळी,वसई रोड**

# ओळखा पाहू



हे आहेत एक प्रख्यात भारतीय अर्थशास्त्रज्ञ.

अर्थशास्त्रातील संशोधनाबद्दल, भरीव कामगिरीबद्दल यांना नोबेल पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

हे कोण आणि यांना कोणत्या वर्षी अर्थशास्त्रासाठीचा नोबेल जाहीर करण्यात आला हे आम्हाला पत्राद्वारे कळवा.

नोव्हेंबर अंकातील 'ओळखा पाहू' चे उत्तर

**कादंबरीचे नाव - द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज**
**लेखिका - अरुंधती रॉय**

---

अचूक उत्तर पाठवणारे वाचक -

**मनोज शर्मा-औरंगाबाद, वैशाली मेहता-मालेगाव, प्रभा तायडे, राजेश तायडे- अमरावती, राजसी चवरे-वाशिम, सुभाष पै-गोवा, मनिषा जोशी-गुळसुंद, राजेश भुतकर-रायगड.**

**पुढील सर्व शब्दांची सुरुवात एकाच अक्षराने होते. पहा बरं...**

| | |
|---|---|
| १) आकाशात उडवून गंमत करण्याचा | **--ग** |
| २) रखवालदार | **---क-** |
| ३) खिडक्यांवर हा हवाच! | **--डदा** |
| ४) एक वाद्य | **---ज** |
| ५) ज्ञानेश्वरीतील प्रार्थना | **--य--** |
| ६) डोंगर | **--त** |
| ७) नवरा | **-ती** |
| ८) वेळ | **-ह-** |
| ९) महिनाभर काम करून मिळतो | **-गा-** |